४१ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

**महत्वाची सूचना**

दै. सोलापूर तरूण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनामित्त १ ते ६ ऑगस्ट दरम्यान दररोज **'विकसनशील सोलापूर'** ही १२ पानी विशेष पुरवणी प्रसिध्द करीत आहोत. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

सोलापूर | शुक्रवार, १ ऑगस्ट २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २६३ | पाने १२+१२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


IMS GROUP OF SCHOOLS
NAVI MUMBAI | PUNE | SOLAPUR

# IMS GROUP OF SCHOOLS

**Navi Mumbai | Pune | Solapur | Akkalkot**

**Nurturing Empathetic, Accountable, Thriving Young Champions**



| Founder - President<br>Shree Shikshan Pratishthan | Chairman<br>IMS Group of Schools | Secretary<br>IMS Group of Schools |
| --- | --- | --- |
| Prof. A. D. Joshi | Mr. Amol Joshi | Mrs. Sayali Joshi |

24 Years in Education

15 Institutes 14000+ Students


No Bag School

## MESSAGE FROM FOUNDERS

Dear Parents,
Welcome to our school, where we are committed to provide an enriching educational experience to every student. Our campus boasts a wide range of facilities and resources designed to foster a holistic learning environment. Whether it's dancing to the rhythm of life or singing with heart and soul, our students have the space and guidance to express themselves creatively through the medium of Dance and Music.

In addition to the arts, we offer a rich linguistic landscape. Our students have the opportunity to learn languages like French, German, Sanskrit and Kannada, embracing the diversity of languages that our world has to offer. We believe in the importance of multilingualism and the cultural understanding it brings. Moreover, our Science Kits and Composite Science Laboratory are the foundations for scientific exploration with scientific experiments and hands on Science activities. We encourage our students to delve into the realms of science, inspiring curiosity and a deep.

These facilities, along with many others, are here to support our students on their journey of self-discovery and knowledge. The sports facilities, the turf playground and the upcoming swimming pool will definitely cater to the physical development of the children as well. We are dedicated to nurturing well-rounded individuals who are not only academically successful but also culturally aware and scientifically curious. The school campus spreads over an area of 6000 Sqm fostering a culture of Cleanliness, Greenery and Hygiene.







## HIGHLIGHTS

- No Bag School
- Remedial Session
- Language Lab
- Weekly Tests
- Scholarship Exams
- Robotics & AI Lab
- Computer Lab
- Maths Lab
- Science Kits and Composite Science Lab
- School Transport Facitity
- Wholesome Nutritious Meal
- One to one meetings with the parents
- IIT-JEE/NEET Foundation Programme
- Well equipped Classrooms with Lockers
- Cambridge University Certification Programme

The School Library, the Composite Science Lab, the Computer Lab, the Activity Rooms, E-learning Classrooms, the turf playground ensure effective implementation of various co- curricular and extra-curricular activities in the school. Sufficient classrooms, natural light and ventilation, safe, comfortable, age appropriate furniture, safe drinking water, adequate sanitation facilities, adequate safety measures make the Teaching - Learning process more joyful, smooth, effective and conducive.





## Academic Achievements

100% Results




| Grade X (2023-2024) | | | Grade X (2024-2025) | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| Patil Tanuja 97.8% | Peshwe Pushkar 97.6% | Patil Ojal 97.2% | Dhakne Sharvari 99% | Chavan Animesh 98.6% | Hake Samrudhi 98.2% | Patil Aryan 98.2% |

## National Level Players Representing Maharashtra Academic Year : 2024-25



Samihan Kulkarni (International) Karate Gold & Bronze Medal | Sanket Dhannik (International) Karate Gold & Bronze Medal | Akshita Kulkarni (International) Karate Bronze Medal | Aabha Malji Diving | Apoorva Andhare Diving | Komal Patil Hand Ball | Gaikwad Manas Chess | Gauri Patil Fencing Gold Medal | Jishan Melinmani Hockey



Antriksh Hukire Hockey | Sachi Kshirsagar Hockey | Ariksha Ladda Mount Elbrus Europe | Sarthak Kemkar Football | Avani Koli Shooting Silver Medal | Suprita Subudhi Air Rifle Shooting | Sanskruti Pawar Air Rifle Shooting | Avantika Narayankar Air Rifle Shooting | Ananya Kamble Air Rifle Shooting



Samruddhi Gadekar Diving Bronze Medal | Rudra Sarade Fencing | Shreyash Vijapure Softbaseball | Onkar Kulkarni Softbaseball | Prasanna Nandargi Softbaseball | Aryan Tiwari Softball | Swara Amkar Softball | Yatharth Patil Softball | Gaurav Koli Softball



Pradnya Rasam Softball | Arnav Haspatil Baseball Bronze Medal | Piyush Mhatre Baseball Bronze Medal | Anayakshat Singh Baseball Bronze Medal | Tanvi Ingale Baseball | Hitanshi Koli Baseball | Vaibhavi Manjrekar Baseball | Sarthak Patil Baseball Japan | Vaishnavi Killedar Handball



Sarang Lonarkar Handball | Rashi Shah Dodge Ball Silver Medal | Ananya Yawalkar Karate Gold Medal | Shourya Salunke Aerobics Bronze Medal | Paryul Doshi Aerobics Bronze Medal | Sharvil Malvadkar Skating | Rajat Wankar Fencing | Paras Khabe Karate Bronze Medal | Sneha Bokade Silver Medal & Bronze Medal



Nainika Reddy khelo India Youth Games Double Bronze Medal | Jui Joshi Aerobics Gold Medal | Sachit Kumbhar Baseball Gold Medal | Gourang Chona Baseball Gold Medal | Bhavyasree Kopuri Baseball Bronze Medal | Purva Mhatre Fencing Gold Medal | Swara Bansode Taekwondo Bronze Medal | Vidita Waghmode Hockey | Riya Jadhav Boxing

## OUR INSTITUTES



INDIAN MODEL SCHOOL (STATE BOARD)



INDIAN MODEL SCHOOL, (CBSE)



MODEL PUBLIC SCHOOL



A. D. JOSHI JUNIOR COLLEGE



SWAMI VIVEKANAND POLICE PUBLIC SCHOOL



INDIAN MODEL SCHOOL & JUNIOR COLLEGE, ULWE, NAVI MUMBAI (CBSE)



INDIAN MODEL INTERNATIONAL SCHOOL (CBSE)



INDIAN MODEL SCHOOL, AKKALKOT



VED PATHASHALA, MULSHI, PUNE

**WE INVITE ADMISSIONS FOR THE SESSION 2025-26**

**Nursery to Grade VIII**

**For Further Details Contact**

**9321077233 / 8087671288 / 7020215557**

!! दैनिक तरुण-भारतच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा !!

**Admission forms are available at school website**

**www.imsschools.in**

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

४१ वा वर्धापन दिन

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



युवकांनी केवळ नोकरी मिळविण्यापुरते शिक्षण न घेता समाजासाठी काही करावे, हीच खरी देशसेवा.

**- माधवराव मुळे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## विनम्र अभिवादन



भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची आज पुण्यतिथी



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची आज जयंती

# प्रमिलताई मेढे यांचे देहावसान

## अहिल्या मंदिराकडे सेविकांचा ओघ



◆ **नागपूर, ३१ जुलै**

**राष्ट्र सेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका प्रमिलताई मेढे यांचे आज गुरुवारी दीर्घ आजाराने सकाळी ९.०५ वाजता धंतोलीमधील देवी अहिल्या मंदिरात देहावसान झाले. त्या ९७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच जगभरातील सेविकांवर शोककळा पसरली. त्यांच्या इच्छेनुसार उद्या १ ऑगस्टला ८ वाजता मिहानमधील अ.भा. आयुर्विज्ञान संस्थेला (एम्स) देहदान केले जाणार आहे. दरम्यान, प्रमिलताईंचे अंतिम दर्शन घेण्यासाठी स्थानिक सेविका आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांचा ओघ अहिल्यादेवी मंदिराकडे सुरू झाला.**

प्रमिलताई मेढे या समितीच्या चतुर्थ प्रमुख संचालिका होत्या. मागील काही दिवसांपासून त्यांची प्रकृती बरी नव्हती. तरी त्यांची नित्य दिनचर्या सुरूच होती. गेल्याच महिन्यात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व आ. प्रवीण दटके त्यांना भेटायला अहिल्या मंदिरात गेले होते. दोघांची प्रमिलताईंनी विचारपूस केली. आज सकाळी नेहमीप्रमाणे त्या उठल्या. सेविकांची विचारपूस केली. ९ वाजताच्या सुमारास त्यांची प्रकृती गंभीर झाली आणि त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अनेकांना धक्का बसला. राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, सहकार्यवाहिका चित्राताई जोशी या अहिल्या मंदिरातच होत्या. त्यांना शोकावेग आवरला नाही. प्रमिलताईंचे पार्थिव तळमजल्यावरील सभागृहात आणण्यात आले. प्रमिलताईंच्या निधनाचे वृत्त समजताच अनेक सेविका तसेच रा.स्व. संघाच्या स्वयंसेवकांनी अहिल्या मंदिर गाठले. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, अ.भा. प्रचार प्रमुख सुनील आंबेकर, रा. स्व. संघाचे अ. भा. कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी, विदर्भ प्रांत संघचालक

### देशभर हजारो किलोमीटरचा प्रवास

अमेरिकेच्या न्यू जर्सी शहराचे मानद नागरिकत्व त्यांना प्राप्त होते. वंदनीय मावशी केळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्या चित्र प्रदर्शनासह संपूर्ण भारतवर्षात हजारो किलोमीटरचा प्रवास शंभराहून अधिक स्थानी केला. त्या उत्तम वक्ता, कर्मठ कार्यकर्त्या, शिस्तप्रिय व्यक्ती असलेल्या प्रमिलताईंचे अनेक भाषांवर प्रभुत्व होते. त्या राष्ट्र सेविका समितीच्या विद्यमान अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्या होत्या. एसएनडीटी विद्यापीठाने त्यांना डी. लिट. पदवी प्रदान केली होती. ■

राष्ट्र सेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका श्रद्धेय प्रमिलताई मेढे यांच्या निधनाचे वृत्त ऐकून अतिशय दु:ख झाले. त्यांचे संपूर्ण जीवन समाज आणि राष्ट्रसेवेप्रती समर्पित होते. महिला सशक्तीकरणासोबतच सामाजिक कार्यांमध्ये त्यांचे योगदान नेहमीच स्मरणात राहील.
**- नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

प्रमिलताई यांच्या जाण्याने सर्वांवरची वात्सल्यछाया अंतर्धान पावली. त्यांनी तपस्या केली. समितीच्या सुरुवातीपासून त्या कार्यरत होत्या आणि गेल्या ६ दशकांपासून त्या अहिल्या मंदिरात राहून कार्य करीत होत्या. उत्तर पूर्वांचलातील विपरीत परिस्थितीत चिवट लढा देत त्यांनी समिती कार्य पुढे नेले.
**- डॉ. मोहनजी भागवत**, सरसंघचालक

वंदनीय प्रमिलताई या बहुमुखी व्यक्तिमत्त्वाच्या प्रखर चिंतनशील आणि कर्मठ कार्यकर्त्या होत्या. शेवटच्या क्षणापर्यंत मन आणि बुद्धीने सतर्क राहून अनुशासित जीवन जगणाऱ्या मातृत्व भाव असणाऱ्या प्रमिलताई आज आपल्यात नाहीत. त्यांनी दाखविलेल्या आदर्श मार्गावर चालत राहणे, हीच त्यांना श्रद्धांजली ठरेल.
**- शांताक्का**, प्रमुख संचालिका, राष्ट्र सेविका समिती

राष्ट्र सेविका समितीच्या माजी प्रमुख संचालिका वंदनीय प्रमिलताईंनी आपले संपूर्ण जीवन राष्ट्र सेविका समितीच्या कार्यासाठी समर्पित केले. त्यांच्या नेतृत्वात राष्ट्र सेविका समितीचे कार्य देशभरात पोहोचले. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.
**- देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

समितीचे कार्य देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याचे श्रेय प्रमिलमावशींचे आहे. त्यांचे जीवन राष्ट्रभक्ती आणि मातृशक्तीला समर्पित होते. सर्व स्वयंसेवकांनी आज एक मातृतुल्य व्यक्तिमत्त्व गमावले आहे.
**- नितीन गडकरी**, केंद्रीय मंत्री

# अमेरिका-पाकिस्तान तेलाचे साठे विकसित करणार

## डोनाल्ड ट्रम्प यांची व्यापार कराराची घोषणा



**वॉशिंग्टन, ३१ जुलै**

भारतावर अतिरिक्त दंडासह २५ टक्के टॅरिफ लादण्याचा निर्णय घेतल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पाकिस्तानसोबत तेलाचे साठे विकसित करण्यासंदर्भात व्यापारी कराराची घोषणा केली. भविष्यात भारताला पाकिस्तानकडून तेल खरेदी करावे लागेल अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली.

समाज माध्यम खात्यावर लिहिलेल्या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी म्हटले की, आम्ही पाकिस्तानसोबत एक करार अंतिम केला आहे, ज्याअंतर्गत दोन्ही देश मिळून त्यांच्या तेल साठ्यांचा विकास करतील. एका खासगी अमेरिकन तेल कंपनीला या भागीदारीसाठी निवडले जाईल. कदाचित एक दिवस ते भारतालाही तेल विकतील. आम्ही या भागीदारीचे नेतृत्व करणारी तेल कंपनी निवडण्याच्या प्रक्रियेत आहोत. पाकिस्तानचे अर्थमंत्री मोहम्मद औरंगजेब आणि अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक, व्यापार प्रतिनिधी राजदूत जेमीसर ग्रीर यांच्यात झालेल्या बैठकीत हा करार झाल्याची पुष्टी ट्रम्प यांनी केली.

द्विपक्षीय व्यापार वाढविणे, अमेरिकन वस्तूंच्या विक्रीसाठी बाजारपेठ खुली करणे आणि परस्पर हिताच्या क्षेत्रात सहकार्य वाढविणे हे व्यापार कराराचे उद्दिष्ट आहे. या करारामुळेए पाकिस्तानातून अमेरिकेत होणाऱ्या निर्यातीवरील परस्पर शुल्क कमी होईल. हा करार विशेषतः ऊर्जा, खनिजे, आयटी आणि क्रिप्टोकरन्सी तसेच इतर क्षेत्रात आर्थिक सहकार्य वाढविण्यावर केंद्रीय असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. दरम्यान पाकिस्तानने आपल्या समुद्र किनाऱ्यावर तेलाचे साठे असल्याचा दावा केला आहे, या साठ्याचा अभ्यास पूर्ण करण्यासाठी सुमारे ४२,००० कोटी खर्च अपेक्षित आहे. त्यानंतर समुद्रातून तेल काढण्यासाठी ४ ते ५ वर्ष लागतील.

### भारताला काळजीही नाही अन् प्रत्युत्तरही देणार नाही


**नवी दिल्ली, ३१ जुलै**

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या २५ टक्के शुल्काच्या मुद्यावर कोणतीही काळजी करण्यासारखे नाही तसेच या शुल्काविरोधात कोणतेच प्रत्युत्तर देणार नाही. केवळ वाटाघाटीतच या विषयावर चर्चा करून दोन्ही देशांच्या हिताचा निर्णय घेतला जाणार आहे, असे सूत्रांनी सांगितले. ट्रम्प यांनी बुधवारी भारतीय आयातीवर २५ टक्के कर आणि अतिरिक्त दंड लादण्याची घोषणा केली. ही आकारणी १ ऑगस्टपासून लागू होईल. भारत रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी करतो तसेच शस्त्रास्त्रांची खरेदीही केली जात असल्याचे ट्रम्प यांनी म्हटले आहे. भारत या निर्णयाच्या विरोधात प्रत्युत्तर देणार नाही. शांतता सर्वांत चांगली असते. आम्हाला जे काही करायचे असेल, ते आम्ही चर्चेच्या मेजावर करू, असे सरकारी सूत्रांनी सांगितले. भारत अत्याधिक शुल्क आकारतो तसेच अडथळे निर्माण करतो, असा आरोप ट्रम्प यांनी ट्रुथ या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

भारत हा मित्रदेश असला तरी दोन्ही देशांमधील व्यापार हा मर्यादित आहे, असे त्यांनी पोस्टमध्ये म्हटले होते. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या आयातीवरील भारताचे कर खूप जास्त असल्याचे म्हटले. भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था मृतप्राय असून, त्याच्याशी काही देणेघेणे नाही, असे टीका करताना म्हटले आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत आणि अमेरिका व्यापार करारावर वाटाघाटी करीत असताना अचानक ट्रम्प उलटले आणि २५ टक्के शुल्क जाहीर करण्याचा निर्णय घेतला. अणुचाचणी घेतल्यावर अमेरिकेने अनेक निर्बंध भारतावर लादले होते. त्यावेळी आपली लहान अर्थव्यवस्था होती. आता आपण आत्मनिर्भर आर्थिक शक्ती आहोत. त्यामुळे आता काळजी करण्यासारखे काहीच कारण नाही, असे सूत्रांनी सांगितले.

## महत्त्वाचे

### ट्रम्प यांच्या शुल्क घोषणेमुळे बाजारांत घसरण



**मुंबई** : भारतावर शुल्क आकारण्याबाबत डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या घोषणेच्या परिणामाने शेअर बाजारांत गुरुवारी घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक २९६ अंकांनी घसरून ८१,१८५ या पातळीवर तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ८७ अंकांनी घसरून २४,६३५ वर बंद झाला. दिवसभराच्या अस्थिर सत्रात निर्देशांकाने ८०० अंकांची घसरण अनुभवली. निर्देशांकात सर्वाधिक फटका स्मॉलकॅप व मिडकॅपला बसला, मिडकॅप ०.७० टक्क्याने घसरले, तर स्मॉलकॅपमध्ये ०.८५ टक्क्यांची घसरण झाली. दिवसभराच्या सत्रात गुंतवणूकदारांची संपत्ती दोन लाख कोटी रुपयांनी कमी झाली. ट्रम्प यांच्या शुल्क घोषणेमुळे शेअर बाजारात आज मोठी घसरण होईल, असा अंदाज वर्तवला जात होता. ■

# खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांतील 'ईडब्ल्यूएस' कोटा रद्द

## राज्य सरकारचा निर्णय



◆ **मुंबई, ३१ जुलै**

महत्त्वपूर्ण धोरणात्मक बदल करीत महाराष्ट्र सरकारने खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमधील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांसाठी (ईडब्ल्यूएस) १० टक्के आरक्षण लागू करण्याचा निर्णय मागे घेतला आहे.

आरक्षण लागू करण्याचा निर्णय मागे घेण्यात आल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण विभागाने बुधवारी दिली. सद्यःस्थितीत असलेल्या जागा केंद्र सरकार आणि संबंधित परिषदांनी वाढवल्यास ईडब्ल्यूएस दिले जाईल, असे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे.

केंद्र सरकार आणि संबंधित परिषदांनी जागा वाढवण्याचा निर्णय घेतल्यास एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस, बीएचएमएस आणि बीयूएमएस या अभ्यासक्रमांसाठी हे आरक्षण लागू राहील. एमबीबीएस, बीडीएस, बीएएमएस, बीएचएमएस आणि बीयूएमएस व्यतिरिक्त इतर अभ्यासक्रमांसाठी ईडब्ल्यूएस आरक्षण लागू राहील, असे वैद्यकीय शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

मागील आठवड्यात महाराष्ट्र सामान्य प्रवेश चाचणी सेलने वैद्यकीय पदवीपूर्व (यूजी) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू झाल्याची घोषणा केली, तेव्हा माहिती पुस्तिकेत खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाची अंमलबजावणी दर्शवली गेली. या निर्णयामुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये भीती निर्माण झाली, कारण कोट्याच्या निर्णयामुळे जागांची संख्या वाढवल्याशिवाय खुल्या श्रेणीतील जागांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करणे आवश्यक होते.

एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत शिक्षण क्षेत्रात राज्य सरकारने घेतलेला हा दुसरा मोठा बदल आहे. *(वृत्तसंस्था)*

# ट्रम्प यांचा भारतावर पहिला वार

## सहा भारतीय तेल कंपन्यांवर लादले निर्बंध



◆ **वॉशिंग्टन, ३१ जुलै**

अमेरिकेने भारतावर १ ऑगस्टपासून २५ टक्के व्यापार शुल्क लावल्यानंतर दुसऱ्या दिवशी डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणकडून तेल खरेदी केल्याचा आरोप करीत सहा भारतीय कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने बुधवारी निर्बंधांची घोषणा केली.

अमेरिकेने इराणवर निर्बंध लादले आहेत. या निर्बंधांचे उल्लंघन केल्याचा आरोप करीत अल्केमिकल सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, ग्लोबल इंडस्ट्रियल केमिकल्स लिमिटेड, ज्युपिटर डाई केम प्रायव्हेट लिमिटेड, रमणिकलाल एस गोसालिया अँड कंपनी, पर्सिस्टंट पेट्रोकेम प्रायव्हेट लिमिटेड आणि कांचन पॉलिमर्स या कंपन्यांवर निर्बंध लादण्यात आले आहेत. या कारवाईमध्ये या कंपन्यांची अमेरिकेतील किंवा अमेरिकन व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असलेली सर्व मालमत्ता गोठवण्यात आली आहे. तसेच अमेरिकन व्यक्ती आणि कंपन्यांना मंजूर कंपन्यांसोबत व्यवसाय करण्यास मनाई करण्यात आली आहे. भारताचे इराणसोबत मजबूत व्यापारी संबंध आहेत. तरीदेखील भारताने २०१९ नंतर इराणकडून तेल खरेदी करणे कमी केले आहे. या निर्बंध लादलेल्या कंपन्यांनी २०२४ मध्ये मोठ्या प्रमाणावर पेट्रोलिअम उत्पादने, मिथेनॉलची खरेदी केली होती. यात अल्केमिकल ही कंपनी आघाडीवर होती. *(वृत्तसंस्था)*

### दोन्ही अर्थव्यवस्था जाऊ द्या खड्ड्यात...

**भारत-रशिया व्यापारामुळे ट्रम्प यांचा त्रागा**

◆ **वॉशिंग्टन, ३१ जुलै**

भारत आणि रशियाची अर्थव्यवस्था मृतावस्थेत असून ती बुडण्याच्या अवस्थेत आहे, दोन्ही देश खड्ड्यात जावो याची मला पर्वा नाही, असा हल्लाबोल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.

ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, भारत हा अमेरिकेचा जवळचा मित्र असला तरी, आम्ही गेल्या काही वर्षांत त्यांच्याशी तुलनेने कमी व्यवसाय केला. जगातील इतर देशांच्या तुलनेत भारत अमेरिकेच्या वस्तूंवर सर्वाधिक कर लादतो आणि हेच कारण व्यापारासाठी अडथळा आहे. भारताच्या संरक्षणवादी धोरणांमुळे आणि अत्याधिक आयात शुल्कांमुळे अमेरिकेला भारतासोबत तुलनेत कमी व्यापार करावा लागतो. या कारणांमुळे भारत-अमेरिकीच्या व्यापारात अडथळे निर्माण झाले आहे. भारत रशियाकडून तेल आणि शस्त्रास्त्र खरेदी करून अप्रत्यक्षपणे त्यांच्या अर्थव्यवस्थेला मदत करीत आहे. आम्ही रशियाची नाकेबंदी करण्यासाठी पावले उचलत असताना भारत मात्र त्यांच्याशी व्यापार वाढवत आहे. भारत आणि रशिया एकमेकांशी काय व्यवहार करतात, त्याची आम्हाला पर्वा नाही. दोन्ही देश आपल्या मृत अर्थव्यवस्थांना आणखी बुडवू शकतात. *(वृत्तसंस्था)*

**अजूनही संधी निर्णय घ्यावा**

**ट्रम्प यांनी बुधवारी व्हाईट हाऊसमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले की, आमची भारताशी चर्चा सुरू आहे, २५ ऑगस्टला आमचे प्रतिनिधीमंडळ भारताच्या दौऱ्यावर जाणार आहे. २५ टक्के टॅरिफ अंतिम नाही.** ■

### होटगीत सराफ दुकानातून सात लाखांचा ऐवज लंपास

**सोलापूर** : दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी येथील सराफाच्या दुकानातून चोरट्याने सहा लाख ९७ हजार ५00 रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले. ही घटना गुरुवारी मध्यरात्री २.५५ ते ३:२५ च्या दरम्यान घडली. सिद्धाराम शिवानंद मुंडे ( वय २४, रा होटगी ताद. सोलापूर) यांचे होटगी गावात बेनक नावाचे सोन्याचा आणि विक्रीचे दुकान आहे. बुधवार ३0 जुलै रोजी रात्री आठ तीनशे सुमारास त्यांनी त्यांचे दुकान नेहमीप्रमाणे बंद केले. त्यावेळी दुकानातील शोकेसमध्ये सोने चांदीचे विविध प्रकारचे दागिने होते. गुरुवारी पहाटे ५:३0 च्या सुमारास दुकानाची साफसफाई करण्यासाठी फिर्यादी गेले. तेव्हा त्यांना दुकानाचे शटर अर्धवट उघडलेले दिसले. शटरची कडी तुटलेले होते तर कुलूप आहे त्यात अवस्थेत दिसून आले. दुकानात जाऊन पाहिले असता शोकेश व ड्रॉवर मधील सोन्या-चांदीचे दागिने फिर्यादीला दिसून आले नाहीत त्यावेळी त्यांनी दुकानातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्यांना कटवणीच्या साह्याने दुकानाचे शटर उचकटून दोघेजण दुकानात गेल्याचे दिसून आले.

# श्रींच्या स्वागतासाठी लोटला जनसागर

**● सुमारे दोन लाख भाविकांनी घेतले दर्शन ● समाधी दर्शनासाठी ३ तास, श्रीमुख दर्शनासाठी लागला १ तास**

◆ **शेगाव, ३१ जुलै**

आषाढी वारी पूर्ण करून श्री संत गजानन महाराज यांची पालखी गुरुवारी राजवैभवात स्वगृही दाखल झाली. या सोहळ्यासाठी संपूर्ण शेगाव शहर भक्तिमय उत्साहात न्हालं होतं. श्रींच्या स्वागतासाठी लाखो भाविकांनी रस्त्यावर गर्दी केली होती. जवळपास ३ लाख भाविकांनी पालखीतील श्रींच्या रजत मुखवट्याचे दर्शन घेतले.

पंढरपूर आषाढी वारीनंतर परतीच्या प्रवासात गुरुवारी सकाळी ७ वाजता पालखीने खामगाव येथून प्रस्थान केले. शेगावच्या दिशेने पालखी निघताच मार्गभर विविध ठिकाणी स्वागत समारंभ, पालखी पूजन, आरत्या, ढोल-ताशांचे गजर, बॅण्डपथकांची सजावट अशा वातावरणात पालखीची वाटचाल झाली. ठिकठिकाणी फुलांची कमानी, रंगोळ्यांनी सजवलेले मंडप, तोरणे आणि शुभेच्छा फलक लावण्यात आले होते.



शेगाव रस्त्यावर पालखीसोबत भाविकांची गर्दी

संत नगरी शेगावमध्ये पालखीचे आगमन होताच श्री संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर व्यस्थापकीय विश्वस्तांच्या हस्ते पारंपरिक पद्धतीने पूजन करण्यात आले. त्यानंतर पालखी वाटिका येथे पोहोचली. येथे शहरातील प्रतिष्ठित मान्यवरांनी श्रींच्या रजतमुखवट्याचे दर्शन घेतले. त्यानंतर भोजन प्रसादाचे वितरण करण्यात आले. दुपारी १.३० वाजता पालखी वाटिकेहून पुन्हा श्रीमंदिराकडे मार्गस्थ झाली. शहरातील विविध मार्गांनी मार्गक्रमण करीत पालखी श्रीमंदिरात पोहोचली. त्यानंतर महाआरती होऊन पालखी उत्सवाची सांगता करण्यात आली.

**निःशुल्क बससेवा**

पायदळ वारी करून आलेल्या भाविकांना शेगावहून खामगावकडे परत जाण्यासाठी खामगाव-शेगाव स्कूल बस असोसिएशन आणि कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, खामगाव यांच्यातर्फे मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली. माउली बस टर्मिनल, संभाजी राजे चौक, गजानन सोसायटी येथे व्यवस्था करण्यात आली होती. हजारो भाविकांनी याचा लाभ घेतला.

**सुरक्षा व्यवस्था कडेकोट**

गर्दीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून अपर पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्या मार्गदर्शनात४८६ पोलिस कर्मचारी, अधिकाऱ्यांचा बंदोबस्त ठेवण्यात आला होता. भाविकांना त्रास होऊ नये म्हणून शहरात वाहन बंदी लागू करून वाहने शहराबाहेर वळविण्यात आली. *(तभा वृत्तसेवा)*

# पालकांनो, लहान मुलांना सांभाळा

## लहानग्यांना मोबाईलपासून दूर ठेवा

◆ **नवी दिल्ली, ३१ जुलै**

विज्ञान शाप की वरदान? ही ओळ किंबहुना हा प्रश्न आता तंत्रज्ञान शाप की वरदान? अशाच स्वरूपात उपस्थित होत आहे. कारण, तंत्रज्ञानाने अनेक कामे सुकर झाली असली तरीही त्याचा दुरुपयोग होण्याचे प्रमाण तुलनेने जास्त आहे ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. सायबर गुन्हेगारीच्या कैक प्रकरणांमध्ये आता या सायबर हल्लेखोरांनी लहान मुलांना निशाण्यावर घेण्यास सुरुवात केल्याची विचलित करणारी बाब नुकतीच निदर्शनास आली आहे. लहान मुलांना केंद्रित करून होणाऱ्या अश्लील सायबर हल्ल्यांमध्ये मोठी वाढ झाल्याची धक्कादायक बाब नुकतीच समोर आली आहे.

सायबर गुन्हेगारांनी मागील पाच वर्षांत अश्लीलतेपासून ब्लॅकमेलपर्यंतचे हल्ले आठ पटीने वाढवले असून, लहान मुलंही यामध्ये लक्ष्य केली जात आहेत. त्यामुळे तुमची, तुमच्या कुटुंबातील किंवा अगदी तुमच्या मित्रपरिवारातील लहान मुले सुरक्षित आहेत का, हाच प्रश्न उपस्थित होत आहे.

ऑनलाईन माध्यमातून धमकावणे, सायबर ब्लॅकमेलिंग करणे या मार्गांसह लहान मुलांना मजकूर दाखवण्याचे प्रमाण सर्वाधिक असून याच मार्गाने लहान मुलांच्या बालपणावरच आघात करण्याचा प्रयत्न सायबर हल्लेखोरांनी केली. अश्लील माहिती दाखवण्याच्या प्रमाणात २६ पटींनी वाढ झाली ही सर्वाधिक हादरवणारी बाब आहे.

खुद्द केंद्र सरकारने संसदेत लहान मुलांवरील सायबर हल्ल्यांमध्ये ८ टक्क्यांनी वाढ झाल्याची बाब मान्य केली असून २०१८ ते २०२२ या वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात हे हल्ले झाल्याचे मान्य केले. *(वृत्तसंस्था)*

**महत्वाची सूचना**

दै. सोलापूर तरूण भारतच्या ४१ व्या वर्धापन दिनामित्त १ ते ६ ऑगस्ट दरम्यान दररोज **'विकसनशील सोलापूर'** ही १२ पानी विशेष पुरवणी प्रसिध्द करीत आहोत. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**



# मालेगाव बॉम्बस्फोट; सर्व ७ आरोपी निर्दोष

**एनआयए कोर्ट : दुचाकी प्रज्ञांची अन् कर्नल आरडीएक्स घेऊन आले या दोन्ही गोष्टी सिद्ध झाल्या नाहीत**

**मंबई, ३१ जुलै-**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात एनआयएच्या विशेष न्यायालयाने साध्वी प्रज्ञासह सातही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात ७ मुख्य आरोपींमध्ये भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि सुधाकर द्विवेदी यांचा समावेश होता.

पीडितांचे वकील शाहिद नवीन अन्सारी म्हणाले- आम्ही एनआयए न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयात अपील करू. या प्रकरणात तपास संस्था आणि सरकार अपयशी ठरले आहे. २९ सप्टेंबर २००८ रोजी मालेगावमध्ये स्फोट झाला होता. यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला होता आणि सुमारे १०० जण जखमी



झाले होते. सुमारे १७ वर्षांनंतर दिलेल्या निकालात न्यायाधीश ए.के. लाहोटी म्हणाले की, तपास यंत्रणा आरोप सिद्ध करू शकलेली नाही, त्यामुळे आरोपींना संशयाचा फायदा मिळावा.

न्यायाधीश लाहोटी म्हणाले की, स्फोट झाला होता, परंतु मोटारसायकलमध्ये बॉम्ब ठेवण्यात आला होता हे सिद्ध झाले नाही. मोटारसायकल साध्वी प्रज्ञा यांच्या नावावर होती हे देखील सिद्ध झाले नाही. कर्नल प्रसाद पुरोहित यांनी बॉम्ब बनवला होता हे देखील सिद्ध झाले नाही. या प्रकरणाचा निर्णय ८ मे २०२५ रोजी देण्यात येणार होता, परंतु त्यानंतर न्यायालयाने तो ३१ जुलैपर्यंत राखीव ठेवला. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाचा प्रारंभिक तपास म हाराष्ट्र एटीएसने केला होता. २०११ मध्ये हा खटला एनआयएकडे सोपवण्यात आला. एनआयएने २०१६ मध्ये आरोपपत्र दाखल केले. या प्रकरणात ३ तपास संस्था आणि ४ न्यायाधीश बदलले आहेत.

### 'भगवा दहशतवाद' हा मतपेटीसाठी रचलेला कट; मुख्यमंत्री फडणवीसांचा काँग्रेसवर गंभीर आरोप



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने 'भगवा दहशतवाद' आणि 'हिंदू दहशतवाद' असे चुकीचे चित्र निर्माण करण्याचा कट रचला होता. त्यांनी संपूर्ण मालेगाव खटला त्याच दृष्टिकोनातून तयार केला होता आणि आज तो कट उघड झाला आहे.''फडणवीस यांनी पुढे म्हटले की, काँग्रेसने केवळ आपल्या मतपेटीसाठी, विशेषतः एका विशिष्ट धर्माच्या मतपेटीसाठी, हे चित्र लोकांसमोर आणण्याचा प्रयत्न केला. सर्व हिंदूंना दहशतवादी ठरवण्याचे काँग्रेसने जे काम केले, त्याचा आज संपूर्ण देश निषेध करत आहे. यावेळी फडणवीस यांनी काँग्रेसने 'हिंदू दहशतवाद' आणि 'भगवा दहशतवाद' यांसारख्या शब्दांचा वापर केल्याबद्दल देशाची माफी मागावी, अशी मागणी केली.

## 'शाळांमध्ये सीसीटीव्हीचे काम तातडीने करा'

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मंबई, ३१ जुलै-**

जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये आता सुरक्षिततेची दृष्टीने महत्वाची पावले उचलली जाणार आहेत. ग्रामविकास व पंचायत राज्यमंत्री जयकुमार गोरे यांनी जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांतील सर्व वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसह शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता, उपस्थिती आणि शिस्तीम ध्ये सुधारणा होण्यासाठी हे तंत्रज्ञान अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी त्यांनी या सूचना जिल्हा परिषद प्रशासनाला दिल्या. तर सीसीटीव्ही बसविण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे ठाणे जिल्हा परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.



## ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला सुधारित आरक्षण लागू

**तभा वृत्तसेवा,**
**नागपूर, ३१ जुलै-**

सरकारने आदिवासीबहुल आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांसाठी सुधारित आरक्षण आणि बिंदूनामावली निश्चित केली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने जारी करण्यात आला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आरक्षण उपसमितीने याबाबत केलेल्या शिफारशीनंतर ही बिंदूनामावली निश्चित करण्यात आली.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाच्या आरक्षणासह नाशिक, धुळे, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, रायगड, चंद्रपूर आणि गडचिरोली या आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांसाठी सुधारित आरक्षण विहित करण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचवण्यासाठी महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्यात आली होती. या समितीमध्ये अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, इतर मागास बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे, आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक ऊईके आदींचा समावेश होता.

या उपसमितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन शासनाने हा निर्णय घेतला आहे. या आठ आदिवासीबहुल जिल्ह्यांम ध्ये ही आरक्षण बिंदूनामावली लागू करण्यात येणार आहे. या जिल्ह्यांमधील इतर मागास वर्ग, तसेच विमुक्त जाती / भटक्या जमाती या प्रवर्गाची प्रचलित आरक्षणाची टक्केवारी आणि लोकसंख्या विचारात घेऊन गट-क आणि गट-ड संवर्गातील सरळसेवा भरतीसाठी सुधारित आरक्षण निश्चित करण्यात आले होते.

### १० टक्के आरक्षणाचा आदेश राज्यात लागू

राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्ग (एसईबीसी) प्रवर्गास शासकीय सेवेतील सरळसेवा पदभरतीस तसेच शैक्षणिक संस्थांतील प्रवेशास १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Precision PRINTS

सस्नेह निमंत्रण

मा. सन्माननीय वाचक

४१वा वर्धापन दिन...

सप्रेम नमस्कार,
गेली ४१ वर्षे 'सोलापूर तरुण भारतने' सोलापूर जिल्ह्यासह मराठवाडा, प.महाराष्ट्र तसेच कर्नाटकात आपल्या राष्ट्रीय विचारांचा ठसा उमटविला आहे. वाचक, हितचिंतक व जाहिरातदार यांच्यामुळेच हे साध्य झाले आहे. मराठवाडा, सोलापूर तसेच नागपूर, मुंबई, पुणे, जळगाव येथेही तरुण भारतच्या माध्यमातून राष्ट्रीय विचार पोहचवित आहोत.
अत्याधुनिक तंत्रज्ञानासह 'प्रिसिजन प्रिंटस्‌ने' कमर्शिअल प्रिंटींग क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.
दै. सोलापूर तरुण भारत, प्रिसिजन प्रिंटस्‌ आदिंचा

॥ वर्धापन दिन ॥

आपले स्नेहांकित

सोलापूर तरुण भारत मिडिया लिमिटेड

श्री. दिलीप यशवंत पेठे (मुख्य समूह संपादक)
श्री. विवेक घळसासी (अध्यक्ष)
श्री. प्रशांत माने (मुख्य संपादक)

संचालक मंडळ, तरुण भारत व प्रिसिजन प्रिंटस्‌ परिवार

* स्थळ *

दि. ६ ऑगस्ट २०२५, सायं. ६ ते ९ पर्यंत
दि सोलापूर इंडस्ट्रियल को-ऑप. इस्टेट सोसायटी फंक्शन हॉल, तरुण भारत प्रेसच्या मागे, होटगी रोड, सोलापूर.



KOTHARI AGRITECH PVT. LTD.
Registered Office : 8516/11, Level 3, Sun Plaza, Subhash Chowk, Murarji Peth, Solapur- 413 001 (MH)
Corporate Office : Ramsukh House, 203, Level 2, Near Thube Park, Ganesh Khind Road, Shivaji Nagar, Pune – 411 005, (MH)
#kotharigroup
1800 120 4343
954 555 7159
www.kotharigroupindia.com
Scan to Visit Website
कोठारी ग्रुप तर्फे तरुण भारत परिवारास ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

## अग्रलेख...

# राष्ट्रसमर्पित मातृहृदयी जीवनाची अखेर..

राष्ट्र सेविका समितीच्या चतुर्थ प्रमुख संचालिका प्रमिलताई मेढे यांच्या निधनामुळे एका राष्ट्रसमर्पित मातृहृदयी जीवनाचा आज अंत झाला आहे. आपले राष्ट्र, आपली माणसे व समिती यांचाच विचार करीत जवळजवळ सात दशके समितीच्या सेविका म्हणून त्या जगल्या. अखेरचा श्वासही त्यांनी अशा दिवशी घेतला, ज्यादिवशी भारतीय राजकारणात 'भगवा आतंकवाद' हा शब्दप्रयोग निष्प्रभ झाला. ज्या मालेगाव बॉम्बस्फोटाच्या निमित्ताने 'भगवा आतंकवाद' शब्द भारतीय राजकारणात रुजविला गेला, त्या बॉम्बस्फोटातील सर्व आरोपींना न्यायालयाने मुक्त केले आणि एकप्रकारे या अनुचित अस्तित्वहीन संकल्पनेवर संपूर्णपणे फुली मारली. प्रमिलताई यांनी शेवटचा श्वास घेतला, त्याच दिवशी अंतराळ क्षेत्रातही भारताने नवीन इतिहास प्रस्थापित करून आपला झेंडा संपूर्ण जगभर फडकता ठेवला आहे. एकुणात आपले प्रस्थान त्यांनी ऐतिहासिक दिवशी निश्चित केले, असे म्हणता येईल.

बालपणापासून प्रमिलताई या सेविका होत्या. सेविका म्हणून मिळतील त्या जबाबदाऱ्या स्वीकारीत होत्या. सेविका म्हणून कार्यरत असतानाच त्या बी.ए. बी.टी. झाल्या आणि नागपूरच्या सी. पी. ॲण्ड बेरार विद्यालयात शिक्षिका झाल्या. दोन वर्षे शिक्षिका म्हणून काम केल्यावर त्यांनी केंद्र सरकारच्या डीएजीपीटी कार्यालयात सीनियर ऑडिटर म्हणून नोकरी पत्करली. या कार्यालयातील कामात कोटा पद्धती असल्यामुळे निर्धारित काम पूर्ण केल्यावर ऑफिसबाहेर पडता येत असे. त्याचा फायदा घेत प्रमिलताईंनी समितीचे काम नागपूरमध्ये वाढविले होते. या संपूर्ण कालखंडात त्यांचा मुक्काम त्यांचे बंधू बापू महाशब्दे यांच्या घरी असे. एका टप्प्यावर त्यांनी ठरविले की, आता घरी न राहता आपल्याला प्रचारकी जीवनाचा अंगीकार करायचा आहे. त्यामुळे प्रमिलताई १९६५ साली अहिल्या मंदिरात म्हणजेच समितीच्या मुख्यालयात राहायला आल्या. त्यांची कर्मस्थळी असलेल्या याच भवनात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. प्रमिलताईंनी प्रचारक जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा बापूंच्या घरातून निघणे हा कठोर आणि कठीण निर्णय होता. बापूंच्या आई या निर्णयाविरुद्ध होत्या. बापूंनी अतिशय स्पष्टपणे सांगितले होते की ही अहिल्या मंदिरात जाणारच असेल तर तिने तुझ्या मृत्यूनंतर जावे असा तुझा आग्रह का?...तसे झाले तर लोक म्हणतील की, आई गेल्यावर भावाने आणि वहिनीने तिला घालविले. असे होऊ नये म्हणून तुझ्या समोरच तिला राष्ट्रकार्यासाठी जाऊ दे. ती राहील अहिल्या मंदिरात आणि ऑफिस संपल्यानंतर तुला भेटायला येत जाईल. यानंतर १९६५ साली प्रमिलताई अहिल्या मंदिराच्या रहिवासी झाल्या आणि मग सुरू झाला वंदनीय मावशी म्हणजेच मावशी केळकर यांच्यासोबतचा त्यांचा प्रवास. वं. मावशींची पत्रेही प्रमिलताई तयार करीत. अत्यंत वळणदार व सुरेख अक्षर आणि नेमकेपणा याबद्दल ती पत्रे ओळखली जात. त्याच्या मागे प्रमिलताई होत्या हे मात्र अन्य कुणालाही ज्ञात नव्हते. अहिल्या मंदिरात त्यांच्यावर विविध जबाबदाऱ्या आल्यात. १९७८ पासून म्हणजे आणिबाणी संपल्यानंतर जवळजवळ २५ वर्षे २००३ पावेतो त्या अखिल भारतीय प्रमुख कार्यवाहिका होत्या. या जबाबदारीसह त्यांनी संपूर्ण भारतभर सतत प्रवास केला. उत्तर प्रदेश आणि जम्मू-काश्मीर या भागावर त्यांचे विशेष लक्ष होते. त्याचे विशेष दायित्व प्रमिलताईंवर होते. त्या साधारणतः ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये प्रवासाला निघत आणि फेब्रुवारीमध्ये समितीच्या अखिल भारतीय बैठकीसाठीच नागपूरला परत येत. बैठक संपली की पुन्हा प्रवासाला निघत. पण, या संपूर्ण प्रवासात त्या इतके नेमके सामान घेऊन जात, की कधीही कोणतेही सामान त्यांना अन्य गावाला पाठवावे लागले नाही. वातावरणातील कोणताही बदल त्या सहजतेने स्वीकारीत. २००३ च्या फेब्रुवारीत त्यांच्यावर सहप्रमुख संचालिका ही जबाबदारी आली आणि २२ जुलै २००६ रोजी त्या प्रमुख संचालिका झाल्या. समितीच्या कामासाठी त्यांनी इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, दक्षिण आफ्रिका, श्रीलंका या देशांचाही प्रवास केला. या सर्व प्रवासांत त्यांनी नऊवारी पातळ हा आपला भारतीय आणि महाराष्ट्रीय पोशाख कधीच बदलला नाही. प्रमिलताईंचे वैशिष्ट्य असे की, त्या हजारो स्वयंसेवक आणि समितीच्या सेविकांचे मातृस्थान होत्या. मनातील सर्व गोष्टी बोलून टाकण्याचे आणि दिलाशाचे शब्द ऐकण्याचे ते हक्काचे स्थान होते. म्हणतात ना की 'माय मरो पण मावशी जगो'; ते प्रमिलताईंसाठी शंभर टक्के लागू होते. मातृत्वाला आपल्या चिंतनातून त्या सर्वश्रेष्ठ स्थान देत असत. घरोघरी आदर्श माता झाल्या तरच राष्ट्राचा विकास होईल हे त्या आवर्जून सांगत. जननी, जन्मभूमी, गंगामाता, गीतामाता, गोमाता, तुलसी माता, भारत माता अशा अनेक मातांची संकल्पना आपल्या देशात व संस्कृतीत आहे, हे त्या आवर्जून प्रत्येक भाषणातून सांगायच्या. स्त्री म्हणजे देशाची व घराची प्राणशक्ती आहे, असे प्रतिपादन त्या करीत असत. त्यामुळेच महिलांनी कसे वागावे, कसे दिसावे, समाजात कसे वावरावे याबाबतही त्या अत्यंत आग्रही होत्या. भारतीय श्रीनिकेतन नागपूर व जबलपूर या शैक्षणिक प्रकल्पांच्या त्या प्रमुख मार्गदर्शक होत्या. त्यातूनही स्त्रीची प्रतिमा तेवढीच उज्ज्वल आणि उत्तम, शालीन राहील याकडे त्यांचा कटाक्ष होता. पंजाबमध्ये खलिस्तानी अतिरेक्यांच्या कारवाया सुरू असताना मोगा येथील संघ शाखेवर गोळीबार करून अतिरेक्यांनी स्वयंसेवकांचे प्राण घेतले. त्यामुळे वातावरण खूपच तणावपूर्ण झाले होते. पंजाबमध्ये जाणे आव्हानात्मक असतानाही प्रमिलताईंनी नागपूरच्या पाच सेविकांना मोगा येथे पाठविले. त्या तेथे स्वयंसेवकांच्या परिवारात राहिल्या आणि संपूर्ण देशातील मातृशक्ती तुमच्यासोबत असल्याचा विश्वास त्या सेविकांनी तिथल्या कुटुंबांना दिला. त्यांच्या मातृहृदयाची याशिवाय आणखी कोणती साक्ष द्यायला हवी?

वं. मावशी या त्यांच्या प्रेरणास्रोत. वं. मावशींच्या जीवनावरील प्रदर्शनी घेऊन त्यांनी २६६ दिवसांची भारत परिक्रमा केली. देशभरातील ३२ प्रांतांत २८ हजार किलोमीटर्स प्रवास करून १०७ जागांवर त्यांनी ही प्रदर्शनी लावली. या प्रवासात त्यांनी अनेक सार्वजनिक सभांमध्ये भाषणे दिलीत. अनेक शैक्षणिक संस्थांना भेटी दिल्या. शैक्षणिक परिसंवादांत भाग घेऊन वं. मावशींच्या कर्तृत्वाची जाणीव जगाला करून दिली. २२ जुलै २००६ या दिवशी त्या राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका झाल्या. 'माननीय प्रमिलताईं'च्या त्या 'वंदनीय प्रमिलताई' झाल्या. त्या दिवशीही त्यांच्या मनात खूप उल्हास होता असे नाही. तशीच स्थितप्रज्ञता २० जुलै २०१२ रोजीही होती. जेवढ्या सहजतेने त्यांनी दायित्व स्वीकारले होते, तेवढ्याच सहजतेने त्या दायित्वमुक्त झाल्या. त्यानंतरही जिथे काही कमी तेथे आम्ही अशाच पद्धतीने त्या समितीच्या सेविका म्हणून जगत राहिल्या. प्रकृती साथ देईनाशी झाल्यावर त्यांनी प्रवास थांबविला. अहिल्या मंदिरात पूर्वांचलातील बालिकांसाठी आणि मुलींसाठी जे वसतिगृह चालविले जाते, त्याची त्या काळजी घेऊ लागल्या. तिथल्या मुलीही अगदी सहजतेने मातृहृदयी प्रमिलताईंना बिलगत असत व मनातील विविध स्पंदने त्यांना सांगत असत. त्या लहान मुलींना कुटुंबाची, आई-वडिलांची आठवण येऊ देऊ नये याची पूर्ण दक्षता प्रमिलताई घेत असत. वसतिगृहातील पूर्वांचलातील या बालिकांना आणि मुलींना एखाद्या पालकासोबत सुटीच्या काळात घरी पाठविले जात असे आणि तेच पालक सुटी संपल्यावर त्यांना घेऊन नागपुरात येत असत. या मुलींना व पालकांना रेल्वेच्या चाईल्ड हेल्पलाईनने उतरवून घेतले, त्यावेळी प्रमिलताई खूप अस्वस्थ झाल्या होत्या. अशाप्रकारच्या कायद्यांतून रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थांना त्रास दिला जाऊ नये, अशी व्यथा त्यांनी तरुण भारतच्या माध्यमातून सरकारसमोर मांडायला सांगितले होते. त्यासाठी त्यांनी तरुण भारतने लिहिलेल्या अग्रलेखाची सरकार दरबारी नोंद घ्यायला लावली. या प्रसंगानंतर कधीही वसतिगृहाच्या मुलींना अशाप्रकारे गाडीमधून उतरविले गेले असे झाले नाही. वयोमानाप्रमाणे प्रमिलताईंची प्रकृती खालावू लागली होती. दोनदा पडल्यामुळे शस्त्रक्रिया कराव्या लागल्या होत्या. त्याचा परिणाम त्यांच्या घरगुती भेटीगाठी व सार्वजनिक कार्यातील उपस्थितीवर झाला होता. मात्र, त्यांच्या बौद्धिक जागरूकतेवर आणि प्रखर सामाजिक जाणिवांवर शेवटपर्यंत कुठलाही परिणाम झाला नव्हता. गेल्या तीन महिन्यांपासून त्या बिछान्याला खिळल्या होत्या; पण त्याही अवस्थेत त्यांच्या भेटीगाठी सुरू होत्या. त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते, की मला कुठल्याही हॉस्पिटलमध्ये किंवा जीवन वाढविणाऱ्या प्रणालीवर कधीही ठेवू नका. मृत्यूच्या दिवशीही सकाळी समितीची प्रार्थना वगैरे आटोपून त्यांनी अतिशय शांतपणे शेवटचा श्वास घेतला आणि एका राष्ट्रसमर्पित जीवनाचा अंत झाला. जीवन देशाला अर्पण करणे म्हणजे काय असते याचा आदर्श प्रमिलताईंनी जीवनातून आणि मृत्यूतही घालून दिला. त्यांची शेवटची इच्छा देहदान करण्याची होती. त्यानुसार त्यांनी आपल्या कुडीचा पुढील पिढीला ज्ञानासाठी उपयोग व्हावा असा मार्ग स्वीकारला. अशा राष्ट्रसमर्पित जीवनाला दै. तरुण भारत व तरुण भारतचे प्रकाशन करणाऱ्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

---

## प्रासंगिक

**दिनेश गुणे**

# कलंकशुद्धीचा मुहूर्त

कोणत्याही एखाद्या न केलेल्या गुन्ह्याची कबुली देण्याकरिता अनन्वित अत्याचार, वेदना आणि मानसिक दबाव सोसूनही जी मने खंबीर राहतात आणि आपल्या निर्दोषत्वाशी प्रामाणिक राहून केवळ मानसिक दृढतेने अत्याचार सहन करतात, त्यांच्या प्रामाणिकतेची न्याय कदर करतो, हे मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील सातही आरोपींच्या निर्दोष मुक्ततेवरून आज पुन्हा एकदा सिद्ध झाले. केवळ राजसत्तेच्या हुकूमाची ताबेदारी करण्याच्या उद्देशाने कोणासही उचलावे आणि एखाद्या गुन्ह्यात आरोपी म्हणून तुरुंगात डांबून गुन्ह्याची कबुली वदवून घेण्यासाठी त्याच्यावर असह्य अत्याचार करावेत ही तपास यंत्रणांची पद्धती यापुढे न्यायाच्या तराजूत टिकणारही नाही, हेदेखील सिद्ध झाले. सतरा वर्षांपूर्वी, २९ सप्टेंबर २००८ च्या रात्री साडेनऊच्या सुमारास मालेगावातील एका चौकात झालेल्या भीषण बॉम्बस्फोटात मृत्यू पावलेल्या दुर्दैवी जीवांच्या नावावरून पुढे तपासाच्या राजकारणाने जी वळणे घेतली, त्यामुळे राजकारणाचा एकूणच स्तर पुढच्या काळात उघड होत गेला आणि जातिधर्माच्या नावाने केल्या जाणाऱ्या राजकारणातून कोणाही एका समाजसमूहास अकारण बदनाम करून त्याविरोधात गैरसमजांचे विष पेरण्याचा विमर्श किती खालचा थर गाठू शकतो, हेही उभ्या देशाने अनुभवले. या स्फोटात सय्यद अहमद, मुश्ताक शेख युसूफ, शेख रफिक शेख मुस्तफा, फरहीन शेख लियाकत, इरफान झियाउल्लाह खान, हारून मोहंमद शाह या नागरिकांचा बळी गेल्यानंतर लगेचच तपास यंत्रणांची चक्रे ज्या वेगाने एकाच दिशेने फिरली, ते पाहता, आरोपी निश्चित करण्याची काही योजनापूर्वक मोहीम हाती घेतल्याचा संशय व्यक्त केला जात होताच, पुढे या गुन्ह्याचे सूत्रधार, गुन्हेगार आणि साथीदार म्हणून जी नावे तपास यंत्रणांच्या शोधमोहिमेतून पुढे येऊ लागली, तसतसा हा संशय बळावतही गेला आणि प्रत्यक्ष आरोपी म्हणून ज्यांना ताब्यात घेण्यात आले, तेव्हा त्या संशयावर शिक्कामोर्तबही झाले. एवढेच नव्हे, तर हा बॉम्बस्फोट हिंदू दहशतवाद्यांनी घडविला, असा एक विमर्शदेखील मांडला जाऊ लागला. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री पी. चिदम्बरम आणि सुशीलकुमार शिंदे, दिग्विजय सिंह आदी नेत्यांनी तर त्याचे भगवा आतंकवाद असे नामकरणही करून टाकले आणि हिंदू समाजातही आतंकवादी कारवाया घडविणारे माथेफिरू असल्याचा सिद्धांत मांडला जाऊ लागला. त्याआधी देशात जेव्हा जेव्हा दहशतवादी कारवाया घडविल्या गेल्या, त्यामागे पाकिस्तानचा हात असल्याच्या आणि या दहशतवाद्यांना पाकिस्तानातून शस्त्रपुरवठा व प्रशिक्षण पुरविले गेल्याची बाब स्पटपणे दिसू लागल्यानंतरही राजकारणातील सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालची जी मांजरे त्या दहशतवाद्यांच्या धर्माचा उल्लेख करण्यास कचरत होती, त्यांना अचानक हिंदू दहशतवादाचा साक्षात्कार झाला आणि दहशतवादाला हिंदूंचा भगवा रंगदेखील देऊन टाकला गेला. दहशतवादास धर्म नसतो हे खरेच आहे. दहशतवादास रंगदेखील नसतो हेदेखील खरे आहे. पण मालेगावच्या घटनेअगोदर घडलेल्या दहशतवादी कारवायांच्या काळात तशी आग्रहपूर्वक चर्चा करणाऱ्यांनी अचानक दहशतवादास भगवा रंग आणि हिंदू धर्म चिकटवून टाकला आणि देशाच्या व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संवेदनशील व महत्त्वाच्या मुद्यावरही राजकारण कसे करावे याचा वस्तुपाठही आखून टाकला.

मालेगावच्या स्फोटात आरोपी ठरविल्या गेलेल्या भाजपच्या माजी खासदार साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, रमेश उपाध्याय, अजय राहिलकर, सुधाकर चतुर्वेदी, समीर कुलकर्णी आणि सुधाकर धर द्विवेदी या सातही जणांना निर्दोष ठरवून गुरुवारी एनआयए न्यायालयाने त्यांची मुक्तता केली आणि सतरा वर्षांपासून भगव्या दहशतवादाच्या नावाने पसरविल्या गेलेल्या एका खोटारडेपणाचा मुखभंग झाला. काँग्रेसचे तत्कालीन केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी हिंदू दहशतवादाचा उल्लेख केल्यानंतर त्याचा पुनरुच्चार करण्याच्या अहमहमिकेत काँग्रेसी राजकारणाचा असा वारसा असलेल्या अनेकांनी भाग घेतला होता. पुढे सुशीलकुमार शिंदे यांच्या राजकारणाला ओहोटी लागली, त्यांच्यावर निवृत्तीची वेळ ओढवली आणि काँग्रेसच्या संधिसाधू राजकारणातील आपली उपयुक्तता संपल्याचा साक्षात्कार झाल्यानंतर त्यांनी भगव्या आतंकवादाचा विमर्श प्रस्थापित करण्याच्या आपल्या कृतीचा पश्चात्ताप व्यक्त केला ही बाब वेगळी, पण केवळ शिंदे यांच्या दिलगिरीमुळे हिंदू समाजावर उडविले गेलेले हे शिंतोडे स्वच्छ होणार नव्हते. एनआयए न्यायालयाच्या गुरुवारच्या निकालामुळे आता ते पूर्ण झाले असून सहिष्णुतेच्या संस्कारांचा वारसा ल्यालेल्या हिंदू समाजावर सरसकटपणे लादला गेलेला हा हीन आरोप पुसला गेला आहे. गुन्हेगारीचा आरोप असलेल्यांवरील आरोपांची न्यायालयाकडून शहानिशा केली जाते, तपास यंत्रणांना समोर मांडलेल्या साक्षी, पुराव्यांची छाननी केली जाते आणि न्याय व्यवस्था आपला निष्पक्ष निर्णय देत असते. या बॉम्बस्फोटानंतर तत्कालीन सत्ताधाऱ्यांनीच संपूर्ण हिंदू समाजासच दहशतवादाचा रंग देऊन एकतर्फीपणे दोषीदेखील ठरवूनही टाकले. सुशीलकुमार शिंदे यांनी याबाबत दिलगिरी व्यक्त करताना या हीन राजकारणाचा उलगडा केला आहे. भगवा आतंकवाद सुरू होत असल्याचा दावा करण्यासाठी पक्षाकडूनच संकेत मिळाले होते, असा खुलासा करून शिंदे यांनी या बेफाम आरोपाच्या कर्तेपणापासून स्वतःस दूर केले असले, तरी भगवा आतंकवाद हा शब्द रुजविण्याचे काँग्रेसचे धोरणच होते, हे त्यांच्या त्या गौप्यस्फोटातूनही स्पष्ट झाले होते.

साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर आणि कर्नल पुरोहित यांच्यावर लादले गेलेले आरोप सिद्ध झालेच नाहीत, तर या गुन्ह्याचा पंचनामादेखील योग्य पद्धतीने झाला नाही, काही वैद्यकीय प्रमाणपत्रांमध्ये फेरफार झाल्याचे निदर्शनास आले, तर स्फोटासाठी जी दुचाकी वापरली गेल्याचा तपास यंत्रणांचा दावा होता, ती दुचाकी साध्वी प्रज्ञा सिंह यांच्या मालकीची असल्याचा दावाही सिद्ध झाला नाही. अन्य अनेक बाबींतून तपास यंत्रणांनी रचलेले कथानक न्यायालयासमोर टिकाव धरू शकलेले नाही, हेही या निकालातून स्पष्ट झाले आहे. साध्वी प्रज्ञा सिंह यांच्यावर तपासादरम्यान झालेल्या शारीरिक आणि मानसिक अत्याचाराच्या खुणा या काळात स्पष्ट झाल्या आणि तपास यंत्रणांना हवे तसे कबुलीजबाब देण्यासाठी संशयित म्हणून ताब्यात घेतलेल्यांना कोणत्या स्थितीस सामोरे जावे लागते, हेही या निमित्ताने उघड झाले. या खटल्याच्या तपासादरम्यान सुनावणीसाठी न्यायालयाकडून बोलावणे आल्यानंतर प्रज्ञा सिंह यांनी गेल्या वर्षी समाजमाध्यमावरून आपले छायाचित्र प्रसिद्ध केले होते. काँग्रेसी सत्तेने केलल्या अनन्वित अत्याचाराची फळे केवळ काही काळापुरती नव्हे, तर आयुष्यभर आपल्यासोबत वेदनांच्या रूपाने राहणार आहेत, असे त्यांनी त्यामध्ये म्हटले होते. सुजलेला चेहरा, मेंदूला आलेली सूज, दृष्टिदौर्बल्य, श्रवणशक्तीची हानी आणि सततच्या औषधोपचारांच्या परिणामांमुळे जडलेल्या शारीरिक व्याधींसोबत आपण जगत असून या परिस्थितीत जिवंत राहिले, तर मी न्यायालयातील सुनावणीस हजर राहीन अशी हतबल भावना त्यांनी व्यक्त केली होती. अशा यातनामय तुरुंगवासात जर त्यांचे मानसिक धैर्य संपुष्टात आले असते व गुन्हा कबूल करण्याचा दबाव झेलला नसता, तर या यंत्रणेने आणखी किती जणांना गुन्हेगार ठरविले असते याची कल्पनाच करवत नाही, अशा शब्दांत उमा भारती यांनी माध्यमांसमोर व्यक्त केलेल्या भावना पाहताना अनेकांना अश्रू आवरणे शक्य झाले नव्हते. केवळ राजकारणातून या गुन्ह्यास वेगळे वळण देण्याचे असे प्रयत्न राजकीय संस्कृतीसमोरील आव्हाने ठरतात, यात शंका नाही. मी माझ्या पक्षाच्या सांगण्यावरूनच भगवा दहशतवाद हा शब्द तेव्हा वापरला होता, अशी कबुली सुशीलकुमार शिंदे यांनी दिली आहेच, पण, आपल्या पक्षाने, म्हणजे काँग्रेसने हा शब्द रुजविण्याचे कारण काय असावे ते मात्र आपल्यास ठावूक नाही, असेही त्यांनी गेल्या वर्षी एका मुलाखतीदरम्यान म्हटले होते. अनेक दशके काँग्रेसी राजकारणात आणि संस्कृतीत मुरलेल्या शिंदे यांना पक्षाची यामागील नेमकी नीती ठावूक नसावी हे आश्चर्यकारक आहे. आता या आरोपाचे मळभ दूर होऊन भगव्या परंपरेवरील कलंकशुद्धीचा दिमाखदार मुहूर्त साधला गेला आहे, ही आनंददायक बाब आहे.

---

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# गाव ते गावच करी राव..!

शहरांनी स्पर्धा सुरू केली. गावांनीही कूस बदलली असली तरी गावाने आपल्या सीमा मात्र बदलल्या नाहीत. माणुसकीचे दर्शन शहराच्या तुलनेत आजही गावखेड्यात झाल्याशिवाय राहत नाही. गोष्ट तशी फारच छोटी असली तरी गावात मनाचा मोठेपणा नांदत असल्याची अनेक उदाहरणे आहेत. श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचा अमृत महोत्सव व दै. तरुण भारतच्या शताब्दी वर्षानिमित्त विविध पर्यावरणविषय अभियान राबवण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात बीज अंकुरे अंकुरे अंतर्गत वृक्षांच्या बिया जमा केल्या आणि त्या वाटल्याही. त्या बिया सहज फेकून दिल्या तरी कुठे ना कुठे उगवेलच. दुसरे अभियान वट सावित्रीनिमित्त वट रोपटे वाटप तेवढ्याच ताकदीने विदर्भात राबवण्यात आले. या वट रोपटे वाटप अभियानातून जमलेल्या मैत्रीनेच आज हा लेखनप्रपंच.

वर्धेनजीक असलेल्या आंजी मोठी येथील सामाजिक वनीकरण विभागाचे अधिकारी बावने यांच्याशी संपर्क झाला. त्यांनी शासकीय नर्सरीतील वडाचे रोपटे उपलब्ध करून दिले. आता तरुण भारतच्या अभियानातील तिसरा आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे मंदिर स्वच्छता अभियान आणि तुळस लावा पर्यावरण वाचवा हे अभियान. तरुण भारत तुळशी रोपटे जमा करून त्याचे वाटप करणार आहे. या अभियानात तरुण भारतली मिळालेली तुळशीची रोपटे आम्ही दोन दिवसांपूर्वी आंजी येथील वनविभागाच्या नर्सरीत नेऊन दिली. वेळ साधारण सकाळी ९.३० वाजताची. आम्ही दाम्पत्य नर्सरीत पोहोचलो. जवळचे तुळशीचे रोपटे तेथील कर्मचाऱ्याकडे देत होतो. नर्सरीत काम करीत असलेल्या महिला एकत्र बसून न्याहारी करीत होत्या. काही वेळात त्यापैकी एका महिलेने, 'या ना मॅडम जेवाले' एवढेच वाक्य उच्चारले आणि गावातील माणुसकीचे दर्शन झाले. प्रसंग छोटा असला तरी रोजीने काम करणाऱ्या अनोळखी महिलांनी या जेवाले म्हणण्याची दानत दाखवली जी शहरात क्वचितच पाहायला मिळते. शहर स्वप्ने विकते, गाव झोप देतं हे वाक्य ऐकताना वाटते, खरेच का? पण जरा खोलवर विचार केला की लक्षात येते. शहर आणि गाव यांच्यात फक्त भौगोलिक अंतर नाही, तर जीवनशैली, संस्कृती, मानसिकता आणि अर्थकारण यांचाही संघर्ष दडलेला आहे. भारतातील जवळपास निम्मी लोकसंख्या □ सुमारे ६६ कोटी शहरांत राहते आणि दरवर्षी जवळपास एक कोटी लोक गावातून शहरात स्थलांतर करतात. शहर ही बाजारपेठ आहे ती स्वप्न विकते. फक्त स्वप्न विकत नाही तर स्पर्धाही विकते. तिथे प्रत्येक गोष्टीची किंमत मोजावी लागते. पण गाव वेगळे असते. अजूनही भारताच्या सुमारे ५२ टक्के लोकसंख्या गावात राहते. महाराष्ट्रात सुमारे ६ ते□६.५ कोटी लोक अजूनही शेत, नदी, ओसरी, वाडा अशा गावांच्या घट्ट विणीत राहतात. तिथे संध्याकाळी सूर्यास्त झाला की घराच्या ओट्यावर, ओसरीवर माणसे जमतात. वाऱ्याच्या गार झुळकीत दिवसभराच्या कामाची चर्चा, किस्से, गप्पा चालतात. रात्री अंगणात पडले की गाढ झोप लागते. हेच तर गाव देतं नीट, खोलवर झोप. गावातही चिंता असतात. शेती, नापिकीचा धोका, शिक्षण आणि आरोग्याच्या मर्यादा. हिंगणघाट तालुक्यात सावली (वाघ) येथे एका माय- लेकाला राहायला घर नव्हते तर त्याच गावातील रायपुरे नामक व्यक्तीने त्यांना राहायला छोटे का होईना पण छत दिले होते. गावात कुणी आजारी पडले तर विचारायला शेजारच्या घरातील लोक येतात. शहरात अनेकदा शेजाऱ्याचे नाव सुद्धा माहीत नसते. शहरात जास्त पगार मिळतो. पण, त्याच्याशी जुळवून घेताना मनावरचा भारही वाढतो. आरोग्याच्या दृष्टीनेही गाव जास्त समृद्ध आहे. शहरात माणूस एकटा पडतो; गावात एकटेपणा येत नाही. मानसिक ताण वाढतो, तेव्हा माणसाला गरज असते बोलण्याची, ऐकवण्याची आणि गावात ती ऐकणारी माणसे असतात. गावात अजूनही शुद्ध हवा, मोकळे आकाश, हिरवा शिवार दिसतो. हीच हवा शरीराला आणि मनाला निवांत झोप देते. शहर आणि गाव यातले अंतर फक्त पगाराचे नाही. गाव देतं झोप, कारण गावाकडे अजूनही वेलकम होम म्हणणारी दारं सताड उघडी असतात. ओळखीचे वडाचे झाड असते, देवघर असते, शेणाने सारवलेली ओसरी असते जिथे शांत बसता येते. गावाचे जगणे साधे आहे. पण, त्यात समाधान दडले आहे. शहर माणसाला उंच उडायला शिकवते, गाव त्या उंच झेपेनंतर घरी परत आल्यावर ऊबदार कुशीत घेते. आणि म्हणूनच, शहर स्वप्ने विकते, गाव झोप देतं... तिथे उपाशी कोणाला पाहिले जात नाही... या जेवाले म्हटल्याशिवाय घास घेतला जात नाही आणि घ्या देवाचं नाव म्हटल्याशिवाय राहत नाही. गाव ते गावच राव...

९८८१९०३७६५

---

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# आमदारांना झालंय तरी काय?

अलिकडे टीव्ही लावला किंवा वर्तमानपत्र उघडले तर काय दिसते? आमदारांच्या मारामाऱ्या, महायुती सरकारमधील रुसवेफुगवे. महाराष्ट्रात याशिवाय काहीच घडत नाही का? असा कोणाचाही समज होईल. विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरू असताना हनी ट्रॅपची चर्चा सुरू झाली. कधी नव्हे ते दोन आमदारांच्या समर्थकांचे युद्ध विधानभवन परिसराने पाहिले. कोणी आमदार रमी खेळण्यात गुंग आहे तर कोणी कँटिन कर्मचाऱ्याला ठोकतो आहे. ऊठसूट आमदार प्रतिस्पर्ध्यांच्या भानगडी काढताहेत. आपल्या लोकप्रतिनिधींना झालंय तरी काय? महायुतीला या कामासाठी जनादेश मिळालेला नाही. सरकार चालवणाऱ्या महायुतीच्या आमदारांनाही जबाबदारीचे भान सुटावे यासारखी दुर्दैवाची गोष्ट नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात विकासाची गंगा येऊ घातली आहे. येत्या पाच वर्षांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक लाख कोटी डॉलर्सवर पोहोचेल असा अंदाज 'मॉर्गन स्टॅनली' या प्रख्यात आंतरराष्ट्रीय संस्थेने नुकताच व्यक्त केला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षातील पहिल्या नऊ महिन्यांत एक लाख ३० हजार कोटी रुपये एवढी विदेशी गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात आली आहे. विरोधी पक्ष हे सांगणार नाही. विरोधकांकडे ठोस मुद्दाच नाही. म्हणून मग ते वावड्या उठवत आहेत. खोटे नॅरेटिव्ह पसरवत आहेत. विरोधी पक्ष म्हणून हे ते करणारच. विरोधकांच्या डावपेचांना सत्तेतल्या महायुतीचे आमदार बळी पडत आहेत का? असे नसते तर कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा होणार की नाही हा विषय तब्बल सात दिवस चालला नसता.

विधान परिषदेत कामकाज सुरू असताना माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी खेळत होते असा व्हिडीओ शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी व्हायरल केला. विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले. पण सभागृहात मोबाईल पाहणे हा गुन्हा आहे का? हेच मुळात स्पष्ट नाही. काही वर्षांपूर्वी कर्नाटक विधानसभेत काही आमदार मोबाईलवर फिल्म पाहताना पकडले गेले होते. त्यावरून देशभर गदारोळ झाला. पण कोणाचाही राजीनामा झाला नाही. कोकाटेंचे केवळ तंबीवर निभावले. मुळात कोणता विषय किती ताणून धरायचा याचे भान साऱ्यांनीच ठेवले पाहिजे. पण राजकारण आडवे येते. विरोधकांना अजितदादांचे मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायचा होता. त्यासाठी मुंडेंचे निकटवर्ती वाल्मीक कराड यांच्याविरोधात रान पेटवले गेले. मुंडेंचा राजीनामा झाला आणि वाल्मीक कराड हा विषय मागे पडला. महाविकास आघाडी सरकारच्या काळातला सचिन वाझे तुम्हाला आठवत असेल. हा वाझे टार्गेट बनला तेव्हा 'वाझे ओसामा बिन लादेन आहे का?' असा प्रश्न तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला होता. 'त्याला आधी फाशी द्यायची आणि नंतर तपास करायचा का?' असा प्रश्न तेव्हा करणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत आज चार मंत्र्यांचा राजीनामा मागत सुटले आहेत. राऊत म्हणा, उद्धव ठाकरे म्हणा किंवा रोहित पवार म्हणा, यांना विचारले पाहिजे की, अशी वेळ तुमच्यावर आली तेव्हा तुम्ही काय केले? आता एकच 'भोंगा' वाजतो. महाआघाडीच्या काळात दोन दोन भोंगे वाजायचे. संजय राऊत आणि राष्ट्रवादीचे मंत्री नवाब मलिक रोज खोटेनाटे आरोप घेऊन मीडियापुढे यायचे. अशाच एका प्रकरणात या नवाब मलिक यांनी फडणवीसांना छेडले होते. फडणवीसांनी असा ॲटम बॉम्ब लावला की, या नवाबाला अनेक महिने तुरुंगात बसावे लागले. ईडीने मलिक यांना उचलले तेव्हा शरद पवार म्हणाले होते, ते आठवते? 'नवाब मलिक यांना अटक झाली तरी ते मंत्रिपदाचा राजीनामा देणार नाहीत' असे शरद पवारांनी जाहीरपणे सांगितले होते. तेव्हाचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना ही जाहीर थप्पड होती. वादग्रस्त मंत्र्यांवर कारवाई का करीत नाही? असा प्रश्न सामान्य माणसाला सतावत असेल. त्यासाठी नैतिकतेचा आधार दिला जातो. ते साहजिक आहे. पण इथे भाजपच्या पाठिंब्याने महायुतीचे तीन पक्षांचे सरकार आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी हे दोन दोन मित्रपक्ष आहेत. त्यामुळे गुंतागुंत आहे. कोकाटे हे अजितदादांच्या कोट्यातले मंत्री आहेत. 'कोटा' हे या मित्रपक्षांचे मोठे संरक्षक कवच असते. बोलघेवड्या स्वभावामुळे कोकाटे वादग्रस्त अवश्य आहेत. मात्र कामे घेण्यात पुढे आहेत. फडणवीसांनी प्रत्येक खात्याला १०० दिवसांचा कार्यक्रम दिला होता. त्यात पहिल्या पाच खात्यामध्ये कोकाटे यांचे खाते आहे. त्यांनी ५० जीआर काढले, कृत्रिम बुद्धिमत्ता वापरायला सुरुवात केली. पण तोंडाने मार खाल्ला. या महिनाभरात ज्या घटना घडल्या त्यामुळे फडणवीस अस्वस्थ झाले नसते तरच नवल. 'आमदार माजले अशी लोकभावना झाली असल्याचे' त्यांनी सभागृहातच बोलून दाखवले होते. पण त्यात अतिशयोक्ती काय होती? विकासाच्या कामांची चर्चाच कुठे ऐकू येत नाही. कोणाचे डाग चांगले आहेत याची. 'तेरे डाग से मेरे डाग अच्छे है.' १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. त्या घटनेला आज ६५ वर्षे होत आहेत. आतापर्यंतच्या मुख्यमंत्र्यांनी या राज्याला काहीना काही ताकद नक्कीच दिली. पण आता फडणवीसांनी राज्याला विकासाच्या सुपर स्पीडवर आणून ठेवले आहे. वाढवण बंदरासारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प फडणवीस सरकारने मार्गी लावला आहे. समृद्धी महामार्गानंतर शक्तिपीठ महामार्ग होतो आहे. दावोस येथे झालेल्या गुंतवणूक परिषदेत महाराष्ट्रात १५ लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार झाले आहेत. कोणी रमी खेळला किंवा कोणी डुलकी दिली म्हणून विकासाचा रथ थांबणार नाही. पण त्या बहाण्याने आरडाओरडा करून आपण नकळत विरोधकांच्या हातचे बाहुले बनत आहोत हे बेताल वर्तन करणाऱ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. जनतेची निराशा कराल तर जनादेशाचा तो अपमान होईल. 'दिल्लीत नरेंद्र, राज्यात देवेंद्र' अशी घोषणा आपण देतो. फडणवीस हा कामाचा माणूस आहे. तुम्ही त्यांना काम करू देणार नाही तर ते दिल्लीला निघून जातील. फडणवीस, नितीन गडकरी हे नेते कामाला वाघ आहेत. आपल्याला त्यांना सांभाळता आले पाहिजे.



९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## वाचक पत्रे

### राष्ट्र आणि धर्महित जपूया!

भारतीयांसाठी चातुर्मास म्हणजे अतिशय आध्यात्मिक वातावरणाचा, पूजा-पाठाचा आणि धार्मिक साधनेचा विशेष काळ असतो. या काळात अनेक प्रमुख सण येतात. त्यामुळे पूजेसाठी लागणारे विविध साहित्य जसे की उदबत्ती, धूप, दीप इत्यादी बाजारात मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असते. त्यातही उदबत्ती आणि धूप यांना विशेष महत्त्व असते, कारण ते वातावरण शुद्ध करण्यासाठी वापरले जातात. मात्र अलिकडे काही परदेशी संशोधनातून असा दावा करण्यात आला आहे की, उदबत्तीचा धूर सिगारेटपेक्षा जास्त हानिकारक असतो आणि त्यामुळे कर्करोगाचा धोका संभवतो. हे संशोधन साऊथ चायना टोबॅको ग्वांगडोंग इंडस रेल्वे आस्थापनांनी संयुक्तपणे केले आहे. त्यांच्या अभ्यासात उदबत्तीच्या धुराच्या नमुन्यांमध्ये ९९ टक्के अतिसूक्ष्म कण आढळले, जे शरीरासाठी हानिकारक ठरू शकतात, असे निष्कर्ष नोंदवले गेले.

परंतु येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घेणे गरजेचे आहे, हे संशोधन चिनी उदबत्त्यांवर आधारित आहे. चीनमध्ये तयार होणाऱ्या उदबत्त्यांमध्ये रासायनिक व घातक घटकांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. याउलट आपल्या भारतात अनेक आध्यात्मिक संस्था यज्ञातील विभूती, गोमूत्र, औषधी वनस्पती अशा नैसर्गिक आणि आरोग्यदायी घटकांचा वापर करून उदबत्ती तयार करतात. त्यामुळे हे संशोधन भारतीय उदबत्त्यांवर लागू होत नाही. त्यामुळे चातुर्मासातील सणांच्या पृष्ठभूमीवर बाजारात मिळणाऱ्या चायनीज उदबत्त्यांचे आकर्षण टाळावे. फक्त किंमत आणि देखाव्याला भुलून अशा घातक वस्तू खरेदी करू नयेत.

**रमा देशमुख**/नागपूर

●● ●●

### मैत्री भगवान श्रीकृष्ण-सुदामासारखी हवी

वर्षभर विविध प्रकारचे 'डे' साजरे करण्याची नवी पद्धत सर्वत्र रूढ झाली आहे. 'डे' साजरे करणे म्हणजे आठवणींना व समस्या यांना उजाळा देणे होय. परंतु 'डे' साजरे होतात, समस्या तशा राहतात. तेव्हा त्याचा पाठपुरावा करण्याकरिता 'डे'ची प्रथा आहे. सध्या मैत्री दिवस उत्साहात साजरा होतो. मित्र सुद्धा नेहमी बदलत असतात. शाळा, कॉलेज, ऑफिस इतर क्षेत्रांत आपले वेगवेगळे नव्याने मित्र होतात. परंतु जुन्या मित्रांचा विसर पडता कामा नये. मित्रता भगवान श्रीकृष्ण व सुदामासारखी असली पाहिजे. श्रीमंत राजा व गरीब भक्तांचा राजमहालात भगवान श्रीकृष्णाच्या घरी जो आदर, सत्कार झाला, प्रेम कायम टिकून राहिले, त्या प्रेमाची शिकवण आपण मैत्री दिन साजरा करताना लक्षात घ्यावी.



**मुकुंद काकीरवार**/८८०६९९२७७८

●● ●●

### चीनची नाचक्की

अलिकडेच बौद्ध धर्मीयांचे मोठे गुरू दलाई लामा यांनी त्यांचा उत्तराधिकारी त्यांच्या मृत्यूनंतर निवडला जाईल आणि तो चीनच्या बाहेरचा असेल, हे स्पष्ट केल्यामुळे चीनला मोठी चपराक बसली आहे. उत्तराधिकारी निवडीचा अधिकार गेडन फोड्रंग ट्रस्टकडे असल्याचे स्पष्ट करण्यात आले. भारताने दलाई लामा यांची पाठराखण केल्यामुळे या विषयात नाक खुपसणाऱ्या चीनची नाचक्की झाली आहे. कारण हा विषय बौद्ध समुदाय, तिबेटी परंपरा आणि दलाई लामा यांच्या अधिकारातील आहे. दहा वर्षांपूर्वी दलाई लामा यांनी ट्रस्टची स्थापना केली होती. गेल्या वर्षी दलाई लामा यांनी तिबेटची सर्वात पवित्र परंपरा रद्द केली जाऊ शकते किंवा त्यांचा उत्तराधिकारी महिला अथवा चीन बाहेरची व्यक्ती असू शकते, असे वक्तव्य केले होते. जगभरातील तिबेटी बौद्धांकडून दलाई लामा हे पद चालू ठेवावे, असे संदेश आले होते. १९५८ मध्ये तिबेटमधील खम्पा जमातीने उठाव केल्यानंतर ३१ मार्च १९५९ रोजी दलाई लामा यांनी भारतात आश्रय घेतला होता. ऑक्टोबर १९५९ मध्ये चीनमधील कम्युनिस्ट सरकारने लष्करी आक्रमणाद्वारे तिबेटचा ताबा घेतला. तिबेटी बौद्ध परंपरेनुसार दलाई लामा तेथील राज्यकारभार चालवत होते. चीनच्या राजघराण्यांनी ही परंपरा कायम राखली होती. चीनने दलाई लामा यांचे वर्चस्व कमी करण्यासाठी पंचेनलमा यांना बळ दिले होते. भारतात मोठ्या संख्येने राहणाऱ्या आणि जगभरात विखुरलेल्या तिबेटी समुदायातील लोकांना चौदाव्या दलाई लामांच्या वार्धक्याची जाणीव आहे.

दलाई लामांच्या निवडीमध्ये चीनने हस्तक्षेप केला तर त्यांच्यावर आर्थिक निर्बंध लादले जावेत, अशी तरतूद असणारा कायदा अमेरिकेने संमत केला आहे. तिबेटमधील साठ लाख जनता चौदाव्या दलाई लामांची अनुयायी आहेत. भारताने दलाई लामांना आश्रय दिलेला असल्यामुळे त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांची चर्चा भारतात होणे स्वाभाविक बाब आहे. परंतु चीनला ही गोष्ट मान्य नाही. या मुद्यांवरून चीन आणि भारतामध्ये गेल्या काही काळापासून तणाव निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले आहे. तिबेटियन जनतेच्या धार्मिक भावनांचा आदर चीनने ठेवला पाहिजे, ही बाब भारताने चीनला निक्षून सांगण्याची गरज आहे.

**मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

४१ वर्धापन दिन

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## श्री आजोबा ताता गणपती मंडळाच्या अध्यक्षपदी भीमाशंकर झाडबुके

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**
श्री आजोबा ताता गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्ष भीमाशंकर झाडबुके तर उपाध्यक्ष प्रशांत शेलार यांची निवड करण्यात आली. श्री आजोबा ताता गणपती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, सोलापूर ची गणेशोत्सव २०२५-२६ साठी पदाधिकारी निवड बैठक उत्साहात व आनंदी वातावरणात पार पाडली.



या बैठकीत उपस्थित सभासदांम धून उत्सव पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आल्यात यामध्ये सचिव मधुकर गाजूल, सहसचिव आदित्य दुभाषी, खजिनदार अशोक माचान, सहखजिनदार सुमित गड्डम, पुजा प्रमुख अमर रच्चा, प्रसिद्धी प्रमुख रितेश कटकम, सोशल मिडीया प्रमुख राजू कारमपुरी, स्टेज प्रमुख राजू यंनगदुल, सतीश गुर्रम, पुरुषोत्तम मार्चला, सल्लागार समिती बाळकृष्ण मल्याळ, आनंद कटकम, संतोष बोडा, नागेश कासुल, अरुण गाजूल, भास्कर वोड्डुल, मुकेश वल्लाल, पवन गुंडेटी, दिपक भुदत्त, अप्पाशा चांगले महेश जक्कुल यांच्या निवडी करण्यात आल्या.

### महत्वाचे...

## शाळकरी मुलीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**
शाळकरी मुलीचा विनयभंग करणाऱ्या शिक्षकाविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन हनुमंत महादेव नलावडे (वय ५६, रा. सोलापूर) या शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही १९ एप्रिल २०२५ रोजी वार्षिक परिक्षेच्या शेवटच्या दिवशी उशिरा शाळेत पोहचली होती. त्यावेळी तिला एकटीला शाळेतील शिक्षक नलावडे यांनी शिक्षकांच्या पार्किंगमध्ये थांबवून तिच्या खांद्यावर हात ठेऊन तिला आपल्याकडे ओढून घेतले. तसेच ३ जुलै रोजी पिडीतेच्या वर्गावर येऊन तुला काही ज्ञान नाही, तु काही कामाची नाही, आता तू मला चांगली सापडली आहे, तुला मी बघून घेतो असे म्हणून पिडीतेस धमकी देऊन तिच्या बाल मनास लज्जा वाटेल असे कृत्य करून वारंवार पिडीतेचा पाठलाग करून तिला धमकी दिली. त्यामुळे याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात पोक्सो व विनयभंगप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. महिला सहायक पोलिस निरीक्षक संजीवनी व्हट्टे पुढील तपास करीत आहेत.

## एकट्या महिलेच्या घरात घुसून अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**
घरात एकट्या असलेल्या महिलेच्या घरात घुसून तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार करणाऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन अब्दुल खय्यूम इब्राहीम शेख (वय ४८, रा. साई नगर, विवेकानंद केंद्राच्या पाठीमागे, जुळे सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीता ही ७ जून २०२४ रोजी दुपारी घरी एकटीच होती. त्यावेळी खय्यूम शेख हा पिडीतेच्या घरी आला. त्याने पिडीतेला घरामध्ये ढकलून तु मला आवडतेस असे म्हणून बेडरूममध्ये नेले. त्यावेळी पिडीतेने विरोध केल्यानंतर तिला मारहाण करून शेख याने जबरदस्तीने तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर याबाबत कोणाला काहीही सांगितले तर तुझ्या नवऱ्याला व मुलांना जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक मोहन पवार पुढील तपास करीत आहेत.

# रुग्ण पळविण्याच्या रॅकेट प्रकरणाची महिला आयोगाकडून दखल

### कार्यवाही करून अहवाल देण्याचे आयोगाचे मनपा आयुक्तांना आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**
सोलापूर महापालिका रुग्णालयांकडे प्रसुतीसाठी येणाऱ्या महिलांना आशा वर्कर्सकडून खाजगी रुग्णालयाकडे पाठवल्याच्या धक्कादायक प्रकरणाची गंभीर दखल राज्य महिला आयोगाने घेतली आहे. या संदर्भात कार्यवाही करून अहवाल देण्याचे लेखी आदेश राज्य महिला आयोगाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत.सोलापूर महापालिकेच्या विविध प्रसूतिगृहांमध्ये तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी एका खाजगी रुग्णालयाकडे वळविल्याचा धक्कादायक प्रकार काही आशा वर्कर्सकडून झाल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी महापालिकेने दोन खाजगी डॉक्टर्सना नोटीस बजावण्यात आली आहे.




महापालिकेचे शहरात विविध सात ठिकाणी प्रसूतीगृहे आहेत. अशा प्रसूतीगृहांमध्ये गरोदर महिला तपासणीसाठी मोठ्या प्रमाणात येत असतात. अशा महिलांना महापालिकेच्या प्रसूतीगृहांमध्ये प्रसूतीसाठी आणण्याचे काम महापालिकेच्या आशा वर्कर्सकडून अपेक्षित आहे. मात्र खाजगी प्रसुती गृहांच्या आमिषाला बळी पडून २५ ते ३० आशा वर्कर्स हे चक्क महापालिका प्रसुतीगृहात येणाऱ्या गरोदर महिलांना प्रसूतीसाठी चक्क एका खाजगी रुग्णालयाकडे वळवत असल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

रुग्णांच्या या पळवापळवीबाबत माध्यमांमध्ये प्रसारित झालेल्या बातमीची गंभीर दखल राज्य महिला आयोगाने घेतली आहे.याबाबत महिला आयोगाने महापालिका आयुक्तांना पत्र पाठवले आहे. सोलापुरातील एका व्हॉटसअप ग्रुपमध्ये २९४ आशा वर्करपैकी काही आशांच्या मदतीने रुग्ण पळवण्याचे खाजगी डॉक्टर व मनपा आरोग्य कर्मचारी यांचे रॅकेट उघड अशा आशयाच्या बातम्या समाज माध्यमाद्वारे प्रसारीत झाल्या आहेत. त्याची दखल घेतली आहे. दरम्यान, हे प्रकरण अतिशय गंभीर स्वरुपाचे असून याप्रकरणी तातडीने कार्यवाही करुन अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोगास पाठविण्यात यावा, असे महिला आयोगाच्या पत्रात म्हटले आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार समुपदेशक आणि प्रकल्प अधिकारी लक्ष्मण मानकर यांच्या स्वाक्षरीने हे पत्र महापालिका आयुक्तांना पाठवण्यात आले आहे.



## 'हरिभाई'मध्ये तुलसीदास व प्रेमचंद जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**
हरिभाई देवकरण महाविद्यालयात शाळा समिती अध्यक्ष राजेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राचार्य दीपा फाटक यांच्या अध्यक्षतेखाली संत तुलसीदास व मुंशी प्रेमचंद जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशालेचे ज्येष्ठ पर्यवेक्षक हणमंत मोतीबने उपस्थित होते.

यावेळी हणमंत मोतीबने यांनी तुलसीदासांनी भक्तीपर आणि तत्त्वज्ञानात्मक साहित्य सृजन केले. भारतीय संस्कृती आणि साहित्यावर त्यांचा मोठा प्रभाव असून आजही समाजाला प्रेरणा देत आहे. याचप्रमाणे मुंशी प्रेमचंद यांनी गोदान, गबन, सेवासदन, मंगलसूत्र सारख्या कादंबरी व कथेच्या माध्यमातून समाजातील वास्तव्य मांडले. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत योगदान दिले असल्याचे नमूद केले. हिंदी विभाग प्रमुख प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी 'परहित सरिस धरम नहिं भाई' म्हणणारे तुलसीदास व प्रेमचंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकून उपस्थितांचे स्वागत केले. पर्यवेक्षक शांतप्पा कुंभार यानी साहित्य आणि समाज' या विषयावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्या दीपा फाटक यांनी विद्यार्थ्यांनी थोर साहित्यिकांचे विचार आचरणात आणावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षवर्धन पवार यांनी केले तर कु. काजल राठोड हिने आभार मानले. यावेळी पर्यवेक्षक बी. डी. बनसोडे, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. दिलीप फुटाणे, प्रा. सुरेश रेवजे, प्रा. चंद्रकांत जाधव, प्रा. दीपक क्षीरसागर, प्रा. पी. पी.कदम, प्रा. अनपट, प्रा. गवळी उपस्थित होते.


## श्रेयश नर्सिंग होमच्या तपासणीत आढळल्या त्रुटी

### सिझर, सोनोग्राफीसह १८ रजिस्टर घेतले ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**
महापालिका प्रसुतीगृहाकडील रुग्ण खाजगी रुग्णालयात प्रसूतीसाठी पळविलेच्या रॅकेट प्रकरणी महापालिका आरोग्य विभागाकडून अधिक तपास केला जात आहे. दरम्यान, गुरुवारी संबंधित श्रेयश नर्सिंग होमच्या तपासणीत महापालिकेच्या पथकाने सिझर, सोनोग्राफीसह सुमारे १८ रजिस्टर ताब्यात घेतली आहेत. या ठिकाणी अनेक गंभीर त्रुटी आढळल्या आहेत, अशी माहिती महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी दिली.

महापालिकेच्या प्रसूतिगृहामध्ये तपासणीसाठी येणाऱ्या महिलांना प्रसूतीसाठी महापालिकेच्या आशा वर्कर्सकडून खासगी रुग्णालयात वळविण्याचा खळबळजनक प्रकार नुकताच उघडकीस आला. याप्रकरणी नवी पेठेतील श्रेयश नर्सिंग होमच्या दोन डॉक्टर्सना नोटीस बजावण्यात आली आहे. याप्रकरणी श्रेयस हॉस्पिटलचे सुमित सुरवसे आणि श्रद्धा सुरवसे यांना रुग्णालयाची मान्यता रद्द करण्यात का येऊ नये अशी नोटीस बजावण्यात आली. चार दिवसात त्याचा खुलासा देण्याची सूचना केली आहे.

दरम्यान, डॉ. ओम्बासे यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाची अधिक चौकशी महापालिका आरोग्य अधिकारी डॉ. माने यांच्या माध्यमातून महापालिका आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. गुरुवारी श्रेयश नर्सिंग होमची महापालिकेच्या आरोग्य पथकाने केलेल्या झाडाझडतीत सिझर, सोनोग्राफीसह १८ रजिस्टर ताब्यात घेतली. या रजिस्टरमध्ये नियमानुसार आवश्यकता नोंदी घेतल्या नाहीत. रुग्णांच्या संमती पत्रावर नावे नाहीत तर केवळ अंगठा आहे. पूर्ण पत्ता आढळून येत नाही. एका रजिस्टरमध्ये ४० आशा वर्करच्या नावांची नोंद आढळून आल्याचे डॉ. राखी माने यांनी सांगितले. या नर्सिंग होममध्ये बॉम्बे नर्सिंग ऍक्ट तसेच पीसीपीएनडीटी ऍक्टचे उल्लंघन झाल्याचे दिसून आले. मोठ्या प्रमाणात अस्वच्छता दिसून आली. दर्शनी भागात दर फलक नाही. ॲम्बुलन्स तसेच पोलीस हेल्पलाइनचे संपर्क क्रमांक उपलब्ध नव्हते. हा चौकशी अहवाल उपायुक्त आशिष लोकरे यांना सादर करण्यात येणार आहे.






# तापत्रय निवृत्तीकरिता भागवत श्रवण करावे : हभप डॉ. जयवंत बोधले महाराज

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि. ३१ जुलै-

श्रीमद्‌भागवत कथा ही मानवी जीवनाला प्रकाश देणारी, जीवनम र्ग उजळवणारी अशी पवित्र कथा आहे. भारतीय संस्कृतीमध्ये श्रीम द्भागवत ग्रंथाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. श्रद्धेने या ग्रंथाकडे पाहिल्यास, तो केवळ एक ग्रंथ नसून स्वतः परमात्माच आहे, असा भाव उत्पन्न होतो. जगात असंख्य कथा सांगितल्या जातात, पण त्या प्रामुख्याने मनोरंजनासाठी असतात. परंतु भागवत कथा ही केवळ म नोरंजन नाही तर ती मनावर संस्कार करणारी, जीवनाला दिशा देणारे आणि आत्मविकास घडवणारे आध्यात्मिक दीप आहे, असे पूज्य डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. ते श्रावणमास प्रवचनमालेतील सहाव्या सत्रात श्रीमद्भागवत कथा चिंतन या विषयावर निरुपण करत होते.



श्रावणमास प्रवचनमाला
भाग - ६

जीवनाचे खरे तत्त्वज्ञान म्हणजेच भागवत कथा. श्रीमद्‌भागवत कथा सुरु करताना शौनक ऋषींना सूतमुनी म्हणतात- सर्वप्रथम परमात्म्याला नमस्कार करावा. नमस्कार करताना दोन्ही हात जोडून आपले मस्तक त्याच्या चरणांवर झुकवावे. आपले अहं आणि ज्ञान त्याच्या चरणी समर्पित करुन, त्याच्याकडून ज्ञान ग्रहण करावे. बुद्धी समर्पित केल्यावरच परमात्म्याचे स्वरुप समजते.

तो परमात्मा कसा आहे? आणि त्याला नमस्कार केल्याने काय लाभ होतो? तेव्हा सांगितले जाते की, तो परमात्मा सच्चिदानंदरुप आहे, विश्वव्यापी आहे आणि तापनाशक आहे. या त्रिविध तापांपासून- आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक दुःखांपासून- तो जीवाची मुक्तता करतो. डॉ. जयवंत महाराज उदाहरणांसह हे स्पष्ट करतात.

ते पुढे सांगतात की, प्रत्येक कर्माचे दृश्य वा अदृश्य परिणाम असतात. म्हणूनच माणसाला सुखदुःख भोगावे लागतात. पुण्याचे फळ सुख आणि पापाचे फळ दुःख असते. या त्रिविध दुःखांपासून मुक्त होण्यासाठी भागवत श्रवण करणे आवश्यक आहे, असे ते श्रोत्यांना दाखले देऊन समजावून देतात.

शौनक ऋषी सूतमुनींना विचारतात- आम्हा कानांसाठी रसरुप वाटणारे कथासार सांगा. भक्ती, ज्ञान व वैराग्याने विवेक कसा वाढेल हे सांगा. जीव मायामोहातून मुक्त होण्यासाठी उपाय सांगा. यावर सूतमुनी उत्तर देतात की, कलियुगातील प्रत्येक जीव हा काळरुपी सर्पाच्या तोंडात अडकलेला आहे. त्यातून मुक्ती मिळवण्याचा एकमेव उपाय म्हणजे भागवत शास्त्र. मनशुद्धीसाठी याशिवाय दुसरे कोणतेही साधन नाही. भागवत श्रवण करणे हेच आपल्या पूर्वजन्मीच्या पुण्याचे फल आहे, हा महत्त्वपूर्ण विचार त्यांनी मांडला.

शुकाचार्यांची जन्मकथा सांगताना, डॉ. जयवंत महाराज म्हणतात- शुकाचार्य हे अवधूत शिरोमणी, महायोगी, समदर्शी आणि ब्रह्मनिष्ठ होते. भागवत कथेमध्ये कथावाचक कथन करतो आणि त्याच्या श्रवणाने श्रोत्याला आनंद प्राप्त होतो.

खरे पाहता, वक्ता म्हणजे भगवंतच, श्रोता देखील भगवंतच आणि भगवंतच. भगवंताविषयी भगवंतालाच सांगत आहे, अशी ही अद्वितीय कथा म्हणजे भागवत कथा.

या श्रावणप्रसंगी श्री भगवंत मंदिरात भाविकांची अलोट गर्दी पाहायला मिळते.

# जिल्ह्यात शिवसेना शिंदे गटाला धक्का

## संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांचा राजीनामा

तभा वृत्तसेवा,
माढा, दि. ३१ जुलै-

शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला असून गुरुवारी येथील पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा केली.



याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे कळवले असल्याचे त्यांनी सांगितले. पक्षश्रेष्ठी तथा उपमुख्यमंत्री यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की मी जिल्हा संपर्कप्रमुख असून देखील मला विश्वासात न घेता जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. तेवढेच नव्हे तर माझ्या तालुक्यातील तालुकाप्रमुख व शहर प्रमुख यांच्याही नियुक्त्या केल्या आहेत ही बाब अतिशय गंभीर असून पक्षश्रेष्ठींचा विश्वास नसल्यामुळे मी या पदाचा राजीनामा सादर करीत आहे. यापुढे मी एक बाळासाहेबांच्या विचारांचा व आनंद दिघे साहेबांचा सहवास लाभलेला शिवसैनिक म्हणून काम करणार असल्याचे या पत्रात नमूद केले आहे. पत्रकार परिषदेत पुढे बोलताना ते म्हणाले की, मी गेली तीन वर्षे जिल्हा संपर्कप्रमुख या पदावर असून संपूर्ण जिल्हाभर शिवसेनेची ताकद वाढवण्यासाठी तसेच पक्ष बळकटीसाठी तन-मन धनाने अहोरात्र काम केले. परंतु पक्षातील काही जणांनी श्रेष्ठींची दिशाभूल केली असल्याचे वाटत असले तरी तरी मी त्यांचे नाव घेऊन त्यांना मोठे करणार नाही. ते एवढे मोठे नाहीत. मी एवढे काम करून देखील मला पक्षात डावलले जात आहे. मला या गोष्टीचे वाईट वाटते. त्यामुळे मी या पदावर न राहण्याचा निर्णय घेऊन राजीनामा दिला आहे. परंतु यापुढे मी माढा तालुक्यात एक सच्चा शिवसैनिक म्हणून पक्ष बळकटीसाठी काम करत राहील असे सांगितले. यावेळी तालुकाप्रमुख साठे, संजय टोणपे, अशोक खाडे, युसूफ दाळवाले, महेश मोहोळे, डॉ.शशिकांत त्रिंबके, समाधान दास, शिवराज पवार, संजय अस्वरे, संजय साठे, धर्मराज मुकणे, बालाजी बारबोले, सचिन कदम, योगेश जाधव, संजय ढेरे, शाहु कोकाटे, अरविंद खरात, भारत गायकवाड ,सिमा मोरे, लतिफ मुलाणी उपस्थित होते.

> प्रा. शिवाजीराव सावंत यांनी कॉलेज जीवनापासून ते आजतागायत शिवसेना पक्ष वाढीसाठी अहोरात्र काम केले आहे. त्यांनी जिल्हाभर आरोग्य शिबिर घेऊन गोरगरिबांना सेवा पुरवण्याचे काम केले. तसेच इतर गरजूंना मोठ्या प्रमाणात मदत केली. असे असून देखील त्यांना जिल्ह्याच्या निर्णयात जाणून-बुजून डावलले जात आहे. सच्च्या शिवसैनिकांना धक्का बसला असून पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. पक्षातील काही विघ्नसंतोषी लोकांमुळे शिवाजीराव सावंत यांना पक्षातील निर्णय घेण्यात डावलले जात आहे. जिल्ह्यासह तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांना प्रा. सावंत हेच पक्ष असून ते जे निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल आम्ही सर्व त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे राहणार आहोत.
>
> - मुन्ना साठे, शिवसेना, तालुकाप्रमुख, माढा.

### जिल्ह्यातील समर्थक ही देणार धक्का

प्रा. शिवाजीराव सावंत यांच्या राजीनाम्यामुळे पक्षांतर्गत घडामोडीवर ते स्पष्ट नाराज असल्याचे दिसत आहे. ही गोष्ट शिवसेना शिंदे गटाला जिल्ह्यात मोठा धक्का मानली जात आहे. कारण प्रा. सावंत यांचे माढा तालुक्यासह जिल्ह्यात मोठ्या संख्येने समर्थक असून या राजीनाम्यामुळे पुढील काळात काही पदाधिकारी व कार्यकर्ते देखील आपल्या पदाचा राजीनामा देण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# पावसाळ्यात होणारे आजार व आयुर्वेदिक उपचार

पावसाळा एक असा ऋतू आहे. ज्याची सर्वच आतुरतेने वाट बघत असतात. ३-४ महिने सतत होणाऱ्या भयंकर उकाड्यामुळे प्रत्येक जीव, प्राणीमात्र पावसाळा लवकर यावा अशी आस लावून असतात. पावसाळा येताच सर्वच प्राणी, जीवजंतू, वृक्षवल्ली यांच्यात नवजीवन, चैतन्याचा संचार होतो सर्वत्र दाट हिरवळ पसरलेली असते. आवणातील ढगाळ वातावरण आणि निसर्गसौंदर्य मनाला आनंदित करते आणि माणूस प्रफुल्लित होतो. निसर्गाने सहा ऋतू प्रदान केले आहेत प्रत्येक ऋतूचे महत्त्व आगळेवेगळे आहे. प्रत्येक दोन ऋतूंमध्ये संधिकाळ असतो, ज्याचे आयुर्वेदामध्ये आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व दिले गेले आहे.




१) ग्रीष्म २) वर्षा ३) शरद ४) हेमंत ५) शिशिर, ६) वसंत या सहा ऋतूत आहार-विहार कशा प्रकारे असावा, दिनचर्या, रात्रीचर्या, ऋतुचर्या यांचे नियम पालन निरोगी राहण्यासाठी कसे करावे, यांचे विस्तृत विवेचन केले आहे. या सर्व ऋतूमध्ये पावसाळा जितका आनंददायी, मनोहरी तितकाच कधीकधी कष्टदायी सुध्दा होतो. पावसात भिजल्यावर सर्दी, पडसे, खोकला, ताप, अतिसार, मलेरिया इत्यादी रोग त्वरित उद्भवतात. या ऋतूत हवा ओलसर, दमट असल्यामुळे डास, म शा यांचा प्रसार अधिक होतो. पाणी दूषित होऊन फळ, भाजीपाला चांगला मिळत नाही आणि त्यामुळे अनेक रोग उत्पन्न होतात. त्यात काही सामान्य रोग व त्यावरील आयुर्वेदिक उपचार खालील प्रमाणे वर्णित केले आहेत, वर्षा ऋतूत सर्वप्रथम रोगांपासून बचाव करण्याचा उपाय केला पाहिजे-

१) पावसात शक्यतो न भिजणे, भिजल्यास घरी येवून पुन्हा स्वच्छ पाण्याने स्नान करून शरीर पुसून कोरडे करावे.
२) घरात स्वच्छता ठेवावी, जड पदार्थ खाणे टाळावे. दिवसा झोपू नये. घराबाहेर साचलेल्या पाण्यावर, डबक्यावर कीटकनाशक औषध शिंपडावे.

या सर्व उपायांनी रोगापासून बचाव होऊ शकतो. तरीही जर मिथ्या आहारविहाराने रोग निर्माण झाल्यास खालील उपचार करावे. समान्यतः पावसाळ्यात सर्दी, पडसे, खोकला यांचा प्रकोप होतो. सर्दी झाली की काही दिवस खोकला असतोच वारंवार शिंका येणे, खाण्यात अरुची वाटणे, शरीरात (अंग) दुखणे इ. अशा अवस्थेत वैद्यनाथ लक्ष्मीविलास नारदीय १-१ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ मध व अदरक रसासोबत बारीक वाटून घ्यावी. बैद्यनाथ कासामृत २-२ चमचे दिवसातून ३ वेळा घ्यावे. खोकल्याचा जोर जास्त असल्यास सितोपलादी चूर्ण अर्धा चमचा मधात मिसळून घ्यावे थंडी वाजून ताप सतत येत असल्यास वैद्यनाथ महासुदर्शन घन बटी १-१ टॅबलेट सकाळ-संध्याकाळ घेवून त्यावर महासुदर्शन काढा ४-४ चमचे सममाग पाण्यासोबत जेवणानंतर घ्यावा. जेवण हलके व सुपाच्य घ्यावे. दूषित पाण्यामुळे पाचनक्रिया बिघडून पातळ शौचास होते. अशा स्थितीत बैद्यनाथ संजीवनी बटी १-१ टॅबलेट दिवसातून ३ वेळा घ्यावी. पाणी उकळून प्यावे. कधीकधी आंवयुक्त शौचास होते, तेव्हा अमीबिका टॅबलेट १-१ टैबलेट सकाळ-संध्याकाळ घेवून त्यावर कुटजारिष्ट ४-४ चमचे सममाग पाण्यात घ्यावे. या ऋतूत सहसा पित्तिया होण्याची शक्यता अधिक असते. रोग्याला भूक लागत नाही. लघवी पिवळी होते. डोळ्यात पिवळेपणा दिसतो. अशा स्थितीत बैद्यनाथ पुनर्नवादि मण्डूर २-२ टॅबलेट सकाल-संध्याकाळ घ्यावी. बैद्यनाथ कुमार्यासृत ३-३ चमचे सममाग पाण्यासोबत सकाळ-सायंकाळ जेवणानंतर घ्यावे. अशा प्रकारे जर सावधगिरी बाळगली तर काही मर्यादेपर्यंत रोगापासून बचाव होऊ शकतो. जर काही रोगांचे लक्षण दिसू लागल्यास वरील निर्देशित केलेल्या आयुर्वेदिय उपचाराने रोगनिवारण होवून व्यक्ति निरोगी राहू शकते. व आनंददायी पावसाळ्याचा आनंद लुटू शकते. (आयुर्वेदिक औषधे आयुर्वेद डॉक्टरांच्या सल्ल्याने घेणे उचित आहे.)

- वैद्य रमेश शर्मा, एम. डी. (आयु.)

# पंढरपूर तालुक्यात आजपासून महसूल सप्ताह

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि.३१ जुलै-

महसूल विभागाच्या सेवा व राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांबाबत नागरिकांना अधिकाधिक माहितीसह योग्य लाभ घेता यावा यासाठी १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष मोहिम व लोकाभिमुख उपक्रम राबविण्याच्या उद्देशाने तालुक्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

महसूल सप्ताहामध्ये सम ाजाच्या विविध घटकातील नागरिकांसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये शुक्रवार १ ऑगस्ट रोजी महसूल सप्ताहाची सुरुवात करण्यात येणार आहे. यादिवशी महसूल संवर्गातील उत्कृष्ट अधिकारी व कर्मचारी पुरस्कार वितरण होणार आहे. तसेच लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण करण्यात येणार आहे. शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटुंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटुंबांना सदर अतिक्रमित जागेचे पट्टे वाटप करण्यात येणार आहे. रविवार दि ३ ऑगस्ट रोजी पाणंद व शिवरस्त्यांची मोजणी करुन त्याच्या दुतर्फा झाडे लावण्यात येणार आहेत. सोमवार दि. ४ ऑगस्ट रोजी मंडलनिहाय छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येणार आहे. मंगळवार दि. ५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करून अनुदानाचे वाटप करण्यात येणार आहे. बुधवार दि. ६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार निर्णय घेण्यात येणार आहे. गुरुवार दि. ७ रोजी कृत्रिम वाळू (एम -सँड) धोरणाची अंम लबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे धोरण पूर्णत्वास नेणे तसेच महसूल सप्ताह सांगता समारंभ कार्यक्रम होणार आहे.

## सुंदरम नगर येथून दुचाकी चोरीस

सोलापूर, दि.३१ जुलै-

विजापूर रोडवरील सुंदरम नगर येथील भिमा अपार्टमेंट येथे पार्क केलेली ७० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत रेश्मा अरूण पवार (वय २५, रा. भिमा अपार्टमेंट, सुंदरम नगर, विजापूर रोड) या महिलेच्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ जुलै रोजी रात्री रेश्मा पवा यांनी त्यांची एमएच १२ ईएल १७२७ क्रमांकाची दुचाकी ह अपार्टमेंटच्या खाली हँन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद विजापूर नाका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार शिर्के पुढील तपास करीत आहेत.

# चौडेश्वरी तोगटवीर पतसंस्थेस पाच कोटींचा नफा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. ३१ जुलै-

श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेला २०२४-२५ या आर्थिक वर्षात संस्थेकडून झालेली वसुली, कर्जात व व्यवसायात भरीव वाढीमुळे संस्थेला ५ कोटी २५ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याची माहिती पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल बडगंची यांनी दिली.

यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून साजरा होत आहे. या आर्थिक वर्षात पतसंस्थेने १०० कोटी व्यवसाय पूर्ण करुन पतसंस्थेच्या इतिहासात महत्वाचा टप्पा गाठला आहे. हे संस्थेच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. एकीकडे आर्थिक संस्था अडचणीत येत असताना



सोलापूरची श्री चौडेश्वरी तोगटवीर पतसंस्था सभासद ठेवीदार कर्जदार यांचे विश्वास संपादन करित नुसता आपला दर्जा टिकवला नाही तर यशाचा शिखर गाठला आहे. श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्था ही सोलापूर जिल्ह्यातील अग्रणी पतसंस्था असून सध्या या संस्थेत एकूण ठेवी रु. २२७७६.६६ लाख इतके आहेत. एकूण कर्जे रु. १९२३२.९७ लाख इतके आहे. स्थापनेपासून ऑडीट वर्ग अ असून छ्ह चे प्रमाण ०% आहे. एकूण कर्जापैकी ९९% सुरक्षित कर्जे व सुरक्षित गुंतवणूक असलेल्या पतसंस्थेला महाराष्ट्र शासनाचा सहकारनिष्ठ पुरस्कार सह अनेक पुरस्कार मिळाले आहेत. १५ टक्के लाभांश देणारी सोलापूरातील अग्रणी पतसंस्था आहे. या यशात सभासद, ठेवीदार, कर्जदार, खातेदार, कर्मचारी व संचालक मंडळ -व्हा. चेअरमन चंद्रकांत रंगम, संचालिका उमा पुद्दूर, अंबिका उदगिरी व संचालक अरुण चिंता, लक्ष्मीकांत उदगिरी. अरविंद पुद्दूर, नरेंद्र बत्तुल. मल्लिकार्जुन खंडे, विलास बडगंची, शंकर कोतम. विष्णु म्याकल. अजय रंगम, विजयकुमार शिंपी, रूपसिंग राठोड. भगवत फलमारे, अंबादास कंदीकोंडा, व्यवस्थापक राजेंद्र उदगिरी यांचा योगदान आहे.

# लाकडाने मारहाण करणाऱ्याविरुध्द गुन्हा

सोलापूर, दि.३१ जुलै-

लाकडाने मारहाण करणाऱ्याविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.. याबाबत फारूक करीम शेख (वय ४४, रा. मित्र नगर, शेळगी, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून जुबेर निसार मुल्ला (रा. मित्र नगर, शेळगी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० जुलै रोजी साडेतीनच्या सुमारास फारूक शेख हे कामावर असताना जुबेर मुल्ला याने शेख यांस फोन करून मित्र नगर येथे बोलावून घेतले. त्याठिकाणी मुल्ला याने शेख यांस तु माझ्याबदल लोकांना काय खोटे सांगून नावाची बदनामी करीत आहेस असे म्हणून शिवीगाळ करून पडलेल्या लाकडाने शेख यांच्या डोक्यात व पायावर मारून जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. १ ऑगस्ट २०२५ | लोकमान्य टिळक पुण्यदिन, |
| विक्रम संवत् २०८२ | लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती |
| शके - १९४७ | ....राहू काळ.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - श्रावण | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. अष्टमी (अहोरात्र) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - स्वाती (२८.३९) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शुभ (२९.२१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (१८.०९) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीम ध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी

**वृषभ** : आध्यात्मिक अंगीकरल्याम ुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन** : नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू

**कर्क** : व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

**सिंह** :व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तूंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**कन्या** : पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठ्या व प्रतिष्ठित व्यक्तिंचा संप येईल. व्यापारिक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक** : प्रेम संबंधात यश मि ळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल.

**धनु** : कर्ज काढावे लागेल. मित्रापाशी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**मकर** : आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ** : आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन** : आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

# विद्यापीठाची पहिली ३७ एकर जागा मिळविण्यात दत्ता भोसले यांचा खारीचा वाटा

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा उत्कृष्ट चतुर्थश्रेणी कर्मचारी पुरस्कार छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाचे ग्रंथालय परिचर दत्ता निवृत्ती भोसले यांना जाहीर झाला आहे. याचे वितरण विद्यापीठाच्या वर्धापन दिनी शुक्रवारी १ ऑगस्ट रोजी होत आहे. त्यानिमित्त त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा घेतलेला आढावा त्यांच्या शब्दात...**

एक चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून म हाविद्यालयाची जबाबदारी पार पडत असताना काय अडचणी येतात त्याची मला पुरेशी कल्पना आहे. परंतु माझ्याबाबतीत या अडचणी कमी आल्या. कारण माझे सामाजिक क्षेत्रातील काम मला उपयोगी पडले. त्यासोबतच आमच्या संस्थेचे अध्यक्ष व माजी महापौर मनोहर सपाटे यांचे आशीर्वाद आणि आतापर्यंतच्या प्राचार्यांनी दिलेले प्रोत्साहन तेवढेच महत्वाचे आहे. त्याशिवाय हे काम करणे शक्य नाही. म्हणूनच या सगळ्या कामाची पोच पावती मला या पुरस्काराच्या रुपाने मिळत आहे. आतापर्यंत मी शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना सामाजिक क्षेत्रातील अनेक कामे केली. जवळपास दीड हजाराहून अधिक लोकांचे अंत्यसंस्कार करण्यात मी मदत केली. कोरोना काळात अनेकांना जेवणाचे डबे पोहचविणे असतील किंवा कोणाच्या घरात मयत झाली असेल. ही सर्व कामे मी संस्थेने दिलेल्या पाठबळामुळे पूर्ण करू शकलो. आजही तो वसा पुढे नेण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न सुरुच आहे. याकामी माझ्या कुटुंबाची साथही तितकीच म ोलाची आहे. माझी आई बाई, पत्नी सुरेखा, कन्या वैष्णवी व श्रेया यांचा मोठा वाटा आहे. माझ्या कामात त्या नेहमीच मला सहकार्य करीत असतात. यामुळेच मी निर्धास्तपणे हे काम करू शकतो. खरेतर आमच्या संस्थेचे अध्यक्ष के.प्रभाकर सुरवसे यांचा मला येथे आवर्जुन उल्लेख करावा लागेल. कारण माझ्यासारख्या एका सामान्य कुटुंबातल्या पोराला त्याकाळी एकही रुपया न घेता संस्थेत शिपाई म्हणून कामाला लावले. त्याम ुळेच मी इथेपर्यंत यशस्वी वाटचाल करू शकलो.



कॉंग्रेस पक्षांतर्गत असलेल्या एनएसयूआय या विद्यार्थी संघटनेचा जनरल सेक्रेटरी म्हणून विद्यार्थी दशेत सुरवात केली. सोलापूर विद्यापीठाची पहिली ३७ एकर जागा मिळण्यामध्ये त्याकाळी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी आमदार (कै.) ब्रम्हदेव माने, माजी आमदार शहाजीबापू पाटील, विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी. पी. साबळे, विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन समिती सदस्य शंकरराव साळुंके, विद्यार्थी परिषदेचे माजी चेअरमन प्रकाश भोसले, माजी प्राचार्य वसंतराव बनसोडे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे माजी अध्यक्ष महेश माने, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. संभाजीराव देसाई, पश्चिम महाराष्ट्र एनएसयुआयचे उपाध्यक्ष यशवंत सुरवसे, माजी नगरसेवक सुनील गांगजी आदींच्या प्रयत्नामुळे सोलापूर विद्यापीठाची निर्मिती करण्यात माझाही खारीचा वाटा होता. परंतु पुढे आर्थिक परिस्थितीमुळे राजकारणात जाता आले नाही. मात्र, शैक्षणिक क्षेत्रात येऊन सामाजिक काम करता आले, याचे मला समाधान आहे. विशेष म्हणजे पद्मश्री पुरस्कारप्राप्त महाराष्ट्र भूषण अशा अनाथांची माय म्हणून स्वर्गवासी झालेल्या सिंधुताई सपकाळ यांच्यासोबत त्यांच्या सुरुवातीच्या काळापासून काम करता आले. त्यांना सोबत घेऊन सोलापुरातील अनेक राजकीय नेते, सामाजिक संस्था आणि दानशूर व्यक्तींकडून मदत मिळवून दिली. त्यांच्या कार्यात छोटासा वाटा उचलला. अगदी सायकलवर त्यांच्यासमवेत प्रवास केला. त्यांच्या अडचणीच्या काळात मला त्यांना साथ देत आली. सोलापुरचे तत्कालीन पोलिस आयुक्त अशोक कामठे हे नुकतेच बदली होऊन मुंबईला गेले. त्यावेळी २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात त्यांना वीर मरण आले. त्यावेळी त्यांचा अस्थी सोलापुरात आणून येथील नागरिकांना त्यांच्या अस्थीचे दर्शन घेता आले. तो अस्थी चंद्रभागेत विसर्जित करता आला. माझ्या कामाची दखल घेऊन संस्थेचे अध्यक्ष सपाटे यांनी संस्थेच्या माध्यमातून मला हिरो होंडा गाडी मोफत भेट दिली, शिवतीर्थ पुरस्काराने सन्मानही केला. यासह मला अनेक जिल्हा व राज्य पुरस्कार मिळाले. त्यामुळेच मला विद्यापीठाच्या या पुरस्कारपर्यंत पोहचता आले. हे माझ्या प्रामाणिक कामाचे फळ आहे. त्यामुळे विद्यापीठाचे आणि पुरस्कार निवड समितीचे मनापासून धन्यवाद मानतो.

शब्दांकन
-ए. बी. संगवे
९८८११३३१०३

## महत्वाचे...



## रेल्वे विभागात मुन्शी प्रेमचंद यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालयाच्या राजभाषा विभागात कादंबरी सम्राट आणि प्रसिद्ध कथाकार मुन्शी प्रेमचंद यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी, एपीओ आणि संपर्क राजभाषा अधिकारी एस. एल. खोत यांनी मुन्शी प्रेमचंद यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पुष्प अर्पण केले. या प्रसंगी, मुन्शीजींचे स्मरण करत त्यांनी त्यांच्या कथा आणि कादंबऱ्यांचे महत्त्व अधोरेखित केले. विभागातील राजभाषा विभागातील कर्मचारी, कनिष्ठ अनुवादक शिवसाहेब यादव आणि कार्यालयीन सहाय्यक किरण माने यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यात आपले अमूल्य योगदान दिले.

## दुचाकी घसरल्याने महिलेसह दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

अक्कलकोट येथून सोलापूरच्या दिशेने येत असताना वळसंग टोल नाक्यावर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात महिलेसह दोघे जखमी झाले. हा अपघात गुरुवारी दुपारी १२.२० च्या सुमारास घडला. रोहिदास रामचंद्र पवार (वय ६१) व सविता रोहिदास पवार (वय ६०, दोघे रा. आदित्य नगर, सोलापूर) असे जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. रोहिदास आणि सविता असे दोघे दुचाकीवरून अक्कलकोट येथून सोलापूकडे येत होते. दुपारी १२.२० च्या सुमारास ते वळसंग टोल नाका येथे आल्यानंतर ते बसून जात असलेली दुचाकी घसरली. यात खाली पडून रोहिदास यांच्या चेह-याला खरचटले असून सविता यांच्या दोन्ही गुडघ्याला मुकामार लागला आहे. दुपारी १ वाजता रुग्णवाहिकेतून उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## प्रा. संजय पाटील यांची श्री शिवाजी महाविद्यालयाच्या पर्यवेक्षकपदी नियुक्ती

**बार्शी, दि.३१ जुलै-**

श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शीच्या कनिष्ठ शाखेच्या पर्यवेक्षकपदी शारीरिक शिक्षण विभागाचे प्रा. संजय पाटील यांची नियुक्ती झाली आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. ए. बी. शेख यांनी प्रा. संजय पाटील यांचा प्रदीर्घ अनुभव विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि महाविद्यालयाच्या हितासाठी फायदेशीर ठरणार असल्याचे सांगत प्रा. पाटील यांच्या निवडीबद्दल महाविद्यालयच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. ए. बी. शेख, उपप्राचार्य प्रा.वायकर, कला समन्वयक डॉ. राऊत, भूगोल विषय प्रमुख प्रा. खंदारे उपस्थित होते.



## अशोक लांबतुरे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळा मार्डी तालुका उत्तर सोलापूर जिल्हा सोलापूर येथे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अशोक लांबतुरे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून समाज कल्याण अधिकारी समाजकल्याण अधिकारी जि.प. सोलापूर व मा.अविनाश मार्तंडे संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळेतील भौतिक सुविधा, ई लर्निंग प्रोजेक्ट, संगणक, सौर उर्जा, सोलर, धान्य कोठी, स्वयंपाक खोली,शाळा इमारत शाळेचा परिसर खेळाचे मैदान इ.सुविधा पाहून कौतुक केले. यावेळी संस्थेचे संस्थापक मा.अशोक लांबतुरे, अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, सचिव मधुकर गवळी, कृषी उत्पन्न बाजार समिती सोलापूरचे संचालक अविनाश मार्तंडे, दिव्यांग संघटनेचे उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष सिध्देश्वर रुपनर, शाळेच्या मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी, ज्येष्ठ शिक्षक नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, संगीता व्हनकोळे-जाधव, विद्या हराळे-लांबतुरे, अशोक देशमुख, अमोल गुरव, बसवराज तुळजापुरे, संदीप चव्हाण उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे-गवळी यांनी केले. सूत्रसंचालन विनोद कोळेकर यांनी केले तर आभार संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा लांबतुरे यांनी मानले.

## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार, दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती नूतन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली

# मे महिन्यातील टेट परिक्षेचा निकाल कधी?

## भावी शिक्षकातून विचारणा; परीक्षेला घाई अन् निकाल मात्र निवांत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

राज्यात मे २०२५ मध्ये झालेल्या तिसऱ्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) परीक्षेचा निकाल कधी लागणार असा प्रश्न भावी शिक्षकातून विचारला जात आहे. परीक्षा घेताना घाई केली मात्र दोन महिने झाले तरी निकाल जाहीर करण्यात निवांतपणा दिसत असल्याने युवा विद्यार्थी असोसिएशनने आंदोलनाचा इशारा दिला आहे.

२४ मे ते ६ जून २०२५ दरम्यान तिसरी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट-३) परीक्षा झाली. दोन महिने उलटले तरी अद्याप निकाल तसेच प्रथमदर्शनी गुणवत्ता तक्तासुद्धा जाहीर केला नाही. यामुळे लाखो भावी शिक्षक निकालाकडे आशेने पाहत आहेत. यंदा टेट परीक्षेसाठी २ लाख ३६ हजार उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते. सुमारे दोन लाख जणांनी परीक्षा दिली. सोलापूर जिल्ह्यातून सुमारे १३ हजार उमेदवारांनी परीक्षा दिली आहे. परीक्षेला बसण्याची व्यवस्था विदर्भ, प.महाराष्ट्र, कोकण अशा विभागामध्ये केली होती.

**भावी शिक्षकांना मिळेना शाळा**

राज्यात तिसरी अभियोग्यता बुद्धिमापन चाचणी परीक्षा पार पडली. दोन महिने झाले अद्याप जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागातील शाळांना नवीन व योग्यताधारक भावी शिक्षकांना शाळा मिळण्यापासून वंचित राहावे लागत आहे. यामुळे याही वर्षी अनेक शाळांना शिक्षक उपलब्ध होतील का ? अशी शंका उपस्थित होत आहे.

> परीक्षा घाईगडबडीत घेतल्यानंतर ४५ दिवसात निवड यादी जाहीर करून नियुक्ती व समुपदेशन एकाच दिवशी पार पाडली गेली पाहिजे. परंतु दोन महिने झाले तरी निकाल लागला नाही. त्यामुळे भावी शिक्षकांना नवीन शाळेपासून वंचित राहावे लागेल. शासनाने याचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर गुणवत्ता यादी व निवड यादी जाहीर करावी.
>
> **- प्रशांत शिरगुर,**
> राज्य उपाध्यक्ष, पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटना.

> **महाराष्ट्र परीक्षा परिषद दखल घेणार ?**
>
> तिसरी टेट परीक्षा घाई गडबडीत घेऊन महाराष्ट्र परीक्षा परिषदेने काय साध्य केले ? असा सवाल विद्यार्थ्यांच्या मनात आहे. परीक्षा घाई गडबडीत घेऊन निकाल मात्र दोन महिने उलटले तरी अद्याप नाही. लवकरात लवकर निकाल लावून निवड व नियुक्ती हे एकाच दिवशी करावी अशी मागणी होत आहे.

# पंढरपूर टपाल विभागात उद्या सार्वजनिक व्यवहार बंद

### आयटी २.० ॲप्लिकेशनची ४ ऑगस्टपासून सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जुलै-**

टपाल विभागाला पुढील पिढीतील एपीटी ॲप्लिकेशन (आयटी २.०) अंमलबजावणी करण्याची सुरुवात करण्यात येत असल्यामुळे पंढरपूर विभागातील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये दि. २ ऑगस्ट रोजी सर्व सार्वजनिक व्यवहार बंद राहणार असल्याचे पंढरपूर विभागाचे अधीक्षक डाकघर चंद्रकांत भोर यांनी कळविले आहे.

डिजिटल उत्कृष्टता आणि राष्ट्र उभारणीच्या प्रवासात एक मोठी झेप आहे. या परिवर्तनकारी उपक्रमाचा एक भाग म्हणून, अपग्रेड केलेली प्रणाली पंढरपूर विभागामधील सर्व पोस्ट ऑफिसमध्ये दि. ४ ऑगस्ट, २०२५ रोजी लागू करण्यात येणार आहे. या प्रगत डिजिटल प्लॅटफॉर्मवर एक अखंड आणि सुरक्षित संक्रमण सक्षम करण्यासाठी दि. २ ऑगस्ट, २०२५ रोजी नियोजित डाउनटाइम करण्यात आला आहे. त्यामुळे २ ऑगस्ट, २०२५ या रोजी पंढरपूर विभागातील कोणत्याही पोस्ट ऑफिसमध्ये कोणतेही आर्थिक पत्रव्यवहार केले जाणार नाहीत.

डेटा मायग्रेशन, सिस्टीम व्हॅलिडेशन आणि कॉन्फिगरेशन प्रक्रिया सुलभ करण्यासाठी, नवीन सिस्टम सुरळीत आणि कार्यक्षमतेने लाइव्ह होईल याची खात्री करण्यासाठी सेवांचे हे तात्पुरते निलंबन आवश्यक आहे. एपीटी ॲप्लिकेशन वापरकर्त्यांचा अनुभव वाढविण्यासाठी, जलद सेवा वितरण आणि अधिक ग्राहक-अनुकूल इंटरफेस प्रदान करण्यासाठी डिझाईन केले आहे. ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन अधीक्षक डाकघर चंद्रकांत भोर यांनी केले आहे.

## संजीवनी विद्यालयातील पाच विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ३१ जुलै-**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत मोडनिंब येथील संजीवनी विद्यालयातील पाच विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक म्हणून पात्र झाले आहेत. सर्व विद्यार्थी ग्रामीण सर्वसाधारण मधून निवडले आहेत. निखिल नामदेव माने (गुण २२८), पृथ्वीराज दत्तात्रेय मोरे (गुण २१२), राधिका नितीन गडधरे (गुण २००), सानवी मारुती शिंदे (गुण १९६) हे चार विद्यार्थी आठवीतील तर इयत्ता पाचवीतील कौस्तुभ विजयकुमार आपटे (गुण २२६) हा विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरला आहे. या विद्यार्थ्यांना गणेश पनासे, निर्मला सुरवसे, हनुमंत माने, स्वाती कुलकर्णी, प्रमोदिनी तोरडमल, बालाजी शेळके, बंडू लोखंडे, सुहास रोकडे, सारिका ससाणे, नीलकंठ पवार, अश्विनी बारगजे या यांचे मार्गदर्शन लाभले. या सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष तथा सभापती शिवाजी कांबळे,सचिव प्रकाश इंगळे, प्राचार्य सुभाष रणदिवे, मुख्याध्यापक अमोल सरडे, पालक व ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# देगाव रोड डी मार्ट परिसरासह विविध तीन ठिकाणचे अतिक्रमण हटविले

### खोके, खाद्यपदार्थांच्या गाड्यांसह इतर साहित्य केले जप्त




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

शहरातील देगाव रोड डी मार्ट समोर, पासपोर्ट ऑफिस ते सिद्धेश्वर मंदिर व वालचंद कॉलेज ते कर्णिक नगर येथील रस्त्यावर असलेल्या खाद्यपदार्थाच्या गाड्या आणि खोके असे अतिक्रमण काढण्यात आले. महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने ही कारवाई करण्यात आली.

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज गुरुवारी सकाळच्या सत्रात देगाव रोड डी मार्ट समोर असलेल्या अनाधिकृत पान टपऱ्या व बंद असलेले खाद्यपदार्थ गाड्या विभागीय कार्यालय क्र.६ यांच्या वतीने संयुक्त मोहीम घेऊन अतिक्रमण काढण्यात आले आहे. या मोहिमेत २ लोखंडी खोके व २ लोखंडी खाद्यपदार्थांचे गाड्या व इतर साहित्य जप्त करण्यात आले. त्यानंतर पासपोर्ट ऑफिस ते सिद्धेश्वर मंदिर व वालचंद कॉलेज ते कर्णिक नगर येथे अतिक्रमण मोहीम घेऊन फूटपाथ वरीलअतिक्रमण काढण्यात आले. कारवाई पाहण्यासाठी लोकांनी मोठी गर्दी केली होती. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार नियंत्रण अधिकारी तपन डंके यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधिकारी हेमंतकुमार डोंगरे यांच्या माध्यमातून कनिष्ठ अभियंता सुफियान पठाण, दीपक कुंभार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही मोहीम राबविली.

## प्रा. डॉ. साठे यांना लोकशाहीर साठे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.३० जुलै-**



उघडेवाडी (ता.माळशिरस) चे रहिवासी व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर येथील प्रा. डॉ. धनंजय साठे यांना मानवतावादी सांस्कृतिक चळवळ, कोल्हापूर यांच्या वतीने यावर्षीचा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे.

सदर पुरस्कार अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त कोल्हापूर येथे ३ ऑगस्ट रोजी शाहू स्मारक येथे माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार राजीव आवळे यांच्या प्रमुख उपस्थित मध्ये दिला जाणार आहे. प्रा.साठे यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून त्यांनी अण्णा भाऊ साठे आणि मॅक्झिम गॉर्की यांच्या कादंबरी मधील वंचित समाज या विषयावरती इंग्रजीमध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना सदर पुरस्कार जाहीर झाला आहे.

# मंद्रुप ग्रामपंचायतमधील रिकाम्या खुर्च्यांना हार घालून निवेदन

### भाजपा कार्यकर्त्यांकडून निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रूप, दि.३१ जुलै-**



मंद्रूप ग्रामपंचायतीकडून गावात विकासकामे होत नसल्याच्या निषेधार्थ, भारतीय जनता पक्षाच्या वतीने मंद्रुप ग्रामपंचायत कार्यालयात निवेदन देण्यासाठी गेले असता, सरपंच, उपसरपंच, ग्राम सेवक व इतर कुठलेही पदाधिकारी उपस्थित नसल्याचे दिसून आले. त्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांनी कार्यालयात असलेल्या रिकाम्या खुर्च्यांना हार घालून अनोख्या पद्धतीने निषेध व्यक्त केला.

गावातील रस्ते, पाणी, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, महिला व युवकांसाठी मूलभूत सुविधा अशा अनेक विषयांवर गावकऱ्यांत नाराजी आहे. या पार्श्वभूमीवर भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायतीला उपाययोजना कराव्यात यासाठी निवेदन देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार पदाधिकारी व प्रशासनाला निवेदन देण्यासाठी गेल्यानंतर सर्व खुर्च्या रिकाम्या दिसल्या. यावेळी उपस्थितांनी खुर्च्यांना निवेदन दिले.

यावेळी भाजपचे युवा नेते प्राध्यापक उमाशंकर राऊत, भाजपा तालुका पंचायतराज अध्यक्ष अनिल जोडमोठे, भाजपचे ओबीसी तालुका सरचिटणीस शिवपुत्र जोडमोटे, भाजप ग्राम पंचायत सदस्य दयानंद ख्याडे , मंद्रुप तंटामुक्त समितीचे अध्यक्ष रेवणसिध्द मेंडगुदले, भाजपचे कार्यकर्ते लक्ष्मण जकुणे व इरेश मेंडगुदले आदि कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी एकमुखाने ग्राम पंचायतीच्या उदासीन व गैरहजर प्रशासनाचा निषेध केला.

# लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

### महापालिका व जिल्हा परिषदेच्या शाळांचाही होणार गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ जुलै-**

लोकमंगल फाउंडेशन व लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थांच्या वतीने देण्यात येणाऱ्या लोकमंगल शिक्षकरत्न पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. दहा शिक्षकांबरोबरच सोलापूर जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या शाळांना आदर्श शाळा पुरस्कार दिले जाणार आहेत, अशी माहिती डॉ. आशालता जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

लोकमंगल शिक्षक रत्न पुरस्कार हे सोलापूर जिल्ह्यातील प्रतिष्ठेचे पुरस्कार मानले जातात. किमान बारा वर्षे अध्यापन सेवा केलेल्या शिक्षकांना या पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवता येतील. प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय या स्तरावरील शिक्षकांना पुरस्कार दिले जातात. त्याशिवाय कला क्रीडा शिक्षकांनाही एक पुरस्कार देण्यात येतो. सोलापूर जिल्ह्याचे नाव विविध क्षेत्रात मोठे करणाऱ्या महनीय व्यक्तीला प्रेरणा देणाऱ्या शिक्षकास डॉ. अब्दुल कलाम विशेष पुरस्कार दिला जातो. त्यासाठी दोन शिक्षकांना गौरविण्यात येणार आहे. दहा शिक्षकांबरोबरच सोलापूर जिल्हा परिषद आणि महापालिकेच्या शाळांना आदर्श शाळा पुरस्कार दिला जाणार आहे. चार हजार रुपयांची पुस्तके, स्मृतीचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. समारंभपूर्वक हे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. इच्छुक शिक्षकांनी विविध नमुन्यातील प्रस्ताव लोकमंगल फाउंडेशनच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेच्या प्रत्येक शाखेत तसेच लोकमंगल फाउंडेशनच्या कार्यालयात हे प्रस्ताव प्राप्त करता येतील. शिक्षकांनी आपले प्रस्ताव अन्नपूर्णा १३/अ, सह्याद्री हाऊसिंग सोसायटी, विकास नगर, सोलापूर येथे पूर्ण भरून समक्ष आणून द्यावेत आणि पोच घ्यावी. अधिक माहितीसाठी ०२१७ - २६०६०७० / ७७२२०३९६१७ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन डॉ. आशालता जगताप यांनी केले आहे.

यावेळी डॉ. ह. ना. जगताप, दिपाली कोठारी आदी उपस्थित होते.

# एमआयडीसीच्या वर्धापन दिनानिमित्त आरोग्य शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.३१ जुलै-**

संजीवनी ममता हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटर व इंस्पिरा रिॲलिटी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.३० जुलै रोजी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी एक दिवसीय मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यालयीनस्थळीच आरोग्य सेवा पोहोचविण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरले.

शिबिराचे उद्घाटन महामंडळाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय सावळकर यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी ममता ग्रुपचे कार्यकारी संचालक विशाल सारिया, संजीवनी ममता हॉस्पिटलच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कमलेश सदरंगानी महामंडळाचे महाव्यवस्थापक (मबवि) शरद आचारे, सह मुख्य लेखा अधिकारी अभिजित गुजराथी, प्रशासकीय अधिकारी प्राची मोरे, विधी व्यवस्थापक अखिलेश खराबे, आस्थापना अधिकारी आदिती मांजरेकर, उपव्यवस्थापक उज्ज्वला खरात व इतर अधिकारी वर्ग उपस्थित होते.

महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू व सह मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार यांच्या संकल्पनेतून आयोजित शिबिरादरम्यान रक्तदाब व रक्तातील साखर, तोंडाचा कर्करोग, एआय आधारित थर्मल मॅमोग्राफी, स्तनांचा कर्करोग, गर्भाशय ग्रीवा कर्करोग (पॅप स्मिअर) व सर्वसामान्य आरोग्य तपासणी इ.मोफत आरोग्य तपासण्या करण्यात आल्या.




कार्यक्रमाची सुरुवात औपचारिक फित कापून झाली, त्यानंतर सौ. कमलेश सदरंगानी यांनी एमआयडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना हॉस्पिटलच्या आरोग्य सेवा, चालू उपक्रम व आगामी योजना याबाबत सविस्तर माहिती दिली.तसेच ममता ग्रुपचे अध्यक्ष मधुसूदनजी अग्रवाल यांच्या दूरदृष्टीपूर्ण व सेवाभावी नेतृत्वाची ओळख करून देत, त्यांच्या प्रेरणेतून संजीवनी ममता हॉस्पिटलने सर्वसामान्यांसाठी दर्जेदार व परवडणाऱ्या आरोग्य सेवेचा ध्यास घेतला आहे. या शिबिराचे समन्वयक दीपेन शर्मा यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने अतिशय नियोजनबद्ध व रुग्ण-केंद्रित पद्धतीने करण्यात आले. या उपक्रमाला एमआयडीसीच्या कर्मचाऱ्यांचा भरघोस प्रतिसाद मिळाला आणि सर्वस्तरांवरून कौतुक झाले.

## बार्शीच्या प्रतिक आगरकरची राज्य कर निरीक्षकपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. ३१ जुलै-**



शहरातील प्रतिक स्मिता मुकुंद आगरकर यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. त्यांची एकाच वेळी सहाय्यक कक्ष अधिकारी आणि राज्य कर निरीक्षक पदांवर निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे बार्शी शहरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

प्रतिकने चिकाटी, सातत्यपूर्ण अभ्यास आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. प्रतिक हा सुलाखे हायस्कूलचा विद्यार्थी असून, नाथजल कंपनीचे मॅनेजर मुकुंद आगरकर व प्राथमिक शिक्षिका स्मिता आगरकर (केवडकर) यांचा मुलगा आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# ‘विठ्ठल’च्या तत्कालीन संचालकाविरुध्द गुन्हा दाखलचे न्यायालयाचे आदेश

## पंढरपुरच्या सहकार क्षेत्रात खळबळ; डॉ. रोंगे यांच्या विरोधात दिले होते खोटे प्रमाणपत्र

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जुलै -**

श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना, वेणुनगर, गुरसाळे येथील तत्कालीन प्रभारी कार्यकारी संचालक राजाराम शहाजी म्हेत्रे यांनी २०२२ साली झालेल्या निवडणुकीदरम्यान बनावट कागदपत्रे तयार करून खोटे प्रमाणपत्र सादर केल्याने त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयाने दिले आहेत. यामुळे पंढरपूरच्या सहकारक्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी कि, सदर प्रकरणातील मूळ फिर्यादी स्वेरी, पंढरपूरचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांची खर्डी या गावी शेती असून, ते श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे सभासद आहेत. सन २०२२ मध्ये झालेल्या कारखान्याच्या संचालक पदाच्या निवडणुकीदरम्यान डॉ.बी. पी. रोंगे यांनी निवडणूकीसाठी अर्ज दाखल केला होता. सदर निवडणुकीत अर्ज सादर करतेवेळी त्यांनी दि. २ जून, २०२२ रोजीचे आरोपी श्री. म्हेत्रे यांच्या सहीचे मागील सात वर्षांपैकी चार वर्षे कारखान्यात ऊस घातल्यासंदर्भात प्रमाणपत्र व इतर सर्व कागदपत्रे दाखल करून सर्व अटींची पूर्तता केली होती. तथापि कारखान्याच्या सन २०२२ साली झालेल्या निवडणुकीत डॉ. रोंगे यांचा निवडणुकीतील उमेदवारी अर्ज रद्द व्हावा या दुष्ट उद्देशाने आरोपी श्री. म्हेत्रे यांनी दि. १० जून, २०२२ रोजी अर्जाच्या छाननी वेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर डॉ. रोंगे यांनी मागील सात वर्षांपैकी फक्त दोनच वर्षे विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास ऊस घातला आहे असे खोटे प्रमाणपत्र सादर केले.

त्यामुळे डॉ. रोंगे यांचा उमेदवारी अर्ज फेटाळला गेला. यानंतर डॉ. रोंगे यांनी दि. १३ जून, २०२२ रोजी परत आरोपीकडे सदर कारखान्यास ऊस गळितास दिल्याबाबतचे प्रमाणपत्र मागितले असता त्यांनी चार वर्षे ऊस घातल्या बाबतचे दि. २ जून, २०२२ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रा सारखेच खरे प्रमाणपत्र दिले. एकूण प्रकरणात राजाराम शहाजी म्हेत्रे यांनी कारखाना प्रशासनातील एक जबाबदार व्यक्ती असतानाही डॉ. रोंगे यांचा उमेदवारी अर्ज नामंजूर व्हावा या दृष्टीने हेतुपुरस्सर खोटा व बनावट दाखला बनवला व तो निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर सादर केला. निवडणूक अधिकाऱ्यांनी हा तयार केलेला पुरावा ग्राह्य मानत डॉ. बी. पी. रोंगे यांचा निवडणूक अर्ज नामंजूर केला. आरोपी राजाराम म्हेत्रे यांनी कायदेशीर प्रक्रियेमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांचे समोर सत्य माहिती सादर करणे बंधनकारक असतानाही केवळ वैयक्तिक स्वार्थापोटी कायदेशीर प्रक्रियेत हस्तक्षेप करत खोटे पुरावे तयार करून खोटे प्रमाणपत्र सादर केले. याबाबत फिर्यादी डॉ. बी. पी. रोंगे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी नागेश पाटील यांचेकडे राजाराम म्हेत्रे यांनी खोटी माहिती सादर केल्यासंदर्भात गुन्हा दाखल करावा असे पत्र दिले.

नागेश पाटील यांनी या संदर्भात कोणतीही कार्यवाही न केल्याने डॉ.रोंगे यांनी कोर्टात धाव घेत श्री.म्हेत्रे यांच्या विरोधात केस दाखल केली असता न्यायालयाने या संदर्भातील कागदपत्रे पाहत फिर्यादींच्या वकिलाचे म्हणणे ऐकून घेतले. यात मा. न्यायालयाने प्राथमिकदृष्ट्या आरोपीने खोटे प्रमाणपत्र दिल्याचे मत नोंदवले व आरोपी श्री. राजाराम शहाजी म्हेत्रे यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात फिर्यादी तर्फे ॲड. यासिन शेख, ॲड. शाहिद शेख, ॲड. झीशान शेख व ॲड. विजय खडतरे यांनी काम पाहिले. सहकारक्षेत्रात होणाऱ्या प्रगतीच्या प्रक्रियेत झारीतील शुक्राचार्यांची भूमिका बजावणाऱ्या अशा अधिकाऱ्यांविरोधात न्यायालयाने गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्याने शेतकऱ्यांचा राजवाडा म्हणविल्या जाणाऱ्या विठ्ठल कारखाना लिमिटेडच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी बंधू भगिनींनी समाधान व्यक्त केले.

# श्रीमद् भागवत मानवी जीवन कृतार्थ बनविणारा ग्रंथ

### हभप श्रीहरी महाराज रसाळ : श्री वटवृक्ष देवस्थानमध्ये भागवत कथासप्ताह



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ जुलै-**

आधुनिक विज्ञान युगात निरस व बेचैन झालेल्या मानवी जीवनामध्ये सुख, समाधान निर्माण करुन मानवाच्या जीवनासोबतच त्याचा मृत्यूही मंगलमय बनविण्याची किमया भागवत ग्रंथामध्ये असल्याचे ह.भ.प.श्रीहरी महाराज रसाळ (अंबड जि.जालना) यांनी सांगितले.

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने ज्योतीबा मंडपात श्रावणमासानिमित्त भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या सप्ताहात निरुपण करताना ते बोलत होते. देवस्थान समितीच्या वतीने चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी त्यांचा सपत्नीक स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचीत सन्मान केला. पुढे बोलताना श्रीहरी महाराज यांनी श्रवण भक्तीतून कशी मुक्ती मिळविता येते हे परिक्षित राजाच्या उदाहरणातून दिसुन येते. गीता हे मानवी जीवन कसं जगावं हे शिकविते तर भागवत जगणं संपल्यावर कसं मृत्युशी एकरुप व्हावं हे शिकविते. भागवतामधील प्रत्येक कथा ही मनुष्याला भगवंताच्या प्राप्तीची अतिशय सुलभतेने कशी प्राप्त होते हे दाखवते. निर्व्यसनी जीवन, आई वडीलांची सेवा, साधुसंत सेवा, देशसेवा आणि धर्मरक्षण करीत मानवी जीवनाची मुल्यं जपत शेवटी आपला मृत्यु मंगलमय व्हावा यासाठी गीता आणि भागवत या ग्रंथाचे श्रवण नित्य करावे हाच संदेश आम्हाला संतांनी दिला असून संतांची ही विचारसरणी आजच्या तरुणांनीही अंगिकारावी असेही विवेचन करून श्रीहरी महाराजांनी वटवृक्ष मंदिरातील भागवत कथेची सांगता केली. कार्यक्रमास प्रथमेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वलाताई सरदेशमुख, संतोष पराणे, स्वामीनाथ लोणारी, सागर गोंडाळ, मोहन जाधव, गिरीश पवार, प्रसाद सोनार, संजय पवार, संतोष जमगे, श्रीशैल गवंडी, खाजप्पा झंपले, प्रा.शिवशरण अचलेर, बाळासाहेब एकबोटे, अंकूश केत, सुनिल पवार, अमर पाटील, आदींसह हजारो भाविकांनी उपस्थित राहुन कथा श्रवणाचा लाभ घेतला.

# प्रा. डॉ. राहुल पालके यांना सोलापूर विद्यापीठाची संशोधक मार्गदर्शकाची मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३१ जुलै-**

येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील प्रा.डॉ. राहुल पालके यांना पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठाची संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.



प्रा.डॉ. पालके यांनी इक्सप्लोरिंग द सोशिओ, कल्चरल ॲण्ड हिस्टॉरिकल सपेक्टस इन द सिलेक्ट ऑफ अमिताव घोष या विषयावर पीएच.डी. पदवी प्रा.डॉ. हनुमंत आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राप्त केली. गेली १० वर्षे ते इंग्रजी विषयाचे पदवी व पदव्युतर वर्गासाठी अध्यापनाचे कार्य करीत आहेत. त्यांना साहित्य लेखनासाठी वामनदादा कर्डक अध्यासन केंद्राचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव, उपाध्यक्ष नंदनजी जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, सहसचिव ए.पी. देबडवार, खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. ए.बी.शेख, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. समाधान पवार, प्राचार्य डॉ. अशोक कदम, डॉ. अनिल कट्टे, डॉ. कल्याण साठे, डॉ. सदाशिव माने, डॉ. सोमनाथ यादव, डॉ. अशोक अनमुलवार सहकारी, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

# जिल्ह्यात आजपासून महसूल सप्ताह

### रंगभवन सभागृहात होणार शुभारंभ कार्यक्रम

### रक्तदान व आरोग्य शिबिराचेही आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

महसूल विभागातर्फे जिल्ह्यात दि. १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. १ ऑगस्ट रोजी रंगभवन येथे शुभारंभाचा कार्यक्रम होणार आहे. जिल्हा व तालुका स्तरावर विविध कार्यक्रम ाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.

सोलापूर महसूल प्रशासनामार्फत महसूल सप्ताहमध्ये घ्यावयाच्या कार्यक्रमाचा तपशील : दिनांक, कार्यक्रमाचे स्वरुप:- १ ऑगस्ट महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ महसूल संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभ. २ ऑगस्ट शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणेबाबत कार्यक्रम. ३ ऑगस्ट पाणंद, शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे. ४ ऑगस्ट छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविण. ५ ऑगस्ट विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांना घरभेटी करुन डीबीटी करुन अनुदानाचे वाटप करणे. ६ ऑगस्ट शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे, सरकारजमा करणे) निर्णय घेणे. ७ ऑगस्ट M-Sand धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे (SOP प्रमाणे) धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ. उपरोक्त प्रमाणे १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताह निमित्त सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. हे सर्व कार्यक्रम जिल्हा, तालुका स्तरावर महसूल विभागाच्या वतीने आयोजित केले जाणार आहेत. तरी या सर्व कार्यक्रमांना संबंधित महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# शेतात जाऊ नको म्हणाल्याने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**




आमच्या शेतात जाऊ नको असे म्हणाल्याने महिलेला दगडाने मारहाण करून जखमी केले. ही मारहाण गुरुवारी सकाळी अकराच्या सुमारास झाली. सुमन नारायण लवटे (वय ३५, रा. रेववाडी ता मंगळवेढा) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. सुमन या गुरुवारी सकाळच्या सुमारास त्यांच्या राहत्या घराजवळ थांबल्या होत्या. त्यावेळी आमच्या शेतात जाऊ नको असे म्हटल्याने अमोल शंकर लवटे व इतर तीन जणांनी मिळून दगडाने मारहाण केली. यात सुमन यांच्या डोळयाखाली जखम झाली असून सर्वांगास मुकामार लागल्याने दुपारी २.४५ वाजता स्वत: शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### जुलै महिन्यात २२.२३ कोटी मिळकत कर वसूल

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

सोलापूर महापालिकेतील मिळकत कर संकलन विभागाकडून जुलै महिन्यात २२ कोटी २३ लाख रुपये मिळकत कर वसूल करण्यात आला आहे. गवसू विभाग आणि पाणीपट्टीसोडून ही वसुली करण्यात आली आहे, अशी मिळकत कर संकलन विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांनी दिली. सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली मिळकतकर संकलन विभागाच्या माध्यमातून मिळकतकर वसुलीची मोहीम नियोजनपूर्वक सुरू आहे. जुलै या महिनाभरात मिळकत कर वसुलीपोटी महापालिका तिजोरीत २२ कोटी २३ लाख रुपये कर भरणा झाला आहे.



**गत चार महिन्यात महापालिका तिजोरीत ६३ कोटीचा कर भरणा**

दरम्यान, माहे एप्रिल ते जुलै २०२५ या कालावधीत एकूण ६३ कोटी रुपये मिळकत कर वसुली करण्यात आली आहे. सोलापूर शहरातील मिळकतदारांनी आपला मिळकत कर आणि थकबाकी भरून महापालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अधीक्षक युवराज गाडेकर यांनी केले आहे.

### ५४ मीटर रस्त्याचे काम त्वरित पुर्ण करावे; शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने आयुक्तांना निवेदन

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने सोलापूर शहरातील विविध नागरी समस्याबाबत आयुक्तांना निवेदन देण्यात आले. यावेळी सोलापूरच्या पाणीपुरवठा होणाऱ्या टाक्या जवळ असणारा कचरा व पूर्ण क्षमतेने भरणाऱ्या टाक्यांची यादी फोटो आयुक्त यांना देण्यात आले. यावेळी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तात्काळ दखल घेऊन त्या त्या संबंधित अधिकाऱ्यांना फोन द्वारे आदेश दिले. समक्ष जागेवर जाऊन पाहणी करून ते काम मार्गी लावा असे सांगण्यात आले. मरीआई चौकातील जुना रेल्वे उड्डाणपूल पाडकाम सुरू होणार असल्याने त्या भागातील नागरिकांची रहदारीची अडचण होऊ नये म्हणून ५४ मीटर रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करून रहदारी चालू करण्यात यावी. किडवाई चौक येथील सुशोभीकरण करावे आदी मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी आयुक्त यांनी त्वरित कारवाई करण्याबाबत आदेश दिले. यावेळी शहराध्यक्ष सुधीर खटमल, प्रदेश उपाध्यक्ष भारत जाधव, माजी महापौर नलिनी चंदेले,जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार ,युवक प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर, महिला अध्यक्ष सुनीता रोटे, दादाराव रोटे, प्रतीक्षा चव्हाण, रेखा सपाटे, मनीषा माने, सूर्यकांत शेरखाने, प्रवीण वाडे, शक्ती कटकदौड, जावेद शिकलकर, संजय जाबा, राकेश सोनी, युवक कार्याध्यक्ष राम पवार, मोनिका सरकार, चौगुले,बिरप्पा बडगर, व्हि. डी. गायकवाड, रामप्रसाद शोगालालू आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### नगरअभियंता, कर विभागाला मिळाले नवीन वाहन; महापालिकेच्या ताफ्यात दोन नवीन वाहने

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

महापालिकेतील नगर अभियंता तसेच मिळकतकर विभागाला प्रत्येकी एक नवीन चारचाकी वाहन देण्यात आले आहे, अशी माहिती महापालिका वाहन विभागाचे अभियंता गिरीश पुकाळे यांनी दिली. महिंद्रा बोलेरो कंपनीचे हे वाहन असून त्याची किंमत प्रत्येकी ११ लाख आहे. केंद्र शासनाच्या जीईएम पोर्टलवरून या वाहनांची खरेदी करण्यात आली आहे. यापूर्वी मिळकतकर विभागाकडे दोन वाहने होती. पंधरा वर्षांच्या मुदतीनंतर या वाहनांचे आयुर्मान संपल्याने ही वाहने निर्लेखित करण्यात आली आहेत. नगर अभियंता व मिळकतकर विभाग यांना प्रत्येकी एक नवीन वाहन देण्यात आले आहे. नगर अभियंता विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना विविध ठिकाणी भेटी देण्यासाठी वाहनाची गरज असते तसेच कर विभागाला कर वसुलीसाठी पथकांच्या माध्यमातून ठिकठिकाणी जावे लागते. यासाठी वाहनाची गरज असते. या दोन्ही विभागाला नवीन वाहने देण्यात आल्याने त्याचा महापालिकेच्या कामासाठी चांगला उपयोग होऊन कामकाजाची गती वाढणार आहे.




## निधन वृत्त...

### धवल शहा

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**



विजापूर रोड आरटीओ ऑफिस जवळील रहिवासी धवल विवेक शहा (वय ४५) यांचे बुधवार ३० जुलै रोजी आकस्मिक निधन झाले त्यांच्या पश्चात आई आहे. पुनम लॉजचे राजन व हितेंद्र वोरा यांचा तो भाचा होता.

### शिवमंदिर चक्रे

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**



जय बजरंग नगर, मजरेवाडी येथील शिवमंदिर सिद्राम चक्रे (वय ८०) याचे गुरूवारी ३१ जुलै रोजी दुपारी ३.४५ च्या सुमारासवृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा त्यांचा राहत्या घरातून शुक्रवार १ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३० वाजता निघणार आहे. आचेगाव येथील शेतात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार होतील होणार आहे.

### विजया सुरवसे

**पंढरपूर, दि. ३१ जुलै -**



विठ्ठल मंदिराजळील विजया हरिभाऊ सुरवसे(वय ८०) यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्च्यात ४ मुली, जावई, सूना व नातवंडे असा परिवार आहे. पंढरपूर नगरपालिका कार्यालयातील वैशाली सतीश सुरवसे यांच्या त्या सासू आहेत.

# सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयाबाहेर आत्मदहनाचा प्रयत्न

### यापुढे मंत्रालयासमोर करणार आत्मदहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

महाराष्ट्र बांधकाम कामगार न्यायव हक्क संघर्ष समितीच्या वतीने बांधकाम कामगारांची होणारी लूट थांबवून ठेकेदाराचा ठेका रद्द करावा या मागणीसाठी सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



बांधकाम कामगारांकडून भांडी वाटप करताना, ठेकेदार १००० ते १५०० रुपये घेऊन, भांडी संच देतात., यावरून बांधकाम कामगार संघर्ष समितीच्या वतीने, सहाय्यक कामगार आयुक्तांना अक्कलकोट विभागाचे ठेकेदार शंतनू शेठे, निखिल बिराजदार, यांचा ठेका रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा ३१ जुलै २०२५, रोजी सामुदायिक आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला, त्यानुसार ३१ जुलै रोजी सकाळी ११ वा. संघर्ष समितीचे आंदोलक सहाय्यक कामगार आयुक्त यांना आंदोलनापूर्वी भेटण्यास गेले असता, सहाय्यक कामगार आयुक्त हे कार्यालयातून बेपत्ता झाले. दोन तास त्यांची वाट बघून आंदोलक आक्रमक झाले. विष्णू कारमपुरी अंगद जाधव, सोहेल शेख, गणेश बोड्डु, यांनी डिझेल अंगावर ओतून घेऊन पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पोलिसांनी सर्व कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी आंदोलकांनी सहाय्यक कामगार आयुक्त मुर्दाबाद, शंतनु शेठे, निखिल बिराजदार यांचा ठेका रद्द करा, बांधकाम कामगार एकजुटीचा विजय असो, बांधकाम कामगारांना लुटणाऱ्या टोळीचा धीक्कार असो, मोफत भांडी मिळालीच पाहिजे, अशा घोषणा दिल्या.

यावेळी वैशाली बनसोडे, रेखा आडकी, राधिका मिठ्ठा, सविता दासरी, पद्मा मॅकल, लक्ष्मी रच्चा, सुनीता गुंटला, शिवाजी पवार, लहू वाघमारे, सचिन गायकवाड, बाळासाहेब हजारे, आनंद कोकणे, सुनील हेगने, गुरुनाथ कोळी, श्रीनिवास बोगा, विठ्ठल कुराडकर, पप्पू शेख यांच्यासह संघर्ष समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

**पत्नी व मुलीची बदनामी करणाऱ्या**

### पोलिस कर्मचाऱ्याविरुध्द अदखलपात्र गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

न्यायालयाची प्रत देऊन पत्नी व मुलीची बदनामी करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिस कर्मचारी असलेल्या पतीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी व आरोपी हे पती-पत्नी असून पती हे सोलापूर शहर पोलिस दलात कर्मचारी आहेत. हे दोघे गेल्या सात वर्षापासून विभक्त राहतात. न्यायालयामध्ये त्यांची केस चालू आहे. २८ जुलै २०२५ रोजी न्यायालयाने दिलेली प्रत यातील आरोपी पोलिस कर्मचारी पतीने समाजातील लोकांना देऊन पत्नी व मुलगी यांची समाजामध्ये बदनामी केली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत.

# संस्कृतमुळे एक वेगळी ओळख निर्माण होते : प्रा. रजनी जोशी

### संस्कृत संभाषण वर्ग समारोप कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ जुलै-**

संस्कृत शिकल्यामुळे आपली एक वेगळी ओळख निर्माण होते आणि त्यासाठी सर्वांनी संस्कृत भाषेवर प्रेम करावे तसेच ती आत्मसात करावी, असे प्रतिपादन बार्शीतील ख्यातनाम संस्कृत पण्डिता प्रा. डॉ. रजनी जोशी यांनी केले.




सोजर इंग्लिश स्कूल आणि संस्कृत भारती यांच्यावतीने आयोजित संस्कृत संभाषण वर्गाच्या समारोप कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर संस्कृत भारतीचे पश्चिम प्रांत प्रमुख डॉ. ना. पां. देशपांडे, संस्कृत भारतीच्या सदस्या वंदना कुलकर्णी, संस्कृत वर्गाचे प्रशिक्षक जितेश सोनार, ज्येष्ठ संगीततज्ज्ञ प्रा.डॉ. अबोली सुलाखे, यशोदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सचिवा कल्पना बारबोले तसेच मुख्याध्यापक संदीप पोळ उपस्थित होते. यावेळी प्रांत प्रमुख डॉ. देशपांडे यांनी मनोगत व्यक्त केले. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी फरहान मुलाणी, श्रीनिवास शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. कृष्णा इंगळे याने संस्कृत भाषेत लघुकथा सांगितली. सिध्दी मोरे हिने मम माता: या विषयावर भाषण केले. साद शेख आणि प्रतिक जाधव यांनी छात्रालाप सादर केला तर आर्या बारंगुळे हिने केलेल्या संग्रहीत वस्तुंची संस्कृत भाषेतील नांवे सांगितली. यावेळी इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांनी संस्कृत गीते सादर केली. यावेळी शाळेच्या निर्धारीत केलेल्या विविध समित्यांच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेत प्रथम आलेल्या सम्यक जानराव आणि हर्षदा शेळके यांचा गौरवचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. अबोली सुलाखे यांनी संस्कृत वर्गात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यासाठी १ हजार रुपये जाहीर केले. संस्कृत शिक्षक प्रसाद सहस्त्रबुध्दे यांनी प्रास्ताविक केले. जान्हवी शेळके यांनी सूत्रसंचालन केले. हर्षदा शेळके यांनी आभार मानले.

# संविधानाचा अवमान करणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### रिपाइंची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि.३१ जुलै-**

अॅड. शिवाजी कोकणे लिखित संविधान का बदलावे या पुस्तकावर बंदी घालावी व लेखक, प्रकाशक आणि आयोजकांवर राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) माळशिरस तालुक्याच्यावतीने करण्यात आली आहे.



राष्ट्रध्वजाचा अवमान करणाऱ्या संभाजी भिडे यांच्यावरही देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली. तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदारांना राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन देण्यात आले. यावेळी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी संविधानाचा अवमान करणाऱ्यांविरोधात गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी माळशिरस तहसीलदारांना निवेदन देताना पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन. के. साळवे, संघटक एस. एम. गायकवाड, जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक आघाडी प्रदेश उपाध्यक्ष किरणतात्या धाईंजे, जिल्हा सचिव रमेश धाईंजे, तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, अकलूज शहराध्यक्ष अजित मोरे, संघटन सचिव पोपट गेजगे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, कोषाध्यक्ष समीर सोरटे, मार्गदर्शक प्रा.भास्कर बनसोडे, तालुका उपाध्यक्ष बापूसाहेब पोळके, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, रामभाऊ कांबळे, सुनील ओवाळ, दिलीपदादा सरतापे, महेंद्र लोंढे, तालुका संपर्कप्रमुख अण्णासाहेब भोसले, तालुका संघटक प्रकाश गायकवाड, युवक तालुका उपाध्यक्ष बाबुराव भोसले, तालुका सचिव दादासाहेब सरतापे, प्रसिद्ध प्रमुख मारुती शिंदे, तसेच गणेश सावंत, सुधीर भोसले, संतोष बनसोडे, विश्वजीत भालशंकर, आसिफ शेख, गौतम वाघमारे, संतोष जाधव, सोमनाथ वाघमारे, अण्णासाहेब कुचेकर, दिलीप भोसले, स्वप्नील सरवदे, आप्पा सावंत, योगेश लोंढे, सुभाष सरतापे, तात्यासाहेब लोंढे, नितीन जाधव, प्रेम सरतापे, भगवान भोसले, महादेव मोरे, रमेशभाऊ भोसले, सचिन ताकतोडे, तानाजी बाबर, अॅड. स्वप्निल सोनवणे, प्रदीपभाऊ लोंढे उपस्थित होते.

### तरूणास धडक; दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

वॉकिंग करून घराकडे जाणाऱ्या पादचारी तरूणास धडक देणाऱ्या दुचाकीचालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिध्दार्थ अनिल थोरात (वय ३२, रा. रमाबाई आंबेडकर नगर, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमएच १३ सीझेड १९६६ क्रमांकाच्या दुचाकीचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २७ जुलै रोजी पहाटे साडेसहाच्या सुमारास सिध्दर्थ थोरात व त्यांची आई, काकू स्वाती, शशिकला हे मिळून वॉकींग करून घराकडे जात होते. मसोबा चौकात रूपाभवानी चौकाकडून आलेल्या एमएच १३ सीझेड १९६६ क्रमांकाच्या दुचाकीस्वाराने दुचाकी भरधाव चालवून थोरात यांच्या आईस जोरदार धडक दिली. यामध्ये थोरात यांची आईच्या डोक्यास, हाताला व पायाला मार लागला असून अपघातानंतर दुचाकीस्वार पळून गेला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार भोगशेट्टी पुढील तपास करीत आहेत.

# विडी कामगारांसाठी कुंभारी येथे ५० खाटांचे विमा रुग्णालय तात्काळ सुरू करा : आडम

### सहा. कामगार आयुक्त अनुप्रितसिंग मुंबई यांची सीटू कार्यालयास भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

कॉ. गोदुताई परुळेकर महिला बीडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या माध्यमातून कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे १० हजार विडी कामगारांसाठी विशेष गृहनिर्माण प्रकल्प उभारण्यात आला आहे. या वसाहतीत २००६ पासून बीडी कामगार वास्तव्यास आहेत. सध्या येथे सुमारे ३० ते ४० हजार रहिवासी असून, प्राथमिक आणि आपत्कालीन आरोग्यसेवांचा पूर्णतः अभाव आहे. या पार्श्वभूमीवर कुंभारी येथे किमान ५० खाटांचे कर्मचारी राज्य विमा रुग्णालय तात्काळ सुरू करण्याची मागणी कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी केली आहे. यावेळी त्यांनी मागण्याचे निवेदन देण्यात आले. या प्रकरणी सहा.कामगार आयुक्त अनुप्रित सिंग यांनी हा विषय धोरणात्मक असून शासनास शिफारस करणार असल्याचे सांगितले.



**या आहेत मागण्या**

१) कुंभारी (ता. दक्षिण सोलापूर) येथे स्वतंत्र विमा आधारित किंवा बीडी कल्याण योजनेअंतर्गत किमान ५० खाटांचे रुग्णालय तात्काळ उभारा. २) या रुग्णालयात स्त्रीरोगतज्ज्ञ, सामान्य वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, औषधवाटप केंद्र व प्राथमिक तपासणी सुविधा द्या. ३) सर्व बीडी कामगार व त्यांच्या कुटुंबीयांची किंवा बीडी वेल्फेअर योजनेअंतर्गत नोंदणी करण्यासाठी विशेष अभियान राबवा. ४) नियमितपणे मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, वैद्यकीय सेवा व आरोग्य जनजागृती कार्यक्रम राबवा. ५) या रुग्णालयासाठी आवश्यक असलेली किमान दोन एकर जागा तातडीने संपादित करून उपलब्ध करून द्या

सिटूच्या मध्यवर्ती कार्यालयात, दत्त नगर येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्रालयाच्या मुंबई विभागाचे सहाय्यक कामगार आयुक्त अनुप्रित सिंग व सोलापूर विमा दवाखाना वैद्यकीय अधिकारी डॉ.अमरनाथ जाधव यांनी विडी कामगारांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्तीविषयी जनजागृती अभियानांतर्गत भेट दिली. यावेळी सिटूच्या वतीने सत्कार करण्यात आला. या बैठकीस सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम. एच. शेख, माकपचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर, माजी नगरसेविका कॉ. नलिनी कलबुर्गी, नसीमा शेख, शेवंता देशमुख, सुनंदा बल्ला, शकुंतला पाणीभाते, लिंगव्वा सोलापूरे, विक्रम कलबुर्गी, किशोर मेहता, अॅड. अनिल वासम, कॉ. दत्ता चव्हाण, दीपक निकंबे,अशोक बल्ला, अरुण सामल, गजेंद्र दंडी, अकील शेख, अमित मंचले, शहाबुद्दीन शेख, आसिफ पठाण आदी उपस्थित होते.

### दुचाकीस्वारास मारहाण; चौघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. ३१ जुलै -**

अक्कलकोट रोडवरील साई सुपर मार्केटसमोरून दुचाकीवरून जाणाऱ्यास विनाकारण मारहाण करणाऱ्या चौघांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रविंद्र सिरपत विटकर (वय ५५, रा. गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आसिफ अब्दुल फुलमामडी (वय ३१, रा. साखर पेठ, सोलापूर) आणि इतर तीन अनोळखी व्यक्ती यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २९ जुलै रोजी रात्री दहाच्या सुमारास रविंद्र विटकर हे साई सुपर मार्केटच्या समोरून पाणी टाकीकडे दुचाकीवरून येत होते. त्यावेळी आसिफ फुलमामडी व त्याच्या तीन साथीदारांनी विटकर यांना विनाकारण लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ करून तुला बघून घेतो अशी धमकी दिली. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाआहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक भांबिष्टे पुढील तपास करीत आहेत.

# पाच लाखांसाठी विवाहितेचा छळ करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

माहेरून पाच लाख रुपये आणण्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मैवश म. उमेज मुजावर (वय २४, रा. साखर पेठ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती म. उमेज, सासरे एजाजअहमद, सासू यास्मीन, नणंद मिसबा अन्सारी (रा. दक्षिण सदर बझार, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मैवश व म. उमेज यांचा विवाह झालेला असून ७ जानेवारी २०२५ ते ८ जुलै २०२५ या कालावधीत मैवश या पतीसोबत सासरी राहात होत्या. त्यावेळी पती म. उमेज व त्याच्या घरातील लोकांनी मिळून मैवश हिस तुझ्या आई वडीलांनी लग्नात मानपान केला नाही, व्यापाऱ्यासाठी माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये म्हणून शिवीगळ करून दमदाटी करून मारहाण केली. तसेच शारीरीक व मानसिक छळ करून माहेरी हाकलून दिले. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार ईनामदार पुढील तपास करीत आहेत.

# स्वेरीच्या लॉ कॉलेजला मान्यता; स्वेरीत आता पाचवे महाविद्यालय

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जुलै-**

येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट मध्ये चालू शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून 'स्वेरी लॉ कॉलेज, पंढरपूर' या नावाने नवीन महाविद्यालय सुरु झाल्याची माहिती स्वेरीचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.




सन १९९८ साली गोपाळपूरच्या माळरानावर स्वेरी अर्थात श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर या संस्थेची पायाभरणी करीत इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू केले. व्यावसायिक शिक्षणाचा 'पंढरपूर पॅटर्न' यशस्वी पणे राबवण्यात आला. बी. फार्मसी, डी.फार्मसी, डिप्लोमा अभियांत्रिकी या अभ्यासक्रमांची महाविद्यालये स्थापन करण्यात आली. कालांतराने या महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी असलेला एम.बी.ए. हा अभ्यासक्रम २००८ पासून सुरु करण्यात आला. सोबतीला एम.ई./एम. टेक., एम. फार्मसी, एम.सी.ए. व इंजिनिअरिंगचे पीएच.डी. हे अभ्यासक्रम देखील सुरु करण्यात आले. स्वेरीची गुणवत्ता व शिक्षण संस्कृती लक्षात घेता प्रत्येकी ६० प्रवेश क्षमतेसह बी.ए.एल.एल.बी. (५ वर्षे) व एल.एल.बी. (३ वर्षे) या अभ्यासक्रमांसाठी बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडून मान्यता तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर कडून प्रथम संलग्निकरणास मान्यता मिळाली आहे. एकूणच स्वेरीतील 'पंढरपूर पॅटर्न इन प्रोफेशनल एज्युकेशन', आदरयुक्त शिस्त आणि संस्कार, वार्षिक परीक्षांचे निकाल, गुणवत्ता आणि प्लेसमेंट मधून होणारी विद्यार्थ्यांची विक्रमी निवड या पार्श्वभूमीवर या स्वेरी लॉ कॉलेज, पंढरपूरचे देखील जोरदार स्वागत होत असल्याचे दिसून येते. यामुळे आता स्वेरीमध्ये अभियंता, फार्मसिस्ट बरोबरच वकील आणि कायदेतज्ज्ञ देखील घडणार आहेत, हे मात्र नक्की. तीन वर्ष कालावधी असलेल्या एल.एल.बी. च्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अधिक माहीतीसाठी प्रवेश प्रक्रिया विभागाचे अधिष्ठाता डॉ.करण पाटील (९५९५९२११५४) अथवा प्रा. स्वप्नाली गडदवार (९३७३०२३०९७) यांच्याशी संपर्क साधावा.



सोलापूर
'तरुण भारत'
वर्धापनदिन
चिरायु होवो..!
चेअरमन विठ्ठलगंगा मगर्मर्स प्रोड्यूसर
कंपनी निमगाव (टें) ता.माढा
मा.धनराजदादा
रमेश (मालक) शिंदे
सौजन्य
अंकुशा स्टोअर * विठ्ठलगंगा फार्मर्स
प्रोड्यूसर कंपनी निमगांव (टें)





मा.अजितदादा पवार
लोकप्रिय उपमुख्यमंत्री
मा.बबनदादा शिंदे
माजी आमदार
मा.रमेशजी शिंदे
मालक
करमाळा, माढा विधानसभेचे लोकप्रिय आमदार
मा.संजयमामा शिंदे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
तरुण भारत
दैनिक तरुण भारतच्या
४१ व्या वर्धापन
दिनानिमित्त शुभेच्छा!
मा.यशवंतभैय्या शिंदे
आदर्श सरपंच
शुभेच्छुक
दादाश्री एंटरप्रायझेस, चिंचगाव, ता. माढा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महत्वाचे...



## गायक डॉ. अतिंद्र सरवडीकर यांच्या ग्रंथाचे लोकार्पण

**मुंबई, दि. ३१ जुलै-**

सुप्रसिद्ध गायक आणि सोलापूरचे सुपुत्र डॉ.अतिंद्र सरवडीकर यांच्या २५५ रागदारी बंदिशींचा संग्रह 'रागमुद्रा' आणि किराणा घराण्याच्या परंपरेवर आधारित इंग्रजी भाषेतील 'किराना घराना ट्रॅडिशन इवोल्युशन अँड चेंजिग ट्रेंड्स' या दोन ग्रंथांचा दिमाखदार लोकार्पण सोहळा दिनांक २६ जुलै रोजी रवींद्र नाट्यमंदिर मुंबई येथे पार पडला. संगीत जगतातील मान्यवर पंडित अरुण कशाळकर, प्रतिभावान संगीतकार कौशल इनामदार, मुंबई विद्यापीठ संगीत विभाग प्रमुख प्रा.कुणाल इंगळे आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. ज्येष्ठ रचनाकार पंडित शंकर अभ्यंकर देखील आभासी माध्यमातून या प्रसंगी सहभागी झाले होते. संस्कार प्रकाशन कडून ही पुस्तके प्रकाशित करण्यात आली. डॉ. अतिंद्र यांनी यापुढेही शास्त्रीय संगीताच्या नवनिर्मिती साठी कटिबद्ध रहावे, असे भावोद्गार संस्कार प्रकाशनचे प्रसाद कुलकर्णी यांनी प्रकट केले. सोहळ्यानंतर डॉ.अतिंद्र सरवडीकर आणि त्यांच्या शिष्य परिवाराकडून 'रागमुद्रा'तील रचनांचे प्रभावी सादरीकरण ऐकण्याची पर्वणी रसिकांना लाभली. यावेळी हार्मोनियमवर लीलाधर चक्रदेव आणि तबल्यावर मंदार पुराणिक यांनी साथ संगत केली. किरण सोहळे यांनी सूत्रसंचालन केले.



## सांगोला महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. प्रकाश बनसोडे यांचा सन्मान

**सांगोला, दि. ३१ जुलै-**

राष्ट्रीय स्तरावरील केमिस्ट्री इनोवेशन चॅलेंज केम स्पार्क २०२५ या संशोधन प्रकल्प स्पर्धेत सांगोला महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील व कॅन्सर संशोधक प्रा.डॉ.प्रकाश अरुण बनसोडे यांच्या फेरोसिन लेबल्ड मॉलिक्युल्स अँड देअर अँटी कॅन्सर इव्हॅल्युएशन या संशोधन प्रकल्पास स्पर्धेतील तज्ञ समितीच्या वतीने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक, रोख रक्कम व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. या यशाबद्दल सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे अध्यक्ष बाबुरावजी गायकवाड, उपाध्यक्ष तात्यासाहेब केदार, उपाध्यक्ष प्रा.पी. सी.झपके, सेक्रेटरी ड.उदयबापू घोंगडे, सहसेक्रेटरी साहेबराव ढेकळे, खजिनदार नागेश गुळमिरे, म.सि.झिरपे व सदस्य यांनी अभिनंदन केले. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.राम पवार, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे हे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयातील पीएच. डी. मार्गदर्शक मान्यता प्राप्त आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आठ विद्यार्थी पीएच.डी.चे संशोधन पूर्ण करीत आहेत. तसेच ते सांगोला महाविद्यालयाच्या संशोधन व विकास विभागाचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

## शेतीच्या बांधाच्या कारणावरून वृध्दाला मारहाण

### गौडगाव येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

शेतीच्या बांधाच्या कारणावरून वृध्दाला मारहाण करण्यात आली. ही मारहाण २८ जुलै रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास गौडगावात झाली. मल्लिनाथ इरण्णा कुंभार (वय ५५, रा. गौडगाव ता. अ. कोट) असे मारहाण झालेल्या वृध्दाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी पाचच्या सुमारास मल्लिनाथ हे गौडगाव येथील त्यांच्या राहत्या घराजवळ थांबले होते. त्यावेळी त्यांना चौडप्पा बसवराज कुंभार व इतर दोन यांनी लाकडाने मारहाण केली. यात मल्लिनाथ यांच्या डोक्याला जखम झाली. अक्कलकोट येथील सरकारी रुग्णालयात उपचार घेऊन मुलगा इरण्णा कुंभार यांनी गुरुवारी दुपारी १.४५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# पंढरपूर-मंगळवेढ्यातील वीजेची कामे मार्गी लागणार

### आमदार आवताडे : राज्यमंत्र्यांच्या आढावा बैठकीत १९ मागण्यांना हिरवा कंदील

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ जुलै -**

तीर्थक्षेत्र पंढरपूरमध्ये पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण करणेसाठी आमदार समाधान आवताडे यांनी ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या समवेत मुंबईत आढावा बैठक घेतली. यामध्ये पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघांतील विविध विद्युत कामे लवकरच मार्गी लावण्याची मागणी केली. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत सदरच्या मागण्यांच्या कार्यवाहीबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्याने मतदारसंघातील महावितरण व महापारेषण विभागाकडील मंजूर तसेच प्रलंबित कामाबाबत हिरवा कंदील दाखवला आहे.

पंढरपूर शहराचा वाढता आलेख लक्षात घेता काही नवीन कामे तसेच शहरात वर्षाकाठी भरणाऱ्या चार यात्रांमध्ये भाविकांना महत्त्वाच्या ठिकाणी विद्युत प्रकाशाबाबत निर्णय घेण्यात आला. सदर बैठकीमध्ये पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात ज्या शेतकऱ्यांना सोलर पाहिजे त्यांना सोलरवर कनेक्शन व ज्यांना विजेचे कनेक्शन पाहिजे आहे त्यांना विजेचे कनेक्शन दिले जावे. मतदार संघामध्ये



ओव्हरलोड असलेल्या सब स्टेशनमध्ये अतिरिक्त ट्रान्सफार्मर बसवण्यात यावेत. मतदारसंघांमध्ये मुख्यमंत्री सोलर योजनेची कामे चालू आहेत व आरडीएसएस या कामांना गती देण्यात यावी. मतदारसंघांमध्ये शासनाच्या निरंतर योजनेतून जे ओव्हरलोड ६३ चे ट्रान्सफार्मर आहेत त्या ठिकाणी शंभरचे ट्रान्सफार्मर बसवण्यात यावे यासाठी लागणाऱ्या निधीचीही मागणी यावेळी करण्यात आली.

**पंढरपूर तालुक्यातील कामे :** पंढरपूर शहरासाठी चंद्रभागा नदीपात्रामध्ये असलेली ११ केवी उच्चदाबाची लाईन घाटाच्या बाजूने अंडरग्राउंड टाकण्यात यावी. गोपाळपूर येथील दर्शनरांग शेजारील पत्राशेड येथे ३३ केवी सबस्टेशन असावे. तसेच वाखरी पालखीतळावर सुद्धा ३३ केवी सबस्टेशन असावे. पंढरपूर सांगोला रोडवरील महावितरण येथे मोठे वर्कशॉप आहे. त्या बाजूला ३३/११ सब स्टेशन उभारणे गरजेचे आहे. ६५ एकर मध्ये ३३/११ सबस्टेशन उभारणे. पंढरपूर परिसरामध्ये ४०० केवीचे सब स्टेशन उभारण्यात यावे., महापारेषणचे सोलापूर येथे सर्कल ऑफिस असून त्याचे विभाजन करून पंढरपूर येथे सर्कल ऑफिस उभारण्यात यावे.

**मंगळवेढा तालुक्यातील कामे :** मंगळवेढा शहर व तालुक्यासाठी यड्राव आणि कचरेवाडी येथे ३३/११ सबस्टेशन उभारणे. मंगळवेढा शहरात दुसरी नवीन वाहिनी टाकण्यात यावी. मंगळवेढा तालुक्यात विभागीय कार्यालय उभारण्यात यावे. नंदुर सब स्टेशनचे काम संथ गतीने केले असल्यामुळे संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्याच्या सूचना राज्यमंत्री यांनी दिल्या. मंजूर असलेले लक्ष्मी दहिवडी मंगळवेढा शहर, मरोळी, गोपाळपूर, विठ्ठल मंदिर येथे सब स्टेशनचे काम तत्काळ सुरू करण्याची मागणी करण्यात आली., निंबोणी येथे १३२ केवीचे सब स्टेशन उभा केले आहे. त्यावर लोड नसून दक्षिण भागातील सब स्टेशनचा लोड त्यावर टाकण्यात यावा.,मंगळवेढा शहर व एमआयडीसी भागांमध्ये वीस जाण्याचे व वीज दाब कमी जास्त होण्याचे प्रमाण वाढत असल्याने नागरिक व व्यापाऱ्यांना याचा त्रास होत आहे तरी त्यामध्ये सुधारणा करण्यात यावी आदी मागण्या राज्याच्या ऊर्जा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांच्या कडे मतदार संघाचे आमदार समाधान दादा आवताडे केल्यानंतर सर्व मागण्या मान्य करत सर्व विषयावर कार्यवाही करण्याच्या सूचनाही संबंधित विभागातील अधिकारी यांना दिल्या आहेत.

## बार्शीत प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त

### सातजणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ जुलै-**

बार्शी येथे अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने दोन व्यापारी पेढ्यांवर धाड टाकून १ लाख ५८ हजार ५२४ रुपयांचा प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी सातजणांविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, शहर पोलीस स्टेशनला केस नोंदवण्यात आली आहे.

सहायक आयुक्त (अन्न) साहेबराव देसाई यांच्या नेतृत्वाखाली अन्न सुरक्षा अधिकारी चन्नवीर स्वामी आणि उमेश भुसे यांच्या पथकाने आज ३१ जुलै येथील दोन व्यापारी पेढ्यांवर अचानक धाड टाकली. यामध्ये लता टॉकीज शेजारील रिझवान रहिमान तांबोळी यांच्या मालकीचे ए.एच. ट्रेडर्स आणि गणपती मंदिराजवळील आडवा रस्त्यावरील किरण शंकर कल्याणी यांच्या मालकीचे गजानन ट्रेडर्स या पेढ्यांचा समावेश आहे. या धाडीत बादशाह, के.आर. गुटखा, आर.एम.डी. पान मसाला, विमल पान मसाला, डायरेक्टर, सुगंधित सुपारी आदी प्रतिबंधित अन्न पदार्थांचा साठा जप्त करण्यात आला. जप्त केलेल्या मालाची किंमत १,५८,५२४ रुपये आहे.

या कारवाईनंतर अन्न सुरक्षा अधिकारी चन्नवीर स्वामी यांनी पुढील तपास करुन रिझवान रहिमान तांबोळी, किरण शंकर कल्याणी, तसेच पुरवठादार तांबोळी, शेख, मिलन, राम डोंबे आणि तांबोळी यांच्याविरुद्ध बार्शी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. सदर कारवाई अन्न व औषध प्रशासन, सोलापूरच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी सांगितले की, प्रतिबंधित अन्न पदार्थांच्या विक्रीवर कडक कारवाई सुरु आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. ही कारवाई अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत करण्यात आली असून, पुढील तपास बार्शी पोलीस करत आहेत.

## व्यापाऱ्यांकडून एलबीटी मुक्ती लढाई दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ जुलै-**

एलबीटी मुक्ती लढाई विजय दिनाच्या दशकपूर्तीनिमित्त व्यापाऱ्यांनी एकमेंकाना शुभेच्छा देत हा दिन साजरा केला. यावेळी व्यापारी, उद्योजक हिताचा सतत ध्यास घेत कार्यरत असलेले खंबीर, लढवैय्ये, स्वाभिमानी, तळमळीचे नेतेगण सोलापूर व्यापारी महासंघ अध्यक्ष प्रभाकर वनकुद्रे, सिद्धेश्वर बमणीकाका, स्व.विश्वनाथ करवा, सतत क्रियाशील, धडाडीचे अध्यक्ष राजू राठी, गिरीष देवरमनी व यांना खंबीरपणे साथ देणारे सर्व पदाधिकारी, संचालक, संलग्न संस्था व सदस्यगण उपस्थित होते.

**उद्या** शनि.दि.२ ऑगस्ट रात्रौ ९.३० वा. स्मृति मंदिरात हास्याची धुवांधार बरसात

**हाऊसफुल** होण्याअगोदर आजच तिकीट काढूया... खळखळून हसुया !

प्रसाद खांडेकर सादर करीत आहे
व्ही आर प्रॉडक्शन प्रकाशित

लेखक दिग्दर्शक
प्रसाद महादेव खांडेकर




धो-धो हसविणारे कलाकार
प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव, ओंकार राऊत, प्रथमेश शिवलकर, भक्ती देसाई, भाग्यश्री मिलिंद

फोन बुकिंग संपर्क :
शिवाजी उपरे
9623004299

तिकिट विक्री bookmyshow आणि नाट्यगृहावर सुरु

## ग्रामपंचायत वडशिंगे, तालुका माढा, जिल्हा सोलापूर

### टेंडर नोटीस

ग्रामपंचायत वडशिंगे, तालुका माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदार पुरवठादारकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहे.

**लेखाशिर्ष :- १५ वा वित्त आयोग**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत महिन्यामध्ये | ठेकेदार |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गावठाणात भूमिगत गटार करणे | २,९०,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ. |
| २ | गावठाणात सांडपाणी व घनकचरा भूमिगत गटार करणे | १,५०,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ |
| ३ | गावठाणात काँक्रीट रस्ता करणे | २,४०,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ |
| ४ | मागासवगीय वस्तीत पेव्हिंग ब्लॉक / काँक्रीट रस्ता करणे | १,३२,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.वे.अ |
| ५ | शाळा संरक्षक भिंत व गावांतर्गत रस्ते दुरुस्ती करणे | २,५०,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ |
| ६ | महादेव गवळी ते पोपट शिंदे घर भूमिगत गटार करणे | ३,००,०००/- | - | १००/- | ६ महिने | सु.बे.अ |
| ७ | ग्रामपंचायत ऑफिस दुरुस्ती व सुशोभीकरण करणे | १,८०,०००/- | - | १००/- | ६ महिने | म.स.सं. |
| ८ | पाणीपुरवठा टाकीला वालकंपाऊंड घेणे | २,००,०००/- | - | १००/- | ६ महिने | म.स.सं. |
| ९ | प्राथमिक शाळेसमोरील सार्वजनिक कट्टा दुरुस्ती करणे | १,५०,०००/- | - | १००/- | ६ महिने | म.स.सं. |

**टीप -**
१ कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी ०१/०८/२०२५ सकाळी १० पासून
२ भरलेल्या निविदा स्वीकारण्याच्या दिनांक ०५/०८/२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते ६.०० वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय वडशिंगे.
३ निविदा उघडण्याचा दिनांक ०६/०८/२०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता
४ निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ त ९ ची माहिती ग्रामपंचायतमध्ये पहावयास मिळतील.
५ निविदा मंजूर/नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत कार्यालय, वडशिंगे**
**ता. माढा, जि. सोलापूर**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय, वडशिंगे**
**ता. माढा, जि. सोलापूर**

---

**यूनियन बैंक ऑफ इंडिया / Union Bank of India**

क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

### आर्कीटेक्ट व ठेकेदार यांची ३ वर्षे मुदतीसाठी सुचीबध्द करण्यासाठी निवीदा

युनियन बँक ऑफ इंडीया, क्षेत्रिय कार्यालय, अहिल्यानगर तीन वर्षे मुदतीसाठी नेमणुक करण्यासाठी आर्किटेक्ट / सल्लागार संस्था, सिव्हील व इलेक्टीकल कॉन्टॅक्टर यांचेकडून बंद लिफाफ्यात निवीदा मागवित आहेत. फर्नीशिंग, इंटेरियर डेकोरेशन, लॅण्डस्केपींग कामाचे स्वरूप (४० लाखांपर्यंत) व इलेक्टीकल, ए.सी.व डाटा केबलिंग कामाचे स्वरूप (२० लाखांपर्यंत) आणि आर्कीटेक्ट डिझाईनिंग काम हे अहिल्यानगर क्षेत्रिय कार्यालय कक्षेतील सर्व शाखा व इतर मालमत्ता करीता आहे.

इच्छुक वैयक्तिक/ फर्मस/ कंपनी हे अर्ज फॉर्म हे वरील पत्त्यावरुन रु १,०००/– (विना परतावा) ची अहिल्यानगर येथे देय असलेली व युनियन बँक ऑफ इंडीयाच्या नावे पे ऑर्डर / डिमांड डाफ्टद्वारे भरणा केल्यावर कार्यालयीन वेळेत दि. ०१/०८/ २०२५ ते दि.:२१/०८/२०२५ दरम्यान मिळवता येतील. सदर अर्ज फॉर्म हे बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in व www.eprocure.gov.in. व येथूनही डाऊनलोड करता येतील. पूर्ण भरलेले अर्ज फॉर्म व सिलबंद निविदा वरील पत्त्यावर सादर करण्याची अंतिम तारिख दि. २१/०८/२०२५ दु. ४.०० वाजेपर्यंत आहे.

प्राप्त अथवा कोणताही निविदा अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार युनियन बँक ऑफ इंडीयाने राखून ठेवला आहे.

दि. ०१/०८/२०२५
अहिल्यानगर

क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर

ARL

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

दिवाणी किरकोळ अर्ज नं. १६३/२०२५
नि. ८

### सोलापूर येथील मे. तिसरे जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश (मे. पी.पी. राजवैद्य) यांचे न्यायालयात

१) **श्रीमती सारीका रघुनाथ कोडम**
वय - ३५ वर्षे, धंदा - नोकरी,
२) **कु. प्रथमेश रघुनाथ कोडम**
वय - ११ वर्षे, धंदा - शिक्षण,
अज्ञानाचे अ.पा.क. आई अर्जदार नं. १
३) **कु. श्रीहान रघुनाथ कोडम**
वय - १३ वर्षे, धंदा - शिक्षण,
अज्ञानाचे अ.पा.क. आई अर्जदार नं. १
४) **कु. अखिल रघुनाथ कोडम**
वय - १२ वर्षे, धंदा - शिक्षण,
अज्ञानाचे अ.पा.क. आई अर्जदार नं. १
सर्व रा. द्वारा व्यंकटेश सादुल प्लॉट नं. ७९ शिवशरण नगर, लोकमंगल हॉस्पीटल मागे, निलम नगर रोड, सोलापूर
— **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन** - **सामनेवाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अर्जदार नं. २ ते ४ यांच्या नांवे असलेली मिळकत डि ।। व सब डि ।। सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी कसबे सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढमधील विडी घरकुल येथील पुणे गृहनिर्माण क्षेत्र विकास मंडळ, पुणे यांचेमार्फत जुळे सोलापूर भाग-२ या योजनेतील विडी कामगाराचे अल्प उत्पन्न गटातील जुना सर्व्हे नं. १०४ यांसी नविन सर्व्हे नं. १०२ यापैकी सी ग्रुपमधील गाळा क्र. ११६३ याचे एकूण क्षेत्र ५०.१८ चौ.मी. असून यांसी चतुःसिमा पुढीलप्रमाणे :- पूर्वेस - गाळा नं. ११६२, पश्चिमेस - ४.५ मी. रुंदी रस्ता, दक्षिणेस - गाळा नं. ११६४, उत्तरेस - ४.५ मी. रुंदी रस्ता, येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत त्यातील तदंगभुत वस्तुसह विक्री करण्यास परवानगी मिळावी म्हणून मे. कोर्टात प्रस्तुतचा अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी जर कोणास अज्ञान अर्जदार नं. २ ते ४ यांचे नांवे असलेल्या मिळकतीसंबंधी काही म्हणणे हरकत असल्यास यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा नेमलेली ता. २९/०८/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहावे. तसे न झाल्यास अर्जदार यांना वर नमूद केलेली मिळकत विक्री करण्यास प्रवानगी देण्यात येईल. येणेप्रमाणे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. ३०/०७/२०२५

**सही/-**
**लिपीक**

**शिक्का**

**हुक्रमावरून**
**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा व सत्र न्यायालय सोलापूर**

---

## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढील नेमली तारीख : २९/०८/२०२५
दि.क्रि.अ.नं. ७०/२०२५ नि.नं. ५

### बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात बार्शी

**(मा. रेवती पी. बागडे सो)**

१) **गोपिनाथा अजिनाथ ऊर्फ आदिनाथ घोळवे,**
वय - ५३ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. घोळवेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **हरिश्चंद्र अजिनाथ ऊर्फ आदिनाथ घोळवे,**
वय - ५९ वर्षे, धंदा - मजुरी,
रा. घोळवेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर
३) **आशाबाई बालाजी घुगे,**
वय - ५० वर्ष, धंदा - घरकाम,
रा. अंबरनाथ, ग्रिनसिटी, सिध्दीविनायक सोसायटी, मुंबई, ता. जि. मुंबई
— **अर्जदार**

विरुध्द

**कोणीही नाही** - **सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VIII प्रमाणे**

यात अर्जदारतर्फे विनंती अर्ज की, ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल अजिनाथ ऊर्फ आदिनाथ कुंडलिक घोळवे हे दि. ०६/०९/२०२३ रोजी मोजे घोळवेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी मयत झाले आहेत. तसेच अर्जदाराची आई सत्यभामा आजिनाथ ऊर्फ आदिनाथ घोळवे ही देखील दिनांक २९/१०/२०२१ रोजी मोजे घोळवेवाडी, ता. बार्शी, या ठिकाणी मयत झालेली आहे. अर्जदार नं. १, २ व ३ हे मयताचे मुले व मुली आहेत मयत अजिनाथ कंडलिक घोळवे यांचे नावे मौज शिराढोण, ता. तुळजापुर, जि. धाराशिव या ठिकाणी ग्रामपंचायत मिळकत नंबर २६५ पैकी १/२ क्षेत्र आहे. त्यांच्या पश्चात सदर मिळकतीचे उताऱ्यावर वारसाची नोंद करण्यासाठी प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे त्यांचे पश्चात अर्जदार नं. १ ते ३ हे त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे त्यांनी चारस प्रमाणपत्र मिळणेकरीता मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर बार्शी येथे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मयत के, अजिनाथ ऊर्फ आदिनाथ कुंडलिक घोळवे यांना अर्जदारशिवाय इतर कोणी यारस असेल अथवा त्यांच्या विषयी काही म्हणणे असल्यास या जाहीर प्रसिध्दीकरणापासून ३० दिवसाच्या आत अथवा नेमलेली तारीख २९/०८/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहुन आपले म्हणणे हरकत लेखी स्वरुपात पुराव्यानिशी दाखल करावे मुदतीत कोणाच्याही हरकती व म्हणणे न आल्यास अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. मा. कोर्टाचे प्रकरणी पुढील यथा योग्य आदेश होतील. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दी केले असे. तारीख : २५/०७/२०२५

**सही/-**
**कनि. लिपीक**

**शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**सि.ज.ज्यु.डि. यांचे न्यायालय, बार्शी**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**

---

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः साकत (बु) व ता. परंडा, जि. धाराशिव (उस्मानाबाद) येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डी. धाराशिव, सब डी. व ता. परंडा पैकी मौजे साकत (बु) येथील, ग्रामपंचायत हद्दीतील जागा याचा ग्रामपंचायत अनु. क्र. १६० याचा मिळकत नं. ३९८ याचे क्षेत्र १६४०.०० चौ. फूट याचे चौ.मी. २४५.३५ आहे, याचे मोजमाप पूर्व-पश्चिम लांबी ६६.०० फूट, दक्षिण-उत्तर रुंदी ४०.०० फूट., यासी चतुःसीमा :- पूर्वेस - आशाबाई सावंत यांची जागा, दक्षिणेस - ग्रामंचायत रस्ता, पश्चिमेस - ग्रामंचायत रस्ता, उत्तरेस - बबन सावंत यांची जागा, येणे प्रमाणे चतुःसीमापूर्वक खुली जागा, जाणेयेणे साठी रस्ता व पाणी वागणूक जागेच्या दक्षिण व पश्चिम बाजूच्या ग्रामंचायत रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे तदंगभूत वस्तू हक्कासह जागा.

सदर घरजागा हि श्री. पांडुरंग भुजंग सावंत यांच्या वडीलोपार्जीत मालकीची कब्जे वाहिवाटीची मिळकत असून त्यांनी ती मिळकत त्यांचा मुलगा श्री. दत्तात्रय पांडुरंग सावंत यास रजि. खरेदीखत क्र. १७८९/२०२५, दि. ०८/०७/२०२५ अन्वये विक्री केली आहे. ग्रामपंचायत मिळकत उताऱ्यास त्यांच्या नावाची नोंद आहे. सदरची जागा श्री. दत्तात्रय पांडुरंग सावंत हे बँकेकडे तारण ठेऊन कर्ज घेऊ इच्छितात, तरी सदर घरजागा/मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही, असे गृहीत धरून मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरून सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवलीत अथवा तसा दस्त नोंदणी केल्यानंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये या करिता जाहीर नोटीस दिली. दि. ३१/०७/२०२५.

**सही**
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
**पत्ता - ऑफिस - ३९४५/१, भवानी पेठ,**
**सोलापूर रोड, बार्शी. ता. बार्शी, जि. सोलापूर.**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

---

जनसेवा हिच ईश्वर सेवा

## करमाळा नगरपरिषद

**करमाळा-४१३२०३ जि. सोलापूर (महाराष्ट्र) स्थापना १८६७**

E-Mail :- comckarmala@gmail.com
नगरपरिषद कार्यालयः (०२१८२)२२०३१५

जावक क्रमांक - वसुली विभाग/ /२०२५
दिनांक - / /२०२५

### जाहीर नोटीस

**(महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ व सुधारित १९९४ चे कलम १२१ प्रमाणे) कर निर्धारण सूचीचे जाहीर प्रकाशाबाबतची नोटीस**

करमाळा नगरपरिषद हद्दीतील मिळकतीचे प्रारुप कर निर्धारण सूची महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम १९६५ चे कलम ११८ व ११९ अन्वये यापूर्वी प्रसिध्द करण्यात आले आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ११९ (२) अन्वये नगरपरिषदेस विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या लेखी हरकती / आक्षेपाबाबतचे सुनावणीचे काम मा. प्राधिकृत मुल्यांकन अधिकारी, नगरपरिषद करमाळा यांनी पूर्ण केले असून उक्त अधिनियमांच्या कलम १२१(१) अन्वये मालमत्ता फेर कर आकारणीचे अंतिम सूची नगरपरिषदेस अधिप्रमाणित करुन दिलेली आहे. सदर कलम १२१ (२) अन्वये अशा कर निर्धारण सूचींचे जाहीर प्रसिध्दीकरण नगरपरिषद नोटीसीद्वारे करीत आहे. अशी जाहीर केलेली कर सूची नागरिकांच्या अवलोकनासाठी करमाळा नगरपरिषदेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत खुली ठेवण्यात आलेली आहे.

सदर सूचीत समाविष्ट असलेल्या मिळकतीचे मालक अथवा भोगवटदार आपणच आहात असा अधिकृत हक्क दाखविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, अभिकर्त्यास ही सूची विनाशुल्क पाहण्याची व त्यातील उतारा घेण्याची मुभा आहे.

उक्त अधिनियमाचे (मूळ अधिनियम व सुधारित) कलम १६९ व १७० अन्वये अंतिम सूचीतील मिळकत धारकांना सदर अंतिम करसूचीप्रमाणे व उक्त अधिनियमातील कलम १५० अन्वये प्राप्त झालेल्या देयका (बिला) बाबत ३० दिवसांच्या आत उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार / मालमत्ताधारकांना सचिव, अपील समितीकडे स्वेच्छा निर्णयानुसार अपील दाखल करता येईल अथवा ज्यांना या समितीकडे अपील करावयाचे नसेल त्यांना परस्पर न्यायालयीन दंडाधिकारी यांच्याकडे अपील दाखल करता येऊ शकते. ज्यांनी अपील समितीकडे अपील केले असेल त्यांना अपील समितीच्या निर्णया विरुध्द न्यायालयीन दंडाधिकारीकडे रु.२०/- चे कोर्ट फी स्टॅम्पसह अपील करता येईल.

अपील समितीकडे अथवा न्यायालयीन दंडाधिकारी यांचेकडे अपील दाखल करण्यापूर्वी मिळकतधारक यांना उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार त्यांच्या मालमत्तेचे पुनर्मुल्यांकन होण्यापूर्वीच्या मूल्याकंनानुसार द्यावी लागणारी मालमत्ता कराची पूर्ण रक्कम नगरपरिषदेच्या कार्यालयात जमा करणे आवश्यक राहिल. नव्या मालमत्ताधारकांचे म्हणजे ज्यांच्या मालमत्तांचे मूल्यांकन प्रथमच झाले आहे. अशांनी एकूण कर रक्कमेच्या ५०% एवढी रक्कम नगरपरिषदेच्या कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. वरील दोन्ही बाबींची पूर्तता केल्याशिवाय अथवा मुदतीबाहेर मालमत्ता धारकांच्या अपीलांचा विचार करण्यात येणार नाही.

**सही/-**
**(स्वप्नील बाळेकर)**
**कर निरीक्षक**
**करमाळा नगरपरिषद**

**सही/-**
**(सचिन तपसे)**
**मुख्याधिकारी**
**करमाळा नगरपरिषद**




- शुभेच्छुक -

APE

AJAY POLYMERS & ENGINEERS
A COMPLETE BOILING HOUSE SOLUTION COMPANY

Reg. Office & Factory Address :
Silver Estate, W-11, MIDC,Osmanabad 413501 (M.S.) India
Ph.& Fax : +91-2472-229124, +91-9822501366, +91-9822352211
E-mail: ajays36@rediffmail.com website : www.apeindia.in

Designing and Manufacturing Sugar process plants and Equipments
Consultant for complete process house / Boiling house
consultant and manufacturer of complete material Handling & feeding System
Exporter of process know-how, Technology, Design Engineering, Plants and Equipments